2 y

ग्रं. नं. टांग
वारिश

नं. ७०६

वीर-रत्न

# बाजीप्रभु देशपांडे.

(ऐतिहासिक चरित्र.)

RLFBK-0062722

लेखकः—बा. स. कुळकर्णी.

इ.५.३०६

३०६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

दा. क्र. २७२२

श्री

# वीर-रत्न

## बाजीप्रभु देशपांडे

यांचें चरित्र

REFBK-0002722

पुस्तक ५ वें.

लेखक व प्रकाशक

बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी

दादर मुंबई नं. १४.

किंमत एक रुपया.

सन १९२५.

प्रकाशकः—श्री. वा. स. कुळकर्णी.
कवळीची चाळ, दादर
मुंबई नं. १४.

( ह्या पुस्तकासंबंधीं सर्व मालकी हक्क लेखकानें आपले
स्वाधीन ठेविले आहेत )

प्रिंटरः—भास्कर रघुनाथ कद्रेकर
' रविंद्र प्रिंटींग वर्क्स ' आंबेवाडी,
गिरगांव—मुंबई.

स्वराज्य संस्थापक.



श्री छत्रपती शिवाजी महाराज.

# वीर-रत्न.



बाजीप्रभु देशपांडे.

# प्रस्तावना

ह्या छोटेखानी चरित्र ग्रंथास मी प्रस्तावना लिहावी म्हणून मला आग्रह पूर्वक सांगण्यांत आलें. विशेष कारण नसतां, एकाच्या पुस्तकास दुसऱ्यानें प्रस्तावना लिहिण्याची अलिकडे आपणांमध्यें रूढ होत असलेली पद्धति मला जरी मनापासून पसंत नाहीं तरी रा० बाळकृष्णराव, ह्यांनीं अंतःकरणपूर्वक केलेल्या इतिहासवाङ्मयसेवेकडे पाहून त्यांचा शब्द मोडणें मला बरें वाटलें नाहीं आणि मीं, त्यांनीं मजवर सोंपविलेलें हें प्रस्तावनालेखनाचें कार्य, संतोषपूर्वक अंगिकारिलें.

एखाद्या पुस्तकांत ज्या विषयाचें विवेचन केलेलें असेल, त्यावर विशेष प्रकारचा प्रकाश पाडण्याच्या हेतूनें लिहिलेल्या प्रस्तावनांची गोष्ट बाजूला ठेविली तरी दुसऱ्या कित्येक प्रसंगीं मूळ ग्रंथापेक्षां प्रस्तावनेलाच ज्यास्त पृष्ठें आडविण्यांत येतात व "**मियां मूठभर आणि दाढी हातभर**" असा जो प्रकार होतो तो हास्यापदच म्हटला पाहिजे आणि म्हणूनच सध्यां जरी प्रस्तुत चरित्र नायकासंबंधानें पुण्यांतील संशयी इतिहाससंशोधकांकडून "**मूलेकुठारः**" ह्या न्यायास शोभण्या सारखें आक्षेप घेण्यांत येत आहेत, तरी ते केवळ दूषित मनोवृत्तीचे द्योतक आहेत एवढेंच ह्मणून मी हा प्रस्तावनालेख अगदीं थोडक्यांत लिहित आहे व प्रस्तुत चरित्रांत रा. कुळकर्णी यांनीं चरित्रनायका संबंधानें, त्याच्या योग्यते संबंधानें आणि महाराष्ट्राच्या इतिहासांत त्यानें बजाविलेल्या महत्वाच्या उज्वल कामागिरी संबंधानें, जो अस्सल पुरावा पुढें आणिला आहे, त्यानें ह्या संशयी संशोधकांचें समाधान होईल अशी आशा करीत आहे.

इतिहास शब्दाच्या अत्यंत गूढ अशा व्याखेंत न जातां, इतिहास ह्मणजे '**भूतकालीन घडलेल्या गोष्टींचें सत्यपूर्ण वर्णन**' असें स्थूलमानानें ह्मणता येईल. महाराष्ट्राचा इतिहास सध्या संघटनावस्थेंत आहे. ह्यामुळें संशोधनाचा आव आणून प्रत्येक मनुष्य आपआपल्या लहरीप्रमाणें ह्या इतिहासांतील

गोष्टीचें स्वरूप बदलण्याची धडपड करीत असलेला दृष्टीस पडतो. कोणी सुप्रसिद्ध बखरकार कृष्णाजी अनंत सभासद हे आपल्या जातीचें होते असे म्हणतो, तर कोणी, वीरांगना सावित्रीबाई ठाणेंदारीण ही आपल्या जातीची ठरेल तर बरें म्हणून मोठ्या आशाळभूत नजरेनें तिजकडे पहात असलेला दिसतो, कोणी नानाफडणविसाच्या आकलेची तारीफ करतो तर कोणी, देवनाथाच्या पद्याचा आधार घेऊन " **क्या है उसकी अकल, दौलत पेशवाई की डुबा दिई** " असे म्हणतो व नानाला पेशवाई बुडविणारा मानितो; कोणी शाहूमहाराजांना मोठे मुत्सद्दी समजतो तर कोणी त्यांच्या हातून मराठेशाहीची सर्व सूत्रें आपल्या हातीं घेणाऱ्या पेशव्यांच्या आकलेची तारीफ करितो; कोणी महादजी शिंद्याचा पक्षपाती तर कोणी फडणीस नानांचा चहाता! कोणी शेवटच्या रावबाजीला धन्यवाद देणारा, तर कोणी त्याला सर्व बाजूंनीं नांवें ठेवणारा! इतिहासाच्या पवित्र क्षेत्रांत अशा रीतीनें ज्यानें त्यानें आपलें घोडें पुढें ढकलण्याचा प्रयत्न करून स्वतः सत्यापासून दूरदूर जाणें आणि सामान्य जनतेची दिशाभूल करून तिला दूरदूर नेणें केव्हांहि इष्ट नाहीं. संशोधक म्हणून इतिहास संघटनाचें कार्य हेंच ज्यांनीं आपल्या आयुष्याचें ध्येय ठरविलें असेल, त्यांनीं तरी निदान आपले जातिविषयक अथवा धर्म विषयक क्षुद्र विचार केव्हांहि आपल्या संशोधनाच्या मार्गांत अशा रीतीनें आडवे येऊं देणें मूर्खपणाचें आहे.

राष्ट्राचा इतिहास, इतिहास कालीन निरनिराळ्या समाजांच्या आणि त्यांतील तत्कालीन प्रसिद्ध पुढाऱ्यांच्या सार्वजनिक कर्तबगारीनें सुशोभित झालेला असतो. सध्यां ज्याला इतिहास म्हणून म्हणतात, तशाप्रकारचा इतिहास लिहिण्याची वहिवाट, आह्मांमध्यें तरी यूरोपांतील निरनिराळ्या राष्ट्रांचे प्रसिद्धझालेले इतिहास अवलोकन केल्यानंतरच पडली आहे; ही गोष्ट स्वतःच्या राष्ट्रप्रेमाला, किंचित् देखील कमीपणा येऊं न देतां कोणालाहि मान्य करण्यास हरकत आहे, असें मला वाटत नाहीं. आह्मांमध्यें जर इतिहास विषयक स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याची वहिवाटच अलिकडे पडलेली आहे तर आह्माला आमचा इतिहास, तत्कालीन कागदपत्राचें एकीकरण, संशोधन आणि वर्गीकरण करूनच बनविला पाहिजे. हें कार्य करीत असतां, महाराष्ट्राचें प्रसिद्ध इतिहासकार रा. सरदेसाई हे आपल्या एका नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या लेखांत म्हणतात, त्याप्रमाणें आमच्या

विद्वानांनी चर्चेच्या विषयांत आपल्या स्वतःच्या मनोविकारांचा संसर्ग होऊं देतां कामा नये. आणि त्यांनीं आपल्या मनः सरणीचा छटा त्यांत उतरूं देऊं नये हें चांगलें. कारण-ह्याच लेखांत पुढें एके ठिकाणीं ते ह्मणतात:-"वाचकांस गतकालीन घडामोडीचें निर्भेळ सत्यस्वरूप जाणण्याची इच्छा असते. अमुक एका व्यक्तिची मखलाशी नको असते. अशा मखलाशीनें वाचकांची पुष्कळदां दिशाभूल होते. आणि भाषेचा उपयोग सत्य प्रगट करण्याऐवजीं सत्य छपविण्यासाठीं होतो." प्रस्तुत चरित्रांत जो अल्प इतिहास प्रसिद्ध होत आहे, तो त्यासंबंधाच्या अस्सल पुराव्यानिशीं प्रसिद्ध होत असून, चरित्र लेखक ग. कुळकर्णी यांनीं कोठेंहि आपली मखलाशीं त्यांत लढविलेली नसल्या कारणानें, वाचकांस शिवकालीन धडामोडींचें निर्भेळ सत्यस्वरूप पटवून देण्यास हें चरित्र चांगलेंच उपयोगी पडेल, असें आह्मांस वाटतें.

आमची सामाजिक रचना भिन्न भिन्न जातीमुळें आणि स्पृश्यास्पृश्यादि धार्मिक ह्मणून मानण्यांत येत असलेल्या आचार विचारामुळें, जगांतील दुसऱ्या कोणत्याहि देशाच्या सामाजिक रचनेहून फारच निराळया स्वरूपाची असल्याचें आढळून येते. ह्या अनन्य सामान्य समाजरचनेचें दुष्परिणाम ऐतिहासिक सत्यालापाकडे होत असलेले पाहून कोणालाहि खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं. शिवकालीन आणि त्यानंतरच्या काळांतील लेखक वर्गाकडे पाहिलें असतां, पुष्कळसे लेखक कायस्थप्रभु ज्ञातींतील आहेत, असें आढळून येते. ह्या प्रत्यक्ष स्थितीच्या कारणांची मीमांसा करण्याचें हें स्थळ नाहीं. तथापि महाराष्ट्राच्या इतिहाससंघटनेला आज आधारभूत झालेल्या पुष्कळशा, किंबहुना बहुतेक बखरी, ह्याच जातीच्या लेखकांनीं लिहिलेल्या आहेत. पण एके ठिकाणीं आह्मीं ज्यांचा उल्लेख केला आहे. ते पुण्यांतील संशयी संशोधक, खाजवून खरुज काढण्यासारख्या आपल्या एका नव्याच घाणेरड्या लेखांत ह्मणतात कीं, "कायस्थप्रभु जातींतल्या लोकांनीं बाजीप्रभुवर उत्तर कालीन जातीचें महत्व वाढविण्याकरितां गाथा तयार केली असणें अशक्य नाहीं. असा संशयी पक्षानें संशयव्यक्त केला आहे."

डॉ. केतकर यांची ही कुत्सित विचारसरणी खरी मानल्यास निरनिराळया जातींनें बनलेल्या हिंदु समाजांचा कोणताहि इतिहास केव्हांहि विश्वासनीय ठरेल

अशी आशा करितां येणार नाहीं. कायस्थप्रभु जसें आपल्या जातीचें स्तोम माजविण्याकरितां खोट्या बखरी लिहितात असें डॉ. केतकरांस वाटतें, त्याप्रमाणेंच डॉ. केतकरांचें कोणी जातभाई आपल्या जातीचें स्तोम माजविण्याकरितां जुन्या बखरींतून पत्रांतून, कुळकटांतून करीण्यामधून बोधांतून आणि प्रतापांतून आपले स्तोम माजविण्याकरितां खोटीनाटीं विधानें करितात. असें एखादा कायस्थ म्हणेल ! आणि प्रस्तुत जो छत्रपति शिवाजी महाराजांना हिंदवी बादशाहीच्या संस्थापकाच्या पदावरून खालीं ओढून काढून त्या जागेवर रामदासाची स्थापना करण्याचा गायकवाड वाड्यांतील मंडळीचा उद्योग चालू झाला आहे तो रंगारूपाला येण्यापूर्वीच धुळीला मिळविण्यांत येईल. इतिहासाच्या कार्यांत असा अनावस्था प्रसंग येणें केव्हांहि इष्ट नाहीं. ज्याना आजचा जातिभेद इष्ट वाटत असेल, त्यांनीं जातीचा संबंध जरूर वाटल्यास पंक्तिपुरता पाळावा. पण इतिहासाचें पवित्र क्षेत्र असल्या कुत्सित विचारांनीं अपवित्र करूं नये ! स्वयंपाक घराच्या पवित्र क्षेत्रांतच त्याचा नंगानाच त्यांनीं खुशाल चालू ठेवावा ! **छत्रपति शिवाजीमहाराज, वीर-रत्न बाजीप्रभु, समर्थ रामदासस्वामी** यांना इतिहासामध्यें जें महत्व आलेलें आहे तें त्यांच्या, त्यांच्या असामान्य कर्तृत्वामुळें आलेलें आहे. जातीमुळें आलेलें नाहीं. रामदास कुणबी असते तरी देखील गायकवाड वाड्यांतील श्रीयुत ज. स. करंदीकरांना, तुकोब्बाराय वाणी अथवा कुणबी असतां जसा त्यांच्या संबंधानें आज अभिमान वाटत आहे तसाच रामदासा बद्दल वाटला असतां ही गोष्ट सद्य परिस्थितींत त्यांना अमान्य करितां येणार नाहीं. बाजीप्रभु सारखीं माणसें म्हणजे स्वतःच्या जातीच्या कक्षेबाहेर जाऊन देशकार्य करितां करितां मृत्यूला धैर्यानें कवटाळणारीं माणसें ! यांच्या सारख्या थोर विभूतींना त्यांच्या उच्चासनांवरून खालीं खेचून आम्हीं जाति चक्राच्या फेऱ्यांत गिरक्या खाणारांनीं त्यांस आपलेंच ह्मणून त्यांच्या नांवानें टिमक्या बाजवीत रहाणें, हें केव्हांहि झालें तरी आमच्या क्षुद्र मनोवृत्तीचें द्योतकच ठरेल.

एका जातीच्या माणसानें कारणपरत्वें आपल्या खाजगी पत्रांत, अथवा सरकारी हुकूमानें लिहिलेल्या एखाद्या कागदांत किंवा तशाच महत्वाच्या एखाद्या टिपणांत शें दिडशें वर्षांपूर्वी कांहीं लिहिलेलें आज आपणांस आढळलें तर आपण त्या लिखाणामुळें एखाद्या विशिष्ट ऐतिहासिक प्रसंगावर चांगलाच प्रकाश पडला म्हणून

समाधान मानितो. आणि तें पत्र त्या प्रसंगाचा एक अस्सल पुरावा म्हणून मोठ्या आनंदानें प्रसिद्ध करितो. आतां हें पत्र तुझ्या पूर्वजानें आपल्या जातीचें स्तोम माजविण्याकरितां लिहिलेले आहे. माझ्या जवळ असलेल्या जंत्रीत त्या गोष्टीचा उल्लेख नाहीं, असें म्हणून एखादा संशयखोर इतिहाससंशोधक जर त्याची किंमत एक कवडी करूं लागला, तर त्याचें करणें योग्य होईल काय? आज आपण हाच डॉक्टर केतकरी न्याय जर काव्येतिहास संग्रह त प्रसिद्ध झालेल्या विविध लिखाणां पासून भारत इतिहास संशोधक मंडळा मार्फत प्रसिद्ध होत असलेल्या, तशाच नमुन्याच्या लखांस लावून पाहि-ल्यास रा. ब. साने, रायबहादूर भाईसाहेब गुप्ते, रा. राजवाडे, कै. खरे. रा. भावे, रा. ब. पारसनीस, कै. पांडोबा पटवर्धन, चांदोरकर, रा. कुळकर्णी, रा. यशवंतराव गुप्ते. रा. देव. रा. देशपांडे या पैकीं कोणीहि प्रसिद्ध केलेल्या अस्सल पुराव्याची किंमत दोन कवड्या ठरणार नाहीं. आणि आपण एखाद्या झोपेंतून एकदम जागे झालेल्या माणसा प्रमाणें मोठ्या तडफीनें उठून आतांपर्यंतचें इतिहास लेखनाचें सर्व प्रयत्न माती मोल ठरले म्हणून खेद करीत बसूं अथवा एखाद्या उन्माद वायू झालेल्या माणसाप्रमाणें, कपाळ आणि छाती बडवून घेऊं.

महाराष्ट्रीय ज्ञानकोशासारखें प्रचंड काम डोक्यावर घेऊन तें पुरें करण्याची अहोरात्र धडपड करणाऱ्या डॉक्टर केतकरांची सध्या तरी निदान उपरोक्त विधानांतील उन्माद वायूनें ग्रस्त झालेल्या गृहस्थासारखी स्थिती झालेली दिसते. असें नसतें तर " आपल्या जातीचें स्तोम माजविण्याकरितां बखरकारांनीं बाजी-प्रभूवर ही एक गाथाच रचली आहे. " असले विषमिश्रित बोल आपल्या द्विजिव्हा सार्पिणीसारख्या लेखणीच्या द्वारें प्रसृत करून, आज संघटित होत असलेल्या महाराष्ट्राच्या इतिहासाला त्यानी अशा निर निराळ्या जातींच्या गाथांचें भाण्डार बनविण्याचें धाडस खास केलें नसतें.

प्रस्तुत प्रकाशित होत असलेलें हें लहानसें चरित्र रा. कुळकर्णी यांनीं मला सुमारें एक वर्षापूर्वीच दाखविले होते. विशेष महत्वाची अशी एखादी नवी गोष्ट अथवा एखादा महत्वाचा पुरावा त्यानंतर त्यांत प्रकाशित होत असलेला दिसत नाहीं. **वीर-रत्न बाजीप्रभु देशपांडे** हा लष्करी अधिकारी होता.

डॉक्टर केतकरांचा संशयीपक्ष ह्मणतो त्याप्रमाणें तो कोणी केवळ सामान्य मनुष्य नव्हता. फाजल आणि सिद्दिजोहार यांनीं पन्हाळ्याला वेढा दिला असतां पन्हाळ्याहून विशाळगडास जातांना आपल्या हाताखालच्या लहानशा सैन्याच्या तुकडीच्या मदतीनें गजापूरच्या खिंडींत शत्रूला थोपवून धरून महाराजांच्या संरक्षणार्थ आपल्या प्राणाची आहुती त्यानें दिली आणि त्याची महत्वाची कामगिरी ध्यानी आणून खुद्द शिवाजीमहाराजांनीं आणि त्यानंतर छत्रपति राजाराम महाराजांनीं महत्वाचे अनेक अधिकार आणि वतनें बाजीच्या पुत्रपौत्रास दिल्याचे गेल्या पंचवीस तीस वर्षांत वेगवेगळ्या ठिकाणीं वेगवेगळ्या प्रसंगानीं प्रसिद्ध झालेले दाखले ह्या लहानशा चरित्रांत रा. कुळकर्णी यांनीं दिलेले आहेत. ते जसे त्यांच्या अवलोनांत आले त्याचप्रमाणेच ज्ञानकोशकर्ते डॉ. केतकर यांच्याहि अवलोकनांत आले असलेच पाहिजेत. इतकी ढोबळ ऐतिहासिक माहिती नसणाऱ्या कोणाहि मनुष्यास इतिहास संशोधक ह्मणवून घेण्याचा व तसल्या अेरराशी वर भलभलती विधानें ठोकून लोकाजवळून पुरावा मागविण्याचा अधिकार कोणाला हि पोंचतो असें आह्मांस वाटत नाहीं.

सध्या ज्याला इतिहास ह्मणून ह्मणतात तशा प्रकारचा इतिहास लिहीण्याचा उपक्रम आह्मांमध्यें नुकताच होऊं लागला आहे, ही गोष्ट वर एके ठिकाणीं सांगितलीच आहे. इतिहासकाळांतच काय परंतु अलिकडच्या काळांत होऊन गेलेल्या आम्हांमधील थोर थोर महात्म्याची चरित्रें आज आमच्या पुस्तक संग्रहांत दिसून येत नाहींत. न्या. मू. रानडे कैलासवासी होऊन २५ वर्षे झालीं तेव्हां आज कोठें त्रोटक माहिती असलेले त्यांचें एक चरित्र मराठी भाषेंत प्रथमच प्रसिद्ध होत आहे. अशा स्थितींत अवघी दीडशें वर्षें चाललेल्या मराठेशाहीचा इतिहास बनविण्याऱ्या शूर आणि मुत्सद्दी स्त्रीपुरुषांची नांवे आणि त्यांनीं केलेल्या एखाद दुसऱ्या महत्वाच्या गोष्टीचा केवळ नामनिर्देश ह्या पलिकडे आह्माला त्याच्या विषयीं अधिक माहिती नसणें अगदीं स्वाभाविक आहे. इतरांची गोष्ट राहो, पण खुद्द लोकमान्य टिळकांसारख्यांच्या नेतृत्वाखालीं गेली तीस वर्षे शिवजयंतीचा उत्सव वैशाख शु० २ स झाल्यानंतर आज तीनशें वर्षांनीं फाल्गुन कृ. ३ हा शिव छत्रपतीचा जन्म दिवस ठरला असें आमचे इतिहास संशोधक

आह्मांस सांगत आहेत ! अशा परिस्थितींत पुढें आलेल्या इतर पुराव्याकडे जेव्हां डॉ. केतकरासारखें इतिहास संशोधक ह्मणविणारे लोक कानाडोळा करून भोजनाच्या पूर्वी शिळोप्याच्या गप्पा मारता मारता सरदार बाजीप्रभुच्या पदरीं केवळ खर्डेघांशी बांधण्याचा निंद्य प्रयत्न करितात, आणि आह्मी ह्मणतो तेंच खरें तुमचें खरें असेल तर तसा अस्सल पुरावा आणून आह्मांला दाखवा ह्मणजे आह्मी त्याचा न्याय मनसुबा करूं ह्मणून मोठ्या आढ्यतेनें ह्मणतात, तेव्हां त्याला काय ह्मणावें तेंच आह्मांस समजत नाहीं.

सरदार बाजीदेशपांडे यांच्याविषयींच्या संशयपिशाचानें डॉ. केतकरांच्या मनाचा पूर्ण तावा घेण्यापूर्वीच रा. कुळकर्णी यांनीं आपल्या पुराव्याचें हे सिद्ध-मंत्र तयार करून ठेविले होते. डॉक्टरसाहेबांनीं आतां त्यावर नुसती आपली दृष्टि फिरविण्याची मेहेरबानी करावी ह्मणजे संशय पिशाच्यापासून इच्छा असल्यास त्यांची खास सुटका होईल असें आम्हांस वाटतें.

हिंदवीस्वराज्य स्थापण्याच्या कामीं छत्रपति शिवाजीमहाराजांना यथामती मदत करणाऱ्या आणि पुढील काळांत त्या स्वराज्याचें योगक्षेम चालविण्याकरितां अहोरात्र धडपडणाऱ्या शेकडों भाग्यवान स्त्रीपुरुषांमध्यें महाराष्ट्रांतील सर्वजातींच्या लोकांचा समावेष झालेला आहे. स्वराज्याकरितां स्वार्थावर पाणी सोडणाऱ्या त्या भाग्यशाली व्यक्तिकडे आज आह्मीं जातीच्या संकुचित दृष्टीनें न पहातां राष्ट्राच्या विस्तृत दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे. येसाजी, तान्हाजी, हिरोजी आणि बहिरजी हे जरी लंगोटी लावणारे मावळे मराठे जातीचे असले तरी आज आम्हांला ते महाराष्ट्राला स्वराज्याचा लाभ करून देणारे थोर महात्मे ह्मणूनच वंद्य असले पाहिजेत. त्याजविषयीं अधिक माहिती मिळविणें असल्यास ती मिळविण्याकरितां आजच्या इतिहाससंशोधकांनीं त्यांच्या जन्मानें पवित्र झालेल्या, त्यांच्या पराक्रमानें गाजलेल्या आणि त्यांच्या कीर्तीनें धवलित केलेल्या खेड्यापाड्यांत पवित्र क्षेत्राच्या दर्शनोत्सुक्यानें उड्या टाकीत गेले पाहिजे. डॉ. केतकर बाजीप्रभुची माहिती जमविण्याची जबाबदारी कायस्थ प्रभु जातीच्या लोकावर टाकितात, पण हें त्याचें करणें बरोबर नाहीं. बाजीप्रभु त्या ज्ञातीचा नाहीं तो महाराष्ट्राचा आहे. त्याची माहिती महाराष्ट्रानें मिळविली पाहिजे. ज्यानीं इतिहास संशोधनाला आपलें आयुष्य वाहिलें आहे अशा उदाराधि

पुरुषांनां ती संकलित केली पाहिजे आणि आमच्या महाराष्ट्रांत देखील आपल्या मूठभर सैनिकाशीं लक्षावधि पर्शियन सैन्याशीं झगडणाऱ्या लिआनिडससारखे लिआनिडास बाजीप्रभु या नावानें होऊन गेले आहेत, हें सर्व जगास छाती ठोकून सांगण्यास तयार झालें पाहिजे. महाराष्ट्राच्या या लिआनिडस संबंधानें चार शब्द लिहिण्याचा प्रसंग रा. कुळकर्णी आणि डॉ. केतकर यांच्या कृपेमुळें मिळाल्यामुळें मी या उभयतांचा फार आभारी आहे.

माहितीच्या अभावीं हें लहानसें चरित्र महाराष्ट्रांतील इतर ऐतिहासिक व्यक्तींच्या चरित्राप्रमाणें जरी अगदीं त्रोटक आहे आणि यांत जरी कांहीं भाषा विषयक दोष आहेत तरी रा. रा. कुळकर्णी यांनीं बाजीप्रभुसंबंधानें आजवर ठिकठिकाणीं प्रसिद्ध झालेली आणि अप्रसिद्ध म्हणून पडून राहिलेली माहिती एकत्र करून आपल्या भाषेस एका चरित्रग्रंथाची जोड करून दिल्याबद्दल माझ्या-प्रमाणेंच दुसरे कित्येक लोक त्यांचे आभार मानतील असा मला भरंसा आहे.

मुंबई, महाशिवरात्र
शके १८४६ } गो. गो. टिपनीस.

२७२२

## दोन शब्द

ऐतिहासिक चरित्र लिहिण्याचें आमचे ध्येयाची सविस्तर हकीकत आह्मीं प्रसिद्ध केलेलें पुस्तक ४ थें **मावळा सरदार विश्वासराव नानाजी दिघे देशपांडे** यांचे चरित्रांतील प्रस्तावनेंत दिलीच आहे. त्याचीच पुनरावृत्ति करण्याची येथें अवश्यकता नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी आह्मीं ऐतिहासिक चरित्र-माला काढण्याचा विचार केला होता, तथापि ती सर्वांगसुंदर होण्यास ऐतिहासिक साधनें मिळणें अशक्य झालें; पुढें संघशक्तीचा अभाव व अपरिहार्य अडचणी या त्रयींचा प्रादुर्भाव बराच निकट झाल्यामुळें, हें संकल्पित सिद्धिस जाईल असें वाटेना. ऐतिहासिक साधनें मिळविण्याचा प्रयत्न मात्र अविरता घेतला नाहीं. त्यामुळें अल्प कां होईना ! पण विशेष महत्वाची अशी अनेक घराण्यासंबंधीं महत्वाचीं साधनें मिळालीं. तेणेंकरून ऐतिहासिक पुरुषांची चरित्रें लिहीणें शक्य झालें. हें चरित्र सन १९२२ च्या डिसेंबर महिन्यांत लिहून पुरें केलें, तें आजपर्यंत अपरिहार्य अडचणीमुळें प्रसिद्ध झालें नाहीं. असो ! प्रस्तुत चरित्रांत उध्दृत केलेलीं ऐतिहासिक पत्रें अस्सल वरूनच नकला केलेल्या आहेत. हें सांगणें नकोच !

प्रस्तुत चरित्र लिहितांना ऐतिहासिक विवेचन पद्धति स्वीकारिली आहे. त्या मुळें चरित्रनायकाचा पूर्वापार संबंध, प्राचीन व अर्वाचीन माहिती, त्यांचा पराक्रम, कृष्णाजी बांदलदेशमुखाची माहिती, शिवाजीची बांदलवर स्वारी, चरित्रनायकास शिवाजीनें कोणाच्या साह्यानें अंकित केलें, अंकित झाल्यानंतर चरित्रनायकानें जो पराक्रम केला. तो कोणत्या वेळीं, कोणत्या स्थळीं, व कोणत्या परिस्थितींत तसेंच त्यावेळीं त्यांस कोणतीं साधनें व परिस्थिती अनुकूल अगर प्रतिकूल होती, चरित्रनायक ज्याठिकाणीं पतन पावला, असा समज आजपर्यंत झालेला आहे, आणि सध्यास्थितीच्या मानानें विचार करितां मागें जो समज प्रचालित होता, तो यापुढें कितपत टिकण्याचा संभव आहे, व तो प्रसंग त्याच ठिकाणीं घडला किंवा अन्य ठिकाणीं घडला असल्यास त्यास प्रत्यक्ष

प्रमाणें काय आहेत. त्यानें स्वधर्माकरितां, स्वराज्याकरितां आणि आपल्या पंचप्राणापेक्षांहि प्रिय असणाऱ्या आपल्या स्वामीच्या संरक्षणार्थ स्वतःची आहुति समर्पण करून कोणती विवक्षित भूमीपावन केली व ती कोणत्या मितीस इत्यादि गोष्टींचा अस्सल पुराव्यांच्या आधारानें प्रस्तुत चरित्रांत निर्णयात्मक विवेचन केलें आहे. त्याचा आमचे इतिहासप्रेमी महाराष्ट्रीय वाचक योग्य स्वीकार करतील अशी आह्मांस पूर्ण आशा आहे.

या चरित्रांत अधिक फोटो व तत्कालिन महाराष्ट्राचा नकाशा द्यावा, त्यांत विशेषतः पन्हाळा, विशाळगड व गजाखिंडीचे फोटो व चरित्रनायकाच्या वतनी गांवाचें नकाशें द्यावयास पाहिजे होते. परंतु हें कार्य विशेष खर्चाचें तर खरेंच व त्यांस विलंबहि बराच लागेल ह्मणून देणें शक्य झालें नाहींत.

प्रस्तुत चरित्र लिहिण्यास ज्या ग्रंथाचें व लेखांचे आधार घेतले, त्याची यादी सोबत दिलीच आहे. त्या ग्रंथकर्त्यांचें व लेखकांचें तद्वत् श्री. अनंत महादेव चौबळ, ठाणा व श्री. वामनराव रामचंद्र जोशी बी. ए. माजी प्रि. आ. ए. सोसायटी, मुंबई; या उभयतांनीं आपला अमूल्य वेळ खर्ची घालून, प्रस्तुत चरित्राची हस्तलिखीत प्रतवांचून पाहिली, त्याबद्दल त्यांचे अभार मानणें अवश्य आहे.

सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय वाङ्मयसेवक, शारदाभक्त, प्रोफेसर गोविंदराव गोपाळ टिपनीस, यांनीं आपली प्रकृति अशक्त असतांनाहि माझ्या विनंतीस मान्यता देऊन मोठ्या धडाडीनें प्रस्तावना लिहिली इतकेंच नव्हे तर प्रस्तुत चरित्राचें अंतरांगीह सुंदर करण्यास साह्य केलें, त्याबद्दल प्रोफेसर साहेबांचें आभार कसे मानावेत हेंच कळत नाहीं. तद्वत महाराष्ट्र–साहित्य कर्ते श्री. विरकुड यांनीं सदरहू चरित्र छापावयाचें व बाह्यांग सुंदरतेचें सारे श्रेय त्याजकडेच आहे. त्याबद्दल त्यांचेंहि अभार मानणें अत्यावश्य आहे.

कुंभारवाडा कवळीची
चाळ, दादर–मुंबई.

वा. स. कुळकर्णी.

# अनुक्रमणिका.


| | विषय | पृष्टें. |
|---|---|---|
| | प्रस्तावना ... ... ... | ३—८ |
| भाग १ ला | प्राचीन माहिती ... ... ... | १—८ |
| भाग २ रा | पूर्व वृत्तांत ... ... ... | ९—१३ |
| भाग ३ रा | बांदल देशमुख ... ... ... | १४—१९ |
| भाग ४ था | शिवाजीची बांदलावर स्वारी ... ... | २०—२७ |
| भाग ५ वा | शिवाजी बाजीस अंकित करितो. ... ... | २८—३२ |
| भाग ६ वा | पन्हाळगडास वेढा ... ... ... | ३३—३८ |
| भाग ७ वा | विशाळगड कीं रांगणा ! ... ... | ३९—४१ |
| भाग ८ वा | पराक्रम व शेवट .... ... ... | ४२—५१ |
| भाग ९ वा | पुरवणी पुरावा ... ... ... | ५२—७४ |
| | परिशिष्ट ... ... ... | ७५—७७ |
| | वंशावळ ... ... ... | |


---

## आधारास घेतलेल्या ग्रंथांची यादी.


१ चिटणवीसकृत श्रीशिवछत्रपतिचें सप्त प्रकरणात्मक चारित्र.

२ ,, छत्रपति संभाजी व राजाराम यांचें चरित्र.

३ चित्रगुप्तकृत शिवाजीची बखर.

४ शिवदिग्विजय.

५ प्रभु-रत्नमाला.

६ राजवाडेकृत खं. १५.

७ ,, खं. १६.

८ सरदेसाईकृत मराठीरियासत ( पूर्वार्ध )

९ केसरी अं. २६ जुलै १९१०.

१० चित्रमय-जगत् व. २ अं. ८.

११ प्रधानकृत प्रभुकुलदीपिका.

१२ भारत वर्ष मासिक व. २ रें.

१३ इतिहास संग्रह मासिक.

१४ महाराष्ट्र-साहित्य व. १ लें.

१५ भोपटकर कृत नवरत्नाचा हार.

श्री

# अर्पण पत्रिका.

हें चरित्र

मल्लविद्या विभूषित

प्रभुकुल भूषण अखंड ब्रह्मचारी

परमपूज्य प्रोफेसर

गजानन यशवंत माणिक उर्फ माणिकराव

यांस त्यांच्या उज्वल व तेजस्वी

देशभक्ति बद्दल आदर

वाटणाऱ्या ग्रंथकर्त्यानें

अत्यंत नम्रता पूर्वक

अर्पण केलें

आहे.



प्रो. माणिकराव-बडोदें.

# वीर–रत्न

# बाजीप्रभु देशपांडे

## यांचें चरित्र

## भाग १ ला

### प्राचीन माहिती

To every man upon this earth
Death cometh soon or late
And how can man die better
Than facing fearful odds
For the ashes of his fathers
and the temples of his Gods.

( जन्मास आलेल्या प्रत्येक इसमास आज नाहीं उद्यां मरण हें येणारच; परंतु आपल्या देवतांचीं देवळें व पूर्वजांची परंपरा कायम राखण्यासाठीं जबरदस्त शत्रूला तोंड देऊन आलेल्या मरणापेक्षां जास्त स्पृहणीय मरण तें कोणतें असणार बरें ? )

सतराव्या शतकाचा महाराष्ट्राचा इतिहास ह्मणजे एक नानाप्रकारच्या गुणी लोकांचा रत्नाकरच होय. या रत्नाकरांतून त्यावेळीं नाना गुण संपन्न अशीं नर–रत्नें बाहेर पडलीं, व त्यांनीं आपल्या अंगांतील नैसर्गिक तेजानें महाराष्ट्र भूमातेचें सर्वांग देदीप्यमान करून सोडलें. यावेळीं तत्कालीन महाराष्ट्रीय वीरांनीं व मुत्सद्यांनीं जीं शौर्याचीं व शहाणपणाचीं अचाट व अवजड कृत्यें

केली. त्यांना जगांतील इतर देशाच्या इतिहासांत तोड क्वचितच सांपडेल. या सागराला त्यांवळीं अस्तित्वांत असलेल्या तलवार बहाद्दर मर्दांच्या व कलमबहाद्दर मंत्र्यांच्या अनेक स्पृहणीय व राष्ट्रपोषक गुणांच्या नद्या मिळाल्यामुळें ह्या शतकाचा इतिहास म्हणजे एक अशा सद्गुणांचा सागरच बनला होता. म्हणून ज्या कोणाला आपल्या अंगीं पूर्वजन्मीच्या पापामुळें वसत असलेल्या दुर्गुणांचा अशेष क्षालन करावयाचा असेल, त्यानें महाराष्ट्राच्या या शतकच्या इतिहासोदधींत अवगाहन करावें, व अंगीं असलेल्या देशहितविघातक दुर्गुणांचें परिमार्जन करून घ्यावें. त्यावेळच्या आपल्या पूज्य पूर्वजांनीं शारीरिक व बौद्धिक पराक्रम करून आपल्यावर जे अनंत व अतर्क्य उपकार करून ठेविले आहेत, त्यांची आठवण झाली म्हणजे, त्यांच्या ठायीं प्रत्येक रसिक व कृतज्ञ महाराष्ट्रीयांचें मन तल्लीन झाल्यावांचून रहात नाहीं. कितीतरी अस्सल त्यांचा तो धर्माभिमान ? कितीतरी प्रेमळ त्यांची ती देशभक्ति ? व कितीतरी तेजस्वी त्यांचें तें आचरण ? कोणत्याहि दृष्टीनें त्यांच्या वंदनीय व अनुकरणीय कृतिकडे पाहिलें असतां मन तल्लीन होऊन जाते. त्यांनीं केलेल्या अमानुष व दैविक पराक्रमांचीं वर्णनें वांचून आपल्या नेत्रांतून कृतज्ञतापूर्वक अश्रु आल्यावांचून रहात नाहींत. त्यांनीं सनातन महाराष्ट्र धर्माची सेवा केली. त्या सर्वांनीं आपल्या मर्दानीं भक्तीची कमाल केली. त्यांनीं या महाराष्ट्रावर जे अगणित उपकार केले आहेत, त्यांना माप नाहीं, ते अनंत व अतर्क्य आहेत. त्या सतराव्या शतकांत अशी नर–रत्नें पैदा झाली नसतीं तर ह्या महाराष्ट्रांत हिंदुधर्म जिवंत राहूं शकला असता किंवा नाहीं याची जबर शंका येणें सहाजिक आहे.

**श्रीशिवाजी महाराजांचा** एकनिष्ठ **सरदार बाजीप्रभु देशपांडे** याचें नांव मराठ्यांच्या इतिहासाच्या प्रत्येक वाचकांस माहित आहेच. पन्हाळगडाच्या वेढ्यांतून निसटून **शिवाजीमहाराज** विशाळगडाच्या किल्यावर जात असतां वाटेंतील एका अत्यंत बिकट अशा खिंडींत **बाजीप्रभु देशपांडे** यानें विजापूरकरांच्या सेनासमुद्रास कित्येक तास थोपवून लढत लढत आपल्या धन्याच्या जीवितेचें संरक्षण केलें, व या स्वामीसेवेच्या कार्यांत आपला देह अर्पण केला. ही सुप्रसिद्ध ऐतिहासिक अस्सल माहिती, संशयखोर संशोधकांनीं आणि त्यांच्या भोंवती घुटमळणाऱ्या त्यांच्या बगलबच्चांनीं जरी

जनतेच्या नजरे आड करण्याची धडपड चालविली, तरी महाराष्ट्राच्या काना कोंपऱ्यांत रहाणाऱ्या प्रत्येक अबालवृद्ध स्त्री पुरुषांच्या ज्ञानचक्षू समोर ती मूर्तिमंत उभी आहे; ही गोष्ट त्यांनीं हामखास लक्ष्यांत ठेवावी. ह्या गोष्टीस आज सुमारें २६४ वर्षे झाली. **श्रीशिवाजी महाराजां**च्या आयुष्यांतील अनेक आणीबाणीच्या प्रसंगापैकीं, हा एक अतिमहत्वाचा प्रसंग होता. अशा प्रसंगा ज्या अनेक शूरमहात्म्यांनीं आपल्या जीविताची यत्किंचितहि पर्वा न धारतां आपले देह स्वामिकार्याकरितां रणांगणी अर्पण केले, आणि आपलें नांव **वीर रत्न.** मालेंत गोंवून घेऊन तें अजरामर करून ठेविलें; त्यापैकीं, **सरदार बाजीप्रभु देशपांडे** हे एक होत. ह्या **वीर-रत्नाचें** अल्पचरित्र आम्हीं वाचकांस सादर करीत आहोत.

**चरित्रनायकाची** माहिती देण्यापूर्वी त्यांच्या घराण्याची ओळख करून देणें अवश्य आहे आणि म्हणूनच त्याचा जन्म ज्या '**प्रधान**' उपनामक घराण्यांत झाला. त्या घराण्याची प्राचीन माहिती जी उपलब्ध झाली. ती येथें नमूद करितों:—

*—शालिवाहन शकाच्या तिसऱ्या शतकांत म्हणजे इसवी सन ३१९ मध्यें स्थापन झालेल्या गुप्तवंशीय साम्राज्याच्या काळीं व पुढें इसवी सनाच्या पांचव्या शतकांत सार्वभौम राजाचें मांडलिक अधिकारी ( प्रधान ) आणि जामात, विंध्यशक्ति ( श्री विंध्यवासिनी-विंझाईदेवी ) ज्यांची कुलदेवी-सर्वपार यशशक्ति दायिनी विंध्यकउपनाम उर्फ वाकाटक आडनांवाचें ( वाकाटक देशांचें राजे ) क्षत्रिय राजकुळ मध्यप्रांत देशीं उदयास आलें, ते प्राचीन वाकाटक देश तापी नदी, वेन गंगा आणि वर्धानदी यांच्यामध्यें व महाकोसल म्हणजे ज्यांस सांप्रत सेंट्रल प्रॉव्हिन्सेस मधील वर्धा, छत्तीसगड किंवा नागपूर प्रांत म्हणतात, त्यांत होता. ( कनींग हॅमकृत ऑर्कालाजी सर्वे रिपोर्ट ९ पान १२१-१२२ व पा. ५६ ) या कुळाचें गोत्र विष्णुरुद्र ( परशुराम भार्गव याचा पर्यायानें शब्द होतो. ) ताम्र-पटांत या राजांस " भारशिवानाम महाराज " म्हटलें आहे. भार म्हणजे विष्णु आणि शिव तो रुद्र मिळून भारशिव ते विष्णुरुद्र गोत्रीय-भार्गव गोत्रीय, याचें राजनगर

* ही माहिती श्रीयुत रामराव नारायण प्रधान विळेकरकृत, प्रभुकुल दीपिका या पुस्तकांतून जशीच्या तशीच उतरून घेतली आहे.

भद्रावती ( हल्लीचें नागपूर जिल्ह्यांत चांदा प्रांतांतील वर्धा नदीच्या कांठीं जें भांडक गांव आहे तें. येथें हल्लीं विंध्यशक्ति राजांच्या कुलदेवीचें स्थान टेंकडी वर आहे. त्यांस विंझासन असें ह्मणतात. व त्याजवळील अजिंठ्याच्या डोंगरांत या राजकुळाचें शिलालेख आढळले. त्यावरून ह्या राजकुळानें बरेंच दान दिल्या-चा तांम्रपट उपलब्ध झालेला आहे. त्यांत स्वतःस " क्षत्रियकुळ " असें ह्मटलें आहे.

हें क्षत्रियकुळ प्रथम सामान्य राज्यपद उपभोगीत होतें. पुढें या कुळाचा मूळ पुरुष जो **विंध्यशक्ति-विंध्यक**, ह्यापासून पांचवा किंवा सहावा जो **दुसरा प्रवरसेन** झाला. तो **श्रीदेवगुप्त महाराजांच्या प्रभावती** नामक कन्येचा पुत्र त्यासहि महाराज पद लाविलेले आढळण्यांत येतें. या **प्रवरसेना**च्या पूर्वी एक **हरिषेण** नामक राजा झाला होता. त्याचेंहि नांव आजिंठ्याच्या शिलालेखांत आढळतें.

**गुप्त** वंशांतील जो **पहिला समुद्रगुप्त महाराज** यानें दिग्विजय केल्याचें वर्णन प्रयाग येथील लोहस्तंभ-विजयस्तंभ दगडी लाटेवर आहे, त्यांतील शेव-टल्या श्लोकांत समुद्रगुप्त महाराजाचा प्रधान **हरिषेणाचें** ( The great minister हरिषेण इ. प्रिन्सेस ॲन्टीक्वीटीझ वाल्युम १ ला पा. २३३-२३९ लेखांचें इंग्रजी भाषांतर ) नांव आहे. त्यांस ह्या **गुप्तमहाराजानें** आपली कन्या देऊन या कुळास स्वतंत्र महाराज बनविलें असावें, असें पाश्चिमात्य विद्वानांचें मत आहे. ( कनिंगहॅमकृत आर्कियालॉजिकल सर्व रिपोर्ट भाग ९ खानदेश गॅझिटीयर पान २४०, २८०, ४८४, ४८५, बर्जेस कृत आर्कियालॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया नंबर १० केवटेम्पल्स-गुंफेंतील लेख यांतील अजिंठ्यांतील लेख, पान ६९ हाच लेख जर्नल ऑफधी रॉयल एशियाटिक सोसायटी, मुंबई वाल्युम ७ पा.५६ वर आहे. त्याचप्रमाणें रॉयल एशियाटिक सोसायटी, बंगाल वाल्युम ७ नं. २२ पा. ७०-७२ वर, सीवनी प्रांत नागपूर येथें सांपडलेल्या तांम्रपटाचें भाषांतर, तद्वत एपिग्राफि ऑफ इंडिया वाल्युम ९ भाग ६ पान २६७,२७१ यांत बाला-घाट येथें सांपडलेला तांम्रपट व त्याचें इंग्रजी भाषांतर ) तद्वत विष्णुपुराण अंश ४ अध्याय २३ श्लोक १६ पासून या विंध्यशक्ति-विंध्यक ( विंध्यसेन )

वगैरे ठिकाणीं ह्या कुळाचें वर्णन दिलेंच आहे. ह्यावरील श्लोकांत ह्या वंशांतील प्रवीर ( प्रवरसेन २ रा ) महाप्रबळ महाराज होईल असें म्हटलें आहे. वायुपुराण उत्तर भाग अनुषंगपाद अध्याय ३७ श्लोक ३६५, ३६६ व ३६७ मध्यें या कुळाबद्दल विशेष खुलासा असून हल्लींच्या ताम्रपटांतील वंशावळीचा मेळ जमतो त्याचप्रमाणें कित्येक पुराणांतून ह्या कुळाचें नांव आहे. शिलालेख व ताम्रपटावरून उपलब्ध झालेली वंशावळ खाली दिली आहे.

**श्रीविंध्यशक्ति—विंध्यक** ( विंध्यसेन ) कुलवंशावळी अजिंठ्याच्या डोंगरांतील शिलालेख ( बर्जेसकृत आर्कियालाजिकल सर्व्हे ऑफ इंडया नं. १० केव इन्स्क्रीपशन " गुहेंतील शिलालेख " इंग्रजी पुस्तक पान. ६९ ) आणि नागपूर प्रांतांतील सीवनी येथें सांपडलेला ताम्रपट ( जर्नल ऑफ धी एशियाटिक सोसायटी बेंगालब्रँच वॉल्युम ५ पान ७२९–७३० त्याचें इंग्रजी भाषांतर वॉल्युम ७ पा. ७०-७२ ) व बालाघाट येथें सांपडलेला तांम्रपत्र ( एपिग्राफिया इंडिया पु. ९ भाग ६ एप्रिल १९०८ चा अंक पा. २६७-२७१ ) यावरून कँम्बेल साहेबानें एकीकरण करून खानदेश गॅझिटीयर पा. ४८५ टीप नं. १ मध्यें वंशावळ दिली आहे तीः—

१ विंध्यशक्ति इ. स. ४०० च्या सुमारास होता. त्याचें नांव पुराणांत विंध्यक-विंध्यसेन

२ प्रवरसेन १ ला

३ देवसेन

४ रुद्रसेन १ ला

५ पृथ्वीसेन उर्फ देवसेन

६ रुद्रसेन २ रा हरिषेण

७ महाराजा प्रवरसेन ( पुराणांत प्रवीर ) हा महाराजाधिराज देवगुप्त याची कन्या प्रभावती हिचापुत्र ( बालाघाट तांम्रपटावरून प्रवरसेनाची पुढील वंशावळ )

८ नरेंद्रसेन ( प्रवरसेन २ रा याचा पुत्र ) राणी-कुंतल राजकन्या अज्झितभट्टारिका.

९ महाराजा पृथ्वीसेन २ रा.

इसवी सनाच्या ७-८ व्या शतकापासून पुढें दिल्ली येथें धीरधर प्रधानवंश: दाहल मंडळ ( दालभ्यमंडळ दालभ्य क्षत्रियांचादेश ) ऊर्फ जबलपूर प्रांतांतील त्रिपुर ( सांप्रतचे तिवेर ऊर्फ तेवर हें गांव जबलपुराजवळ नर्मदातीरी आहे ) कनोजचे राठोड, चितोडगड व उदेपुरचे महाराजे, गुजराथचे चावडे नंतर सोलंकी वाघेले, काश्मीरचे राजे, दक्षिण देशीं श्रीस्थानक-ठाणा-येथील शिलाहार-शैलाहार-पैठण, कल्याण व देवगिरीचे यादव, कर्नाटकाचे कलचुरी इ. राजे उदयास आले. त्यांत काश्मीरच्या राजाचा प्रधान चंपकप्रभु, याचा पुत्र कल्हण-कल्हणप्रभु, यानें काश्मीर देशाचा इतिहास, राजतरंगिणी नामक ग्रंथ शके १०९२ सालीं लिहिला. तो सांप्रत फारच आदरास पात्र आहे. दक्षिण देशीं इ. स. च्या बाराव्या शतकाच्या अखेर पर्यंत चाललेल्या शिलाहार राजाच्या राज्यांत दरबारी मंडळांत प्रधानादि प्रभुलोक असल्याचें दाखले अद्याप सोपारा, अगाशी [ ता. वसई जि. ठाणा ] येथें आहेत. व कांहीं संग्रहालयांत आहेत. त्यांत लक्ष्मणप्रभु, पद्मशिवराऊप्रभु, अनंतरायप्रभु, बेवलप्रभु, झांपकप्रभु, देवप्रभु' दादप्रभु इत्यादि प्रधानांचीं नांवें आढळतात. ठाणा गॅझेटियर भा. २ पान ४२२ व नोटस् २४६, २४७ भाग ३ पा. १९२, ४०२ and the J. of the B. B. of R. A. S. vol xii No. xxiv 1876 P 333 )"—

इसवीसनाच्या बाराव्या शतकांत परदेशीय मुसलमानांनें हिंदुस्थानावर स्वाऱ्या करण्यास सुरवात केली व तेराव्या शतकापासून ते आपले ठाणे येथे देऊं लागले; यावेळीं मांडवगड येथें हिंदूचें राज्य मोठ्या भरभराटीस असून अपार संपत्तीनें भरलेलें होतें. पुढें अल्लाउद्दीन खिलजी दिल्लीच्या तक्तावर बसला. त्यानें अनेक हिंदूराजांवर स्वाऱ्या केल्या. त्यांत त्याचा सरदार ऐनुल्मुल्क यानें मांडवगडावर * स्वारी केली. ह्यावेळीं मांडवगडचा राजा **मालकदेव** हा फारच प्रबळ होता. त्याचप्रमाणें त्याचा **प्रधान कोका** ( कुका–कुकप्रभु ) हा हि फार शूर होता. त्यावेळचें तेथें एक श्रीरामाचें देवालय किल्यात बांधलेलें होतें, त्या देवालयांत एक शिलालेख होता. त्यांत **राजा मालकदेवाचा प्रधान कोका-कुकप्रभु** होता. असास्पष्ट उल्लेख होता. असो !

१ ह्या स्वारीचें वर्णन-मावळा-सरदार-विश्वासराव नानाजी दिघे देशपांडे, यांचें चरित्रांत दिलें आहे तें वाचकांनीं अवश्य वाचावें

ऐनुल्मल्कानें मांडवगडावर स्वारी केली. त्याजबरोबर ह्या **कुकप्रभु प्रधानानें** कित्येक दिवस मोठ्या निकरानें सामनाकरून आपल्या प्रांताचें शत्रूपासून संरक्षण केलें. परंतु खिलजीच्या सरदाराबरोबर प्रचंड सैन्य असल्यामुळें, कुकप्रभूस त्यांस तेथून घालवून देतां आले नाहीं. तो मांडवगडाच्या प्रसिद्ध अजिंक्य किल्यास कित्येक दिवस वेढा घालून बसला. तरी किल्ला हस्तगत होईना. त्यांस किल्ला लढून हस्तगत होणार नाहीं, अशी जेव्हां त्याची पक्की खात्री झाली. तेव्हां त्यानें किल्यांतील लोकांस लांच देऊन तो हस्तगत करून घेण्याचा विचार केला. त्यांत त्यांस यश येऊन, त्याच्या कांहीं लोकांचा शिरकाव किल्यांत झाला. किल्यांत भेद झाल्याची खबर मालकदेवाच्या प्रधानास कळतांच, तो फारच संतापला. त्यानें आपल्या सैन्याची एकदम तयारी करून, ऐनुल्मुल्क यांचे सैन्यावर हल्ला केला. दोघांमध्यें मोठ्या निकराची लढाई होऊन शेवटीं हातघाईचा प्रसंग आला. कोकाप्रधात मोठ्या शौर्यानें लढला., परंतु तो ह्या हातघाईच्या लढाईंत मारला गेला. त्यामुळें त्याचें सैन्य हवालदिल होऊन सैरावैरा पळूं लागले. त्यांची कत्तल खिलजीचें लोक करूं लागले. अशा भयंकर प्रसंगामुळें तेथील लोक जिकडे वाव मिळेल तिकडे स्वसंरक्षणार्थ पळून गेले, व- मार्गशीर्ष शुद्ध ७ गुरुवार शके १२२७ ता. ५ जमादिलावल हिजरी सन ७०५ रोजीं मांडवगडाचा प्रसिद्ध किल्ला आजिंक्य व मुख्य राजधानीचा किल्ला दुर्गम, हे खिलजीच्या सरदाराच्या ताब्यांत गेले. ह्या प्रसंगीं ऐनुल्मुल्कानें हिंदुलोकांची कत्तल केली, तिचें वर्णन करणेंच अशक्य आहे. त्या भयंकर स्थितीमुळें **मालकदेव** आपल्या आप्त स्वकीयासह तेथून दक्षिणेंत रामदेवरावाच्या आश्रयास पळून गेला.

मांडवगडाचा पाडाव होऊन तेथील प्रसिद्ध किल्ले व अपार संपत्ती ऐनुल्मुल्कानें मिळविल्याबद्दल अल्लाऊद्दीन खिलजीनें त्याची फारच स्तुती केली. इतकेंच नव्हे तर **कुकाप्रधानाचें शीर** त्यानें दिल्लीस पाठविलें. तें पोंहचतांच महान शत्रु जिंकल्याबद्दल शहरांत सात दिवस रोषनाई केली. ह्या संबंधीं Sir H. M. Elliots History of India vol III P 76 & 550 त्याचप्रमाणें 2 Briggs' India vol I p 361 यांत वरील हकिकतीचें सुरस वर्णन केलेलें आहे.

इलीयट कृत ग्रंथ भाग ३ रा पा. ७६ वर " कोकाप्रधान " असें स्पष्ट म्हटलें आहे. व दोन्ही शब्द मोठ्या आद्याक्षरानें दिलेले आहेत. या वरील माहितीवरून पहातां त्यावेळीं कोका हें नांव कुकाप्रधानाचा अपभ्रंश होता. अक्षर त्रयस्थांच्या लिहिण्यामुळें उच्चारांत फरक झालेला असावा, हें निर्विवाद ठरतें. कारण कुकाजी, कुकप्रभु, काकप्रभु काऊप्रभु अशीं नांवें महाराष्ट्रांतील चांद्रसेनीय कायस्थप्रभूंच्या× जुन्यावंशावळींत दिलेली आहेत. त्याचप्रमाणें कित्येकांचीं उपनांवें प्राचीन नांवाप्रमाणेंच कायम आहेत. अस्तु !

मांडवगडाचें राज्य उध्वस्त झालें. त्यावेळीं **प्रधान** या आडनांवाचे जे पुरुष दक्षिणेंत आले. त्यांत **रघुनाथ देवराव प्रधान** असें नांव उपलब्ध झालें आहे ते दक्षिणेंत आल्यानंतर तेथील राजांकडून व पुढें बहामनी राज्यांत त्यांनीं जी अनेक वतनें व अधिकार संपादन केल्यामुळें, त्यांचीं निरनिराळीं उपनांवें त्यांच्या हुद्यावरून त्यांस मिळालीं व ती हल्लींहि त्या घराण्यांत प्रचारांत आहेत तीः–१ प्रधान, २ देशमुख ३ देशपांडे ४ चिटणीस ५ कारखानीस ६ टिपणीस ७ गडकरी ८ सिंदकर ९ विळेकर १० झापडकर ११ कुळकर्णी १२ देशकुळकर्णी १३ खारकर वगैरे असून भार्गवचार्य गोत्र व पंच प्रवर–१ भार्गव २ च्यवन ३ आप्नव ४ और्व ५ जमदग्नि याप्रमाणें आहेत. यापुढील चरित्रनायकाच्या पूर्ववृत्तांतापर्यंत दोन अडीच शतकांची माहिती उपलब्ध झाली नाहीं. ह्या संबंधीं थोडक्यात उहापोह **मावळा सरदार विश्वासराव नानाजी देशपांडे** याचें चरित्रांत पृ. २ वर केला असल्यामुळें येथें त्याची पुनरावृत्ति करीत नाहीं.

---

× (१) मावळा-सरदार विश्वासराव नानाजी दिघे, याचें चरित्रांतील वंशावळ व (२) राजवाडेकृत खंड १५ यांतील वंशावळ पहा.

# भाग २ रा.

## पूर्व वृत्तांत.

मागील भागांत चरित्रनायकाच्या घराण्याची प्राचीन माहिती, जी उपलब्ध झाली ती दिलीच आहे. परंतु त्यांचे जे पूर्वज दक्षिणेंत आले त्यांचा वृत्तांत मिळाला असता, तर इतिहासास बरीच मदत झाली असती. आजमितीस चरित्रनायकाच्या पूर्वीच्या फक्त सहा पिढ्यांचीं नांवें उपलब्ध झालीं आहेत तीं सोबत दिलेल्या वंशावळीवरून समजून येतीलच. ह्या सहाव्या पिढींतील मूळ पुरुष **रामप्रभु** उर्फ **विंध्यप्रभु** आहे. हें नांव पहिल्या भागांतील **विंध्यप्रभु** याचें द्योतक आहे. कारण कित्येक सुप्रसिद्ध पुरुषांचीं नांवें आपल्या पिढींत अजरामर रहावीं, ह्मणून तींच तींच ठेवित असतात. हें अनेक घराण्यांतील नांवावरून सिद्ध होतें. त्यांचे तिसऱ्या पिढींतील **वैजप्रभु** ह्मणजे **विंध्य**प्रभुचें नातू व चरित्रनायकांचें पणजे ह्यांनी मावळांतील देशपांडेपणाचें वतन बहामनी राज्यांत संपादन केल्याचा पुरावा उपलब्ध झाला आहे. बहामनी राज्य मोडून त्याचे पांच भाग झाले, तेव्हां हा प्रांत बेदरच्या बादशहाच्या ताब्यांत होता. ह्यावेळीं **वैजप्रभूचें** वास्तव्य हिरडस मावळांतील सिंद ह्या गांवी होतें, ह्मणून त्यांचे वंशजांस सिंदकर ह्मणतात. त्यांचे पुत्र **पिलाजीप्रभु** हे प्रथम बेदरच्या दरबारीं होते. त्यांस दोनपुत्र अनुक्रमें **बाळाजी** व **कृष्णाजी** असें होते. **कृष्णाजी** यांस चारपुत्र. त्यांत सर्वांत धाकटे चरित्रनायक. ही सर्व नांवें सोबत दिलेल्या वंशावळींत दिलींच आहेत. त्यांनीं बेदरकरातर्फे निजामशाही व अदिलशाही बरोबर अनेक लढायांत आपलें शौर्य गाजवून तें महाराष्ट्राच्या इतिहासांत अजरामर करून ठेविलें आहे. ह्या त्यांच्या अनेक पराक्रमाबद्दल निजामशाहींतून त्यांस मावळांतील ५२ गांवाचे देशपांडेपणाचा व कुळकर्णाचा हक्क वंशपरंपरेनें इनाम मिळाला. * ती गांवे

* प्रभुरत्न माला पा. ६७.

येणें प्रमाणें:—१ आळंदे, २ संगमनेर, ३ इंगवली, ४ यवली, ५ संगमसांगवा, ६ भोघोळकवडें, ७ किवात ८ नांद, ९ कसबे शिंद, १० गवडी, ११ ब्राह्मणघर १२ मोहडें खूर्द ( इसाफत ) १३ मोहडें बुद्रूक, १४ फणसदरा, १५ पिसखें, १६ वावार, १७ नांदगांव, ( इसाफत ) १८ आपती, १९ तेडघर, २० करंजगांव, २१ महसर खूर्द, २२ महसर बुद्रूक २३ देवघर, २४ वेलुपुरी, २५ कोंढरी, २६ हिरडोसी, २७ धामुणेंशीं, २८ वाखणड, २९ आशेणी, ३० कुंड, ३१ राजिवरी, ३२ शिळाव, ३३ उमरडें, ३४ शिरगांव, ३५ उंबरगणी, ३६ आमेपुरी, ३७ कारुमगण ३८ दुर्गांढी, ३९ कुडली खूर्द, ४० कुडली बुद्रूक ४१ मांझेरी, ४२ शिखली, ४३ गुंढें, ४४ निऊंगड, ४५ पररखर्द, ४६ परर बुद्रूक, ४७ दापकेंघर, ४८ धानेरीं, ४९ रायरी मोहरा, ५० सोलाली, ५१ भांवटमाळ ५२ माळवेंखाल. हीं सर्व मावळातच आहेत.

वरील हकिकतीवरून पाहतां ह्या घराण्यांतील पुरुष त्या काळीहि मोठे पराक्रमी होते. सन. १५३१ त अदिलशाहिनें बेरीदशाही गिळंकृत करून तो प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. हा काळ म्हटला म्हणजे, महाराष्ट्रांच्या इतिहासांत मोठ्या धामधुमीचा होता, असें म्हटलें असतां अतिशोक्ति होणार नाहीं, हें खास. ह्यावेळीं प्रत्येक शाह्या एकमेकांस गिळंकृत करण्याकरितां चित्ता सारख्या टपून बसल्या होत्या, इकडे दक्षिणेंत हा प्रकार चालू असतां, उत्तरेस दिल्लीच्या पादशहानें महाराष्ट्र पादाक्रांत करण्याचीं जणूं काय प्रतिज्ञाच केली होती. अशा वेळा महाराष्ट्रांतील प्रत्येक सरदार आपल्या शत्रूंस आपल्या पराक्रमाची जाणीव करून देऊन, धन्याचें संरक्षण करीत होता. हें इतिहास प्रसिद्धच आहे.

पुढें **पिलाजीप्रभुनें** आदिलशाहिच्या अव्यवस्थितपणांस व जुलमी कारस्थानास कंटाळून तिला शेवटचा रामराम ठोकला-व त्यानें आपला मोर्चा निजामशाहीकडे वळविला. ह्यावेळीं मलिकंबरानें निजामशाहीचा गाडा बराच सूव्यवस्थीत चालू केल्यामुळें, तेथील प्रजेस सुखानें वावरावयास मिळूं लागलें होतें. पिलाजी प्रभु तेथें गेल्यावर मलिकंबरानें निजामशाहीतर्फे मावळांतील प्रांताच्या संरक्षण करितां त्यांची नेमणूक केली. ह्याबद्दल कांहीं दाखले उपलब्ध झालेले आहेत.

स. १६२६ नंतर महाराष्ट्र भारत–भूमींत जें अनर्थ गुदरले, त्यांत निजामशाहिचें कित्येक सरदार ज्या किल्यावर अगर प्रांतावर बंदोवस्ताकरितां ठेविलें होते

तेंच ती ठाणीं बळकावून बसले. यानंतर **शहाजीराजे** ह्यांनीं परिंड्यांच्या किल्यांत वास्तव्य करून स्वराज्य स्थापण्याचें राजकारण चालूं केलें. त्यावेळीं **पिलाजीप्रभु**हि त्या राजकारणांत होते.

सन १६३३ त **शहाजीराजे** यांनीं निजामशाहीचें तक्त पुन्हा स्थापन करून, मोंगलानें निजामशाहीचा घेतलेला मुलूख पुन्हा ताब्यांत आणण्याचा निकाचा प्रयत्न केला, त्यावेळीं **कृष्णाजीप्रभु देशपांडे** व मावळांतील कित्येक सरदारांनीं शहाजीस साह्यकरून मावळ व कोंकण प्रांताचा बराच भाग निजामशाहीच्या ताब्यांत आणिला. ही बातमी दिल्लीचा बादशहा शहाजहान यांस कळतांच तो पुन्हा निजामशाही बुडविण्याकरितां चालून आला. त्यानें बहिरी घराण्याचा शेवट सन १६३६ त अखेरचा केला. त्या वेळीं मोंगलाचा व अदिलशहाचा जो तह झाला. त्यांत सर्व मावळप्रांत अदिलशहाच्या ताब्यांत गेला. तेव्हां मावळांतील देशमुख, देशपांडे जे निजामशाहिचें ताबेदार होते, ते आतां आदिलशहाचें ताबेदार झाले. अर्थात **चरित्रनायकांचे** आजे जे निजामशाहिचे ताबेदार होते, ते आदिलशाहीचे ताबेदार झाले.

मावळप्रांत आदिलशहाच्या ताब्यांत गेल्यानंतर, त्या प्रांताचा बंदोबस्त त्याजकडून झाला नाहीं, मग तो आदिलशहाच्या दुर्बलतेमुळें असो, अगर आदिलशाहीमध्यें कोणी चांगला मुत्सद्दी नव्हता ह्मणून असो ! पण ह्या प्रांतांत सर्वत्र अंदाधुंदी झाली, हें मात्र निर्विवाद आहे.

वरील हकिकतीवरून पाहतां स. १६२६ पासून १६३२ पर्यंत व पुढें १६३७ पासून शिवाजी महाराजांचा अंमल मावळ प्रांतावर चालूं होईपर्यंत " बळी तो कान पिळी " असेंच सर्वत्र झालें होतें. **शहाजीराजे** निजामशाहीचे पुरस्कर्ते होते. त्या वेळीं **चरित्रनायकाचें** वडील **कृष्णाजीप्रभु** हे शहाजींचें पथकांत होते, हें मागें दिलेंच आहे. त्यावेळी मावळांतील हिरडस किल्याचें बंदोबस्ताकरितां बांदल देशमुख होता. **शहाजीराजे** आदिलशाहीत गेल्यानंतर, त्याची मावळांतील जहागिरी पूर्वी जी निजामशाहींतून होती. ती आतां आदिलशाहींकडून झाली, इतकाच कायतो फरक झाला. दिवसें दिवस मावळांतील बांदल देशमुख शिरजोर होत चालला. तो विजापूरकरासहि जुमानीनासा झाला. इतकेंच नव्हे

तर, तो मावळांतील देशपांडे, कुळकर्णी वगैरे वतनदाराकडून जबरीनें खंड घेऊं लागला. त्यास जे वतनदार खंडणी देत नसत त्याजवर तो जुलूमत करूं लागला. व कित्येक प्रसंगी लुटालूटहि करूं लागला. त्यामुळें तेथील वतनदार फारच हवाल दील झाले होते. यावेळीं **चरित्रनायकांचे** आजे **पिलाजीप्रभु** हे आपल्या वतनाची व्यवस्था पाहत असत. त्याजवर बांदलदेशमुखाची वक्रदृष्टी फिरली. त्याजकडून बांदलानें खंड घेण्याचा प्रयत्न केला; परंतु **पिलाजीप्रभु** कांहीं साधारण मनुष्य नव्हता. इतकेंच नव्हे तर त्यानें निजामशाहीतर्फे मोंगलांबरोबर अनेक लढायामारून आपला पराक्रम गाजविला होता. अर्थात त्यानें बांदलास खंडणी देण्याचें साफनाकारिलें. ह्यावेळीं जरी **पिलाजीप्रभु** वृद्धावस्थेंत होता, तरी त्याचे पुत्र व नातू हे कांहीं कमी नव्हते. **कृष्णाजीप्रभु** शहाजीराजे यांचें पथकांत असतांना मोंगलसरदार शाहिस्तेखान व खानजमान याजबरोबर लढाया मारून यानें त्यांस नामोहरम केलें होते. असे हें पराक्रमी कुटुंब असतां ते बांदलच्या धमकीस थोडीच दाद देणार !

**पिलाजीप्रभुनें** बांदलास खंडणी देण्याचें नाकारिलें. तेव्हां तो आपली फौज घेऊन **पिलाजीवर** चालून आला. त्याजबरोबर **पिलाजीप्रभू** आपल्या थोडक्या लोकांसह निकराचा सामना करावयास निघाला. उभयपक्षांत मोठ्या निकराचें युद्ध झालें. हें युद्ध सन १६३७ पासून १६४० च्या दरम्यान केव्हांतरी झालें असावे. ह्या युद्धासंबंधीं **चरित्रनायकां**च्या मुलानें लिहिलेलें पत्र म. सा. व. १ लें अं. १ ला यांत प्रसिद्ध झालें आहे तें विशेष महत्वाचें असल्यामुळें येथें देतों :—“ आपलें इनामगांव व इनाम सेते गांवगन्ना व हक्क × ×कारकीर्दी निजामशाही चालत आ × × असतां दरमियान देशमुख त ॥ मजकूर दिवाणासी गैररुजु होऊन करूं लागले आपले वडील मारिले व जखमी केले बी त ॥

| | |
|---|---|
| पिलाजी प्रभु पणजे<br>जीवेंच मारिलें १ | कृष्णाजीप्रभु आजे<br>जखमी केले. १ |
| अनाजीप्रभु चूलते<br>जीवेंच मारिलें १ | आपले बाप बाजीप्रभु<br>जखमी केले जखमा<br>सुमारें ४७ परंतु वाचले |

येणें प्रमाणें मारेचुरे करून आपले गांव इनामती व सेते व हक्क चालों दिल्हे नाहीं तरी पादशहा मेहरबान होऊन करीना* मनास आणून आपलें वतन आपणांस बहाल केले पाहिजे म्हणून इलतपास× पोहचाविली त्यावरी पादशहा मेहरवान होउन दिवाणास हुकूम दिल्हा कीं देशकुळकर्णी याचे हमशाही+ देशमुख व देशपांडे येक जागा करून त्यांचा करिना* मनास आणून यांचें वतन दुमालि करणें * * * "

वरील पत्रावरून पाहतां ह्या देशपांड्यास पूर्वापार गांव इनाम होतें. व तें निजामशाहीतहि होते. हें घराणें पूर्वापार पराक्रमी होतें. व त्यांच्या पराक्रमाचें द्योतक म्हटलें म्हणजे ५२ गांव इनाम मिळाले हें होय. तेव्हां कित्येक अधुनिक इतिहासकार **कायस्थांचा बाळाजी आवजी चिटणीसापूर्वी अंधार होता** असें ह्मणतात. हा त्यांचा दाग शोध वरील माहितीवरून फोल ठरतो. असो ! ह्या वीर पुरुषांनीं बांदलाच्या केवळ धमकावणीस न घाबरतां आपलें क्षात्रतेज प्रगट केलें. सन्याच्या कमकुवत पणामुळें त्यांचें बांदलानीं जरी मारेचुरे केले तरी त्यांचा पक्ष अगदींच नेस्तनाबूत झाला नाहीं. ह्या लढाईत **चरित्रनायकाचें** आजे **पिलाजीप्रभु** व बंधु **अनाजी** हे मारले गेले, वडील जखमी झाले. तर **चरित्रनायकास** ४७ जखमा झाल्या तरी वांचलें, ह्यावरून त्यांच्या शक्तीची व शौर्याची कल्पना करावी लागेल.

वर दिल्याप्रमाणें बांदलांनीं **चरित्रनायकाच्या** घराण्याची दुर्दशा करून, त्यांचें वतन हिरावून घेतलें. हें वरील पत्रावरून सिद्ध होतेंच; परंतु चरित्र नायकांचे वडील जसे शूर होते तसेच मुत्सद्दी होते. ते बांदलच्या कृत्यास घाबरून स्वस्थ बसले नाहींत. त्यानें आपल्या वतनासंबंधानें त्याचप्रमाणें इनामी गांवासंबंधानें विजापूर दरबारीं तक्रार नेऊन लेखून आपले पुरातन हक्क व इनामगांव बांदलकडून घेण्याकरितां त्यांस चांगलाच शह दिला. तेव्हां बांदलास नाइलाजास्तव कां होईना, ते सर्व सोडावें लागलें. व तो पुन; देशपांड्यांच्या विरुद्ध गेला नाहीं. इतकेंच नव्हे, तर ह्या दोन्ही घराण्यामध्यें पुढें फारच लोभ जडला. त्याची हकिकत पुढील भागांत देण्यांत येईल.

---

* हकीकत + विनंती केली + समक्ष.

# भाग ३ रा

## बांदल देशमुख

मागील भागांत बांदलाचा संबंध आल्यामुळें तसेंच बांदलाचा व चरित्रनायकाचा निकट संबंध असल्यामुळें, बांदल देशमुखाची जी थोडी माहिती आजवर उपलब्ध झालेली आहे ती येथें देणें अवश्य दिसते. व ही माहिती फक्त कृष्णाजी बांदलासंबंधानें असून, **शिवाजीनें** त्याजवर स्वारी करून त्यांस मारिले, त्या दरम्यानची उपलब्ध झालेली आहे, व तेवढीच येथें देण्यांत येत आहे.

**कृष्णाजी बांदल देशमुख** हा रोहिडा किल्याचा किल्लेदार, प्रथम बेदरच्या बादशहा कडून होता. पुढें हा प्रांत निजामशाहीनें जिंकून आपल्या ताब्यांत घेतला. त्यानंतर मोंगल बादशहा शहाजहान यानें निजामशाही स. १६३६ त जिंकून, आदिलशाहाबरोबर जो तह केला, त्या तहा अन्वयें हा प्रांत आदिलशहाकडे गेला. व **शहाजीराजे** विजापूरकरांच्या नोकरींत विजापुरास जाऊन राहिले, तेव्हां त्यानें आपल्या मावळांतील सुभ्याची व्यवस्था करण्याकरितां आपल्या विश्वासांतील दोन नोकर ठेविले, त्यांत दादोजी कोंडदेव यांस त्या प्रांताची सुभेदारी दिली, व अनंत प्रभु फणसे यांस हिशेबी व जमाबंदीच्या कामावर ठेविले. हे दोघेही मोठे मुत्सद्दी व धाडसी होते. हे दोघे **शहाजीराजे** यांचे जुने नोकर असून मलिकंबरी वसुलाची पद्धत त्यांस चांगलीच अवगत होती. त्यांनीं त्या पद्धतीनें ह्या सुभ्याच्या वसुलाची व्यवस्था चालू केल्यामुळें, तेथील उत्पन्न वाढूं लागलें. इतकेंच नव्हे, तर तेथील प्रजा सुखी होऊन उत्पन्न वाढलें व तंटा बखेडा होण्याचेंहि बंद झालें.

वर दिल्याप्रमाणें **शहाजीराजे** यानें आपल्या जहागिरीचा योग्य बंदोबस्त केला, तथा आदिलशहाकडून मावळप्रांताचा बंदोबस्त झाला नाही. त्याचा

फायदा घेऊन तेथील कित्येक किल्लेदार स्वतंत्र होऊन, शिरजोरपणानें वागत असत, त्यापैकीं रोहिडा किल्याचा किल्लेदार **बांदलदेशमुख** हा एक होता. त्यानें **चरित्रनायकांच्या** वतनावरून केलेले भांडण मागील भागांत दिलेंच आहे. त्याचप्रमाणें तो कांहीं तरी कुरापत काढून तेथील वतनदाराबरोबर भांडणें करीत असे. इतकेंच नव्हे तर तो त्यावेळीं आपणांस बारा मावळाचा " राजा " असें ह्मणवीत असे. या त्याच्या शिरजोरपणास कंटाळून कित्येक वतनदार आपलीं वतनें सोडून देऊन, तेथून निघून गेले. हा त्याचा शिरजोरपणा शिवाजी महाराजानीं स्वारी करून त्यांस मारीपर्यंत अव्यहात चालूच होता.

**बांदलानें** कारीचे जेधे देशमुख याजबरोबर गांवाच्या शिवेवरून कुरापत काढून त्याजवर स्वारी केली; परंतु जेधे देशमुख कांहीं कमी नव्हताच, त्यानेंही जमाव करून बांदला बरोबर लढण्याची शिकस्त करून त्यांस आपल्या पराक्रमाचा चांगलाच नतिजा दाखविला. या प्रमाणें त्यांच्यामध्यें सहावेळा लढाया झाल्या. त्यांत बांदल पराजय पावला. तरी तो कमीं पडेना. त्यानें सातवे वेळीं लढाईकरण्याचा निश्चय केला. त्या संबंधीं रा. कृ. खं. १६ त हकिकत मौजेची आहेत:—" दस महाल नाहवी यास नाईक मेहरबान होऊन, मौजे आंबवडे इसापतीचा गांव त्यास सेत बक्षीस दिल्हे. त्याजवर कृष्णाजी नाईकजी बांदल याणी येऊन पुंडावे करून हिरडस मावळ येथें खून मारे आम्हासी सिवे निमत्य व दाइत्या निमित्य कटकट करून झुंझो लागले ते समयीं कृष्णाजी नाईक बांदल याची स्त्री दिपावा याच्या पायांत बेडी घालून ठेविली होती. आपण जुझांत जात होते. तेव्हां कृष्णाजी नाईक साहेब जुंज दिले. परंतु बांदलास येश प्राप्त झाले नाहीं. पुढें आणिकहि जुंझावयाची मसलत करूं लागले. तेव्हां कडतो पंताचे वडील बोलिले कीं, दिपावाच्या पायांत बेडी घालून तुम्हीं ठेविली तोंपर्यंत तुम्हांस यश येत नाहीं. तुम्ही दिपावाची बेडी तोडून सन्मान करणें. दिपावानी तुह्मास व सर्व लोकांस वोवाळून लोकास आशीर्वाद दिल्हा म्हणजे तुम्हांस यश येईल. तेव्हां कृष्णाजी नाईक बांदल बोलिले कीं, तुम्हीं सांगितलें त्याप्रमाणें करितों. परंतु सांगितल्याप्रमाणं घडेना तरी कसें करावें ? तेव्हां कडतो पंताचे वडील बोलले. यांत खोटे जाले तरी आम्हांस शासन करावे. ऐसे बोलिले. त्यावरून

कृष्णाजी नाईक याणी दिपावाचे पायाची बेडी काढून न्हाऊ घालून पाटाव नेसावयास दिल्हा. दिपावा याणी पाटाव नेसोन, हाती पंचार्ती घेऊन नाईकास ओवाळिले व सर्व लोकास वोवाळून आसिर्वाद दिल्हा की, तुह्मी जुंझास जाणे. तुह्मास येश येईल. परंतु निरापार न जाणे. निरेचे अलिकडच जुंझावे. ऐसी दिपावाची आज्ञा घेऊन, कृष्णाजीनाईक बांदल याणीं सर्व लोक जमा करून कासारखिंडीस रणखांब रोऊन, जुंझावयास सोमवारचा करार केला. समागमे साडबाराशें लोक घेऊन कासार खिंडीस आले. ते समई जेधे याणींहि आपले सर्व लोक सातशे माणूस जमा करून रणखांबाजवळ आले. तेथें जेधे बांदल यांचे युद्ध त्या युद्धांत जेधे याकडील लोक पडले. × × × ×

लोकांची जुंझात घरें बुडाली. गणिती करिता तिनसे माणूस ठार पडले. एके दिवशी तिनसे मुडदे जाले असेत. त्यास जाळावयास घरे मोडून जाती जाती लोक येके जागा करून जाळले. तेव्हांपासून जेधे व बांदल यांचा कटकट वारली " यासच अनसरून रा. खं १५ ले. ३६३ प्रसिद्ध झालेला आहे तो येणें प्रमाणें " जेधे बादल याचे जुंज सिवेचे खटले व नदी वदल जाले त्याचा करीणा जेधे याणी चापजी नाईक बांदळ याचा नांदगावाजवळ मोडून डोंगरास लाविले त्यास कृष्णाजीनाईक याणीं बाजीप्रभु देशपांडे त ॥ हिरडीस मावळ यासी बोलावून विचार करून मग दिपाईआवाचे पाईची बेडी तोडून मग दिपाईआवायाणी स्नान करून कृष्णाजी नाईक यास व बाजीप्रभूस वोवाळून यशवंत होणे असे बालून बाजीबावास घोडा बसावयास दिल्हा कृष्णाजी नाईक संभुप्रसाद घोड्यावर बसले मग कासार खिंडीस ठेऊन बाबाजी पोलास आज्ञा केली जे बाबाजी मामा पाड पहाणे यात पाड पाहिला तो + + तेचा निघाला तेव्हां चापाजी नाईक यास जमावासुधा बोलाविले नांदगावाजवळ वड थोरला होता त्याखाली जेधे ठेऊन नदी पाठीसी घालून बैसले होते तेव्हां सर्व जमाव बांदला कडील एक जागा होऊन जमावास कडवीच्या वऱ्या वाटून देऊन चालून घेतले जुंज जाले तेव्हां जेधे मोडून कारी पावेतो नेले गाव लुटून पस्त केला राणीवसा मात्र राखिला तेव्हां माघारे मुरडून चालले तेव्हां कृष्णाजी नाईक याचे डोईचे मुंडासे आमलाच्या मदे झोटं घरणीत पडले होते ते बाजीप्रभु याणी याद

धरून घोडियावरून उचलून तोवरीयात घातले होते तेव्हां कृष्णाजी नाईक बोलले जे बाजीप्रभु एक दोन लढाया जाल्या परंतु आज फत्ते जाली जेधे-जीनें शीर मात्र नेले तेव्हां बाजीप्रभु याणी उत्तर दिल्हे जे तुम्ही बारा मावळांत यशवंत आहा तुमचे इतर काम होईल असे म्हणोन घोडियावरून उतरून तोवरियातून मुंडासें काढून दिल्हे तेव्हां मुंडासे बांधून मग बाजीबावास पोटासी धरून नाईक बोलिले जे बाजीप्रभु तुम्हीं शर्थ केली. ” या पत्रावरून कृष्णाजी बांदल व बाजीप्रभु यांचा किती लोभ जडला होता ही गोष्ट उघड होत आहे. जे एका काळीं एकमेकांचे शत्रू असतात, तेच पुढें परस्परांचे परम मित्र होतात; तसेंच आपला शत्रू प्रबळ होऊन त्यानें आपल्यास अंकित केल्यास मी मी म्हणविणाऱ्या बलाढ्य वीरासहि त्याची ताबेदारी पत्करावी लागते. इतिहासांत याचीं अनेक उदाहरणें आढळतील. बांदल हा बारा मावळांत श्रेष्ठ झाला, त्याच्याशीं एका काळीं निकरानें लढलेले आपले चरित्रनायक त्याचे दिवाण झाले. यांत आश्चर्य करण्यासारखें असें कांहींच नाहीं.

शहाजीराजे यांनीं आपल्या मावळांतलि जहागिरीचा बंदोबस्त कसा केला, हें वर दिलेंच आहे. त्यानंतर बांदलदेशमुख ह्या जहागिरीपैकीं कांहीं भागाचा वसूल बळजबरीनें करूं लागला. त्यांस सुभेदार दादोजी कोंडदेव यानें अनेकवेळां सामोपचारानें सांगून पाहिलें, परंतु तो ऐकेना, तेव्हां सुभेदार दादोजी कोंडदेवानें त्याजवर स्वारी केली. त्यांत सुभेदाराचा पराजय झाला. (रा. खं. १५ ले. ३०२) “ आपले आजे कान्होजी जेधे स्वारा-निसी महाराजसाहेबापासी होते ते समई श्रीछत्रपति कैलासवासी स्वामीस महा-राजानी पुण्यास ठेविले त्याजवळी आपले आजे कान्होजी नाइक स्वारानिसी राहिले त्यावरी राजश्री दादोजी कोंडदेऊ सिवापुरास आले ते समई बारा मावळामध्यें कृष्णाजी बांदल देशमुख ता॥ हिरडसमावळ दाईत घेत होते, त्यास कर आपले वडील देत होते. त्याणी दाईत दिले नाहीं. कोंडदेऊ, कृष्णाजी बांदल यावरी गेले. ते समई कृष्णाजी बांदलानें स्वारावरी चालोन घेतले. स्वार पिटाळून काढीले घोडियाच्या दांड्या तोडिल्या दादोजी कोंडदेऊ नामोहर होऊन सिवापुरीस आलियावरी कान्होजीनाईकास बोलिले कीं, तुह्मी कृष्णाजीनाईकास भेटीस घेऊन येणें तुह्मीं हे गोष्टी मनावर धरिता, तेव्हां कृष्णाजीनाईकहि आणिता

आणि बारा मावळेचे देशमुख कांहीं आले आहेत. कांहीं राहिले आहेत. तेंहि भेटीस येतात ह्मणोन कितेक गोष्टी बोलिले त्यावरी कान्होजी नाईक कारीस गेले तेथून कृष्णाजी बांदल यास चार गोष्टी सांगोन पाठविल्या. त्यावरून कृष्णाजी नाईक भेटीस सिवापुरावरी आला त्यावरी अगदीं देशमुख भेटले त्यावरी कुल-मावळे लोक जमाव करून तीनहजार लोक खळदबेलसर येथें मैदानास झुंजाव-यास पाठविले ते समयीं मोंगल चालोन घेतले मावळच्या लोकांनीं शर्ति केली मोंगल मारून लाविला"

यासच अनुसरून सदरहू खंडांत ले. ३६४ आहे; तो—महाराज राजश्री साहेब कैलासवासी याजवळ स्वारानसी सेवा केली त्यास थारले राजश्री कैलासवासी स्वामी पुणीयास पाठविले या समागमे आपले आजे कान्होजी नाईक स्वारानसी दिल्हे याणी एकनिष्ठेनें सेवा करावयाची ते केली वतनामुळेंहि रुजुवातीनें राहिले त्यावरी राजश्री दादाजी कोंडदेव सिवापुरास आले ते समई कृष्णाजी नाईक बांदल देशमुख ता॥ हिरडसमावळ बारामावळामध्यें जोरावारीनें बाइते घेत होते तेसमई आपले आजे कान्होजी नाईक याणी बांदलास बाइते दिल्हे नाहीं यावरी राजश्री थोरले कैलासवासी स्वामी कारभार करूं लागले तेसमई गनीम-चालोन आला याकरितां पाईच्या लोकाचा व लष्कराचा जमाव करू लागले आजे कान्होजी नाईक यास बोलाऊ पाठविले तेथेहि आपल्या जमावानिसी गेले त्यावेळीं मावळे लोकाचा जमाव व स्वाराचा जमाव करून मौजे खळदबेलसर येथे गनीम आला होता त्यावरी राजश्री थोरले कैलासवासी स्वामी गेले × × गनीमाचे भांडण झाले तेथे तरवारीची शर्ती करावयाची ते केली गनीम मारून मोडिला"

कृष्णाजी नाईक बांदल देशमुख ह्याचें प्रस्थ ह्यावेळीं बारा मावळांत कसें माजलें होतें तें वर दिलेल्या पत्रावरून उघड होतें. त्याच्या पदरीं आपला **चरित्रनायक** त्याचा दिवाण होता. दिवाण आणि यजमान दोघेंहि चांगले पराक्रमी असल्यामुळें, ते सुभेदार दादोजी कोंडदेव याची दाद कशी लागूं देणार ! तेव्हां जेधे याचे मार्फत बांदलाची समजूत घालण्याचा प्रयत्न करण्याचें ठरलें. इतक्यांत मोंगल मावळ प्रांतावर चाल करून आला. त्यावेळीं मावळां-तील सर्व मावळे एकत्र होऊन मोंगलाबरोबर " खळदबेलसर " येथें लढाई

केली. या लढाईत मोंगलांचा, मावळ्यांनीं चांगलाच समाचार घेतला. ही लढाई स. १६४४-४५ त झाली असावी. असो !

यावेळीं शिवाजीच्या राजकारणाचा विकास होऊन, ह्यांजमध्यें स्वराज्य विषयक एका नव्याच कल्पनेचें चैतन्य चमकूं लागलें होतें. पारतंत्र्याच्या जाचकपणाची भावना जनतेच्या काळजावर इंगळीच्या नांगीचा मारा करीत होती. दक्षिणेंतील एखाद्या शाहीच्या अथवा मोंगल बादशाहीच्या मेहेर नजरेनें मिळालेल्या सरदारीच्या आणि सुभेदारीच्या उसन्या ऐटीवर आपल्या हाडामासांच्या लोकांची हाडेंमासें खिळखिळी करून आपली चैन चालविणें ह्मणजे स्वातंत्र्य नाही. असा अंतःकरणाच्या गूढ गुहेंतून उठणारा अस्फुट ध्वान त्यांच्या कानावर येत होता. यावेळीं राजकारण व धर्म याची चळवळ सर्वत्र स्पष्टपणें दिसून येत होती. परिस्थिती विपरीत होती, तरी अंगिकृत कार्य अधिक नेटानें चालू होतें. त्यामुळें अनेक लोक आपण होऊन या कार्यास मिळत असत. त्यांच्या अंगी कर्तव्याची खरी प्रेरणा झालेली होती. अहंकार, भीति, कुचराई वगैरे मोह त्यांच्या अंगांतून पार नाहीसें झाले होते. ते विजयशाली वीर व आत्मबलिदान करणारे वीर होते. ह्मणूनच त्यांच्या स्वराज्याचा त्वरित विकास झाला. यावेळीं महाराष्ट्राच्या उद्धारासाठीं महात्मे, वीर, मुत्सद्दि व साधुसंत निर्माण झाले. त्यांनीं स्वधर्माची व स्वातंत्र्याची प्रभातस्तोत्रें गाइली, ह्मणूनच महाराष्ट्राच्या इतिहासांत मराठी राज्याचें नांव सुवर्णमय झालें.

## भाग ४ था.

# शिवाजीची बांदलवर स्वारी.

मागील भागांत बांदल देशमुखासंबंधीं उपलब्ध झालेली माहिती दिलीच आहे. शिवाजी सन १६४३ त विजापुराहून परत आपल्या वडिलांच्या जहागिरीवर आला. त्यानंतर त्यांनीं आपल्या स्वातंत्र्याची मोहिम चालू करण्याचें राजकारण केलें. हें राजकारण चालू झाल्यापासून सुमारें तीन वर्षांत तें चांगल्या स्वरुपांत आलें. कोणत्याहि कार्याची सिद्धि होण्यास परिस्थिती अनुकूल लागतें. व काळहि अनुकूल लागतो. त्यास पुष्कळ अंतःकरणांची जरूरी लागते. तें करण्याकरितां हजारों, लाखों लोकांचें संगनमत व्हावयास पाहिजे, अशी एकजूट व एकजीव झाल्यावरच तें कार्य यशस्वी होण्याचा संभव असतो. स्वार्थासाठीं अहोरात्र धडपड करणार लाखों लोक सांपडतील, किंबहुना स्वार्थ साधण्यासाठीं हाडांची काडें करणें हा जन्मसिद्ध मनुष्य स्वभावच असल्यामुळें सारें जग स्वार्थाच्यामागें असतें. या जगांत पहिल्यापासूनच स्वार्थसाधु लोकांचें मनमुराद पीक झालेलें आहे, व होत आहे. अशा मनुष्यांच्या आयुष्य क्रमांत व एखाद्या क्षुद्र कीटकाच्या आयुष्यक्रमांत यत्किंचितहि अंतर दृष्टीस पडत नाहीं, अशा लोकांच्या मरणाबद्दल त्यांचे देशबांधव हळहळत नाहीं, व राष्ट्रांचा आत्मा तळमळत नाहीं, पण जे लोक स्वार्थावर, लाथ मारून स्वधर्मासाठीं, स्वदेशासाठीं व स्वराज्यासाठीं, आपल्या अंगास झीज लावून घेतात, किंवा वेळ पडली तर, आनंदानें मृत्युच्या जबड्यांत उडी घेण्यास तयार होतात, तेच जन्मास येऊन आपल्या देहाचें सार्थक करितात. तेच नरजन्माची योग्यता सिद्ध करून दाखवितात. तेच सगळ्या जगास वंद्य व पूजनीय होतात. असले लोक स्वार्थासाठीं आपले देह कष्टवितात. पण आपल्या धर्मबांधवांचीं मनें तोषवितात ! ते स्वदेशासाठीं स्वतःस झिजवितात, पण ते आपल्या देशबांधवांचीं अंतःकरणें रिझवितात ! ते आपल्या सत्कृत्यांनीं परमेश्वरास आळवितात, व स्वतःस स्वर्गाधि-

मुख मिळवितात! खरोखरच धर्मासाठीं शत्रूच्या अफाट सेनासमूहाला तोंड देऊन रणकुंडांत आपल्या प्राणांचीं पूर्णाहुति देणाऱ्या नरपंगुवांचें मरण, कितीतरी बोधपर व स्पृहणीय असतें? असले नर शार्दूल रणांगणीं मरतात, पण प्रलय कालापर्यंत कीर्तीरूपानें उरतात. हे स्वतः मृत्यु पावतात, पण आपल्या धर्माला, आपल्या राजाला व आपल्या देशबंधूंना जिवंत ठेवितात. हेच लोक आपल्या जन्माचें सार्थक करितात व नरदेह सफल करतात. एकंदरीत हेच खरे योगी, हेच खरे महंत व हेच खरे मर्दानी साधु होत. असे अनेक मर्दानी साधु, त्यावेळीं शिवाजीच्या राजकारणांत स्वखुषिनें येऊन मिळाले, तर कित्येकांस त्यानें हरप्रयत्नानें मिळवून घेतले. ह्मणूनच त्यांचें राजकारण थोडक्याच अवधींत फलद्रुप झालें.

उपरिनिर्दिष्टिल्या प्रमाणें जे लोक शिवाजीच्या राजकारणांत स्वयंस्फूर्तीनें येऊन दाखल झाले ते केवळ एकाच जातीचे होते असें नाहीं. ते अनेक जातीचें होते; परंतु त्या सर्वांनीं आपली अंतःकरणें मात्र एकच केलीं होतीं. त्यावेळीं त्यांची विचारसरणी केवळ एकाच ध्येयाची होती. त्यावेळीं त्यांच्यांत संगनमत होऊन जें राजकारण ठरविलें तें त्यांनीं मोंगल, मुसलमान, व हिंदू ह्यांच्या स्थितीचा पूर्ण विचार करूनच स्वीकारिलें. ह्यावेळीं दक्षिणप्रांत जरी मोंगलांचा होता, तरी तो सन १६३६ च्या तहान्वयें आदिलशहाच्या ताब्यांत गेला होता. मोंगलाकडून ह्या सह्याद्रिपर्वताच्या घांटमाथ्याचा बंदोबस्त झाला नव्हता, त्याचप्रमाणें आदिलशहाकडूनहि झाला नाहीं. इतकेंच नव्हे तर, ह्यावेळीं आदिलशाहीत योग्य मुत्सद्दीच नव्हता, व खुद्द बादशहा तर नालायकच होता. तशांत ह्यावेळचे आदिलशाहीचे हितकर्ते, ऐदी, चैनी व मिजासखोर बनले होते. त्यांच्या हातून घांटमाथ्याचा बंदोबस्त होणें शक्यच नव्हतें. हें जाणूनच **शिवाजीनें** आपल्या राजकारणांत जें ठरविलें, तें प्रथम डोंगराळप्रांत व तेथील पहाडी किल्ले आपल्या ताब्यांत घ्यावे. ह्मणजे त्या बाजूचा प्रांत आपणांस घेण्यास आयास पडणार नाहीं. ह्यांत दोन मुख्य हेतु होते. त्यांतील पहिला असा कीं, ह्या प्रांतांतील हिंदुलोक अनुकूल झाल्यावांचून हा प्रांत जाणें शक्य नाहीं. दुसरा हेतु असा होता कीं, डोंगरी किल्ल्याच्या आश्रयानें राहिल्यास यवनांशीं आपणांस थोडक्या लोकांच्या साह्यानें सहज झुंजतां येईल, व प्रसंग पडल्यास

२८२२

किल्ल्यांत आपणांस छपून बसून संरक्षणहि करून घेतां येईल. ह्याच दोन मुद्यावर प्रथम त्यांनीं आपलें राजकारण संघटित केलें. त्याप्रमाणें त्यांच्या राजकारणांतील लोकांनी तेथील किल्लेदारांस व देशपांडे, देशमुख वगैरे इनामदारासहि वश करून घेतलें. अशा प्रकारें आपलें स्वातंत्र्याचें राजकारण मावळ्या लोकांच्या सल्यानें व साह्यानें त्वरीत पूर्णत्वास आणिलें.

कोणतेंहि कार्य करितांना अगर तें यशस्वी होण्यास योग्य नेता लागतो. इतकेंच नव्हे, तर तें सर्व त्या वरच अवलंबून असतें. जेथें योग्य नेता नाहीं तेथें कार्य संघटित होणें शक्य नाहीं. याविळीं नेता, परिस्थिती व काळ ही त्रयी अनुकूळ झाल्यामुळें, अनेक जहागिरदार व इनामदार स्वराज्याच्या शपथा घेऊन या राजकारणांत मिळाले. त्यांच्या मनांत मोठी खळबळ उडाली. त्याविळीं त्यांच्या मनांत स्पष्ट विचार उत्पन्न झाला कीं, स्वदेशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं लढणें, हें आपलें कर्तव्य आहे. आपल्या देशावर यवनशाहीचा होत असलेल्या जुलमाचा प्रतीकार करण्याच्या प्रयत्नाला आपण हातभार लावलाच पाहिजे ! ही कल्पना त्यांच्या मनांत आली; तेव्हां पासून हें ध्येय जन्मभर त्यांच्या हृदयांत राहिलें. अस्तु ! याप्रमाणें शिवाजीच्या, स्वराज्याच्या व स्वातंत्र्याच्या मोहिमेस स. १६४५ त सुरवात होऊन, ह्या कार्याला प्रत्यक्ष प्रारंभ एक वर्षानें म्हणजे विजापूरकरांच्या तोरणा किल्यास तोरण बांधल्यापासून झाली. त्याविळीं शिवाजीच्या राजकारणांत सामील झालेल्या लोकांच्या अंगीं औदार्य, करारीपणा व एक राष्ट्रीयत्वाबद्दल दृढविश्वास, इत्यादि सद्गुण वसत असल्यामुळें राजकारणाची मोहिम चालू केल्यापासून थोडक्याच अवधांत अनेक प्रांत व डोंगरी किल्ले अन्य तऱ्हेनें त्यांस आपल्या ताब्यांत आणितां आले.

शिवाजीचा तो काळ ह्मणजे मराठ्यांच्या स्वातंत्र्य रत्रीचा उषःकाल ! अर्थात् प्रभातकालच्या कोंवळ्या व सुवर्णमय किरणांप्रमाणें मनाची उल्हासित वृत्ति करणारा असा होता. ज्याप्रमाणें दिनमणीच्या माध्यानकाळच्या तेजोमय किरणापेक्षां प्रभातकालचें आरक्त व बालकिरण मनास जास्त आनंद, उल्हास व उमेद उत्पन्न करितात, त्याचप्रमाणें तोरणा किल्यास तोरण बांधल्यापासून, त्यांनीं व त्याच्या कट्या साथीदारांनीं अनुपमेय पराक्रम करून सुमारें सात वर्षांच्या अवधींत पुणें,

सुपे जुन्नर वगैरे प्रांत आणि त्यांतील बरेच किल्लेहि आपल्या ताब्यांत आणिले. त्यावेळच्या त्यांच्या पराक्रमाची व स्वदेशाभिमानाची खरी कसोटी होते. बारा मावळांपैकीं कांहीं खोरीं ताब्यांत आली खरी; परंतु ह्यावेळीं त्यांस शत्रूहि उत्पन्न झाले, त्यांत सुपे प्रांताची व्यवस्था पाहणारा बाजी मोहिते हा एक होता. त्याजवर स्वारी करून त्यास धरून कर्नाटकांत पाठविलें. **शिवाजीनें** प्रत्यक्ष आपल्या मामाची अशी वासलात लाविली; हें ऐकून तेथील लोकांस फारच वचक बसली.

**शिवाजी** स्वातंत्र्य मिळविण्याकरितां स्वराज्य स्थापित आहे, व त्यास अनेक लोक मिळत आहेत, हें विजापूर दरबारी तेथील लोकांनीं कळविलें होते. हें मागील भागांत दिलेंच आहे; परंतु शिवाजीच्या स्वराज्याची मोहिम आपणांस डोईजड होईल. ही कल्पना निदानतरी त्यावेळीं त्यांस नसावी. त्यावेळीं हिरडस मावळांतील **बांदलदेशमुख** हा मावळांत स्वतंत्रच वागत होता, ह्यावेळीं त्याचें ताब्यांत निरानदीच्या दक्षिण तीराचा मुलूख पूर्वेस शिरवळ पर्यंत व दक्षिणेस कृष्णानदीच्या उत्तरेकडील डोंगरापर्यंतचा मुलूख असून त्या सर्वप्रांताचा वसूल तो प्रतिष्ठीतपणें घेत असे, तरी त्याचें वास्तव्य × रोहिडा किल्ल्यातच असे. हा **शिवाजी**चा कट्टाद्वेष्टा होता, इतकेंच नव्हे, तर **शिवाजी** आपणावर केव्हां तरी चालून येईल, त्याच्या स्वराज्याच्या चळवळींत आपलें साम्राज्य नष्ट होईल ! हें जाणून बांदलानें आपल्या किल्ल्याचा योग्य बंदोबस्तहि करून ठेविला होता. तरी **शिवाजी**चा होत असलेला उत्कर्ष ऐकून, त्यास मोठी दहशत पडली होती. **शिवाजी**कडून आपणांस मृतप्राय होण्याचा प्रसंग येऊं नये, ह्मणूनच तो विजापूरकरांस **शिवाजी**च्या हालचाली वारंवार कळवित असे. त्याचप्रमाणें अनेकाकडून शिवाजीच्या कागाळ्या विजापूरकराकडे जाऊं लागल्या. ह्या कागाळ्या केवळ शिवाजीच्या कृत्यांच्याच नसून त्यांत शिवाजीला स्वराज्य स्थापण्याच्या कामीं त्याच्या वडिलांची मदत आहे. अशाहि वातम्या असत.

**शहाजी**च्या पराक्रमाची जाणीव आदिलशहास पूर्ण होतीच, आणि जर शहाजी आपल्या मुलाला मदत करीत असेल, तर तो केव्हां तरी आपल्या

× हा किल्ला भोर नजीक रोहिड खोऱ्यांत असून त्यास हल्लीं विचित्रगड ह्मणतात.

राज्यावर आघात केल्यावांचून रहाणार नाहीं. अर्थात शहाजीचा बंदोबस्त केल्यावांचून आपला बचाव होणार नाहीं, असें आदिलशहानें निश्चित ठरवून, त्यानें शहाजीस गुप्त रीतीनें पकडवून आणून कैद केलें. आपल्या वडिलांची सुटका होईपर्यंत शिवाजीनें विजापूरकरांस उपद्रव दिला नाहीं. परंतु सन १६५३ त शहाजीची सुटका होऊन त्यांची पूर्ववत नेमणूक झाल्यानंतर शिवाजीनें विजापूरकराचा मुलूख कावीज करण्याचा पुनः जोराचा प्रयत्न चालू केला. त्यानें हा जो प्रयत्न चालू केला तो स्वतःच्या हिंमतीपेक्षां आपल्या जवान मर्द मराठे वीरांच्या मदतीनेंच केला. त्यावेळीं त्यांस कोणत्याहि जुन्या पुराण्या सरदार घराण्यांतील पोक्त व वयोवृद्ध सरदारांची मदत मिळाली नाहीं, इतकेंच नव्हे, तर केवळ शाब्दिक पाठबळहि मिळालें नाहीं. फलटणचे निंबाळकर, मोहिते, जाधवराव, पांढरे, घाडगे, घोरपडे, मोरे वगैरे आदिलशाहीच्या पिढिजाद सरदारांकडून त्यांस प्रत्येक वेळीं विरोधच होत असे.

शिवाजीनें लाविलेल्या स्वराज्याचा रोपा अनेक जवान मर्द मराठे वीरांच्या परिश्रमानें पल्लव युक्त झाला. चंद्रराव मोरे व बाजी घोरपडे यांची कोंड नाहीशी करून त्यानें आपला मोर्चा बांदल देशमुखाकडे सन १६५५ त वळविला. यावेळीं बांदल बारा मावळांत बराच शिरजोर झाला होता. त्यामुळें त्याजवर स्वारी करून त्यास चीत करणें शिवाजीस अवश्य होतें. त्यांत शिवाजीचा दुहेरी डाव होता. तो असा, त्याचा कांटा काढून टाकल्यावांचून आपलें स्वराज्य संघटीत होणें शक्य नाहीं, व दुसरें त्याच्या पारिपत्यानें सर्व घांटमाथा आपल्या ताब्यात येऊन कोंकणपट्टी घेण्यास सुलभ पडेल. अशी शिवाजीची बालंबाल खात्री झाली होती. या बांदलावरील हल्ल्यांत शिवाजीचा विश्वासू सरदार आबाजी विश्वनाथ यांनीं आपल्या शौर्याची व मुत्सद्दगिरीची शिकस्त केली. त्यानेंच प्रथम हेराचें काम करण्याचें पतकरून रोहिडा किल्ल्यांत जाऊन सर्व किल्ल्याची टेहळणी केली. त्यानंतर एके दिवशीं रात्री रोहिडा किल्ल्यांतील लोक गैर सावध असतां किल्ल्याला शिड्या लावून शिवाजी सह आपल्या मावळ्या लोकांचीं फौज घेऊन आंत उतरला. इतके लोक किल्ल्यांत अचानक आलेले पाहून, तेथील पहारेकरी घाबरून जाऊन जिकडे तिकडे पळूं लागले. किल्ल्यांत जिकडे तिकडे

आरडा ओरडा सुरू झाला. लोक जागृत होऊन स्वसंरक्षणार्थ पळूं लागले. **शिवाजीचे** लोक किल्यांतील चौक्या आपल्या ताब्यांत घेऊं लागले, व किल्ला लौकरच आपल्या ताब्यांत येईल, अशी त्यांस अशा व उमेद वाटूं लागली. त्यांची बांदलच्या ठिकाणापर्यंत प्रगति झाली. ह्या गोंगाटांत **बांदल देशमुख** व त्याचा **दिवाण बाजीप्रभु** हे जागे होऊन पहातात, तों किल्यांत मोठा कल्होळ चालू झाला आहे. लोक घाबरून अगदीं हवालदील झाले आहेत. हें पहातांच त्यांस फारच संताप आला. त्यांनीं आपली लढण्याची तयारी करून, शत्रूंबरोबर सामनाकरण्याचा आपल्या लोकांस इषारा दिला. हे लोक तयार होईपर्यंत **शिवाजीच्या** सैन्यानें बहुतेक किल्ला घेरून, महत्वाच्या जागा आपल्या ताब्यांत घेतल्या होत्या. बांदलचे लोक तयार होऊन शत्रूंबरोबर लढूं लागले. बांदल स्वतः आपल्या लोकांस उत्तेजन देत मोठ्या वीरश्रीनें शत्रूच्या सैन्यावर तुटून पडला. आपल्या या अचानक हल्यास हरकत होईल असें **शिवाजीस** वाटलें नव्हते. ही हातघाई अंधेरांत चालू असल्यामुळें, आपले लोक कोणते, व बांदलाचे लोक कोणते, हें समाजण्याकरितां **आवाजीप्रभूनें** तेथील गवताची गंजी पेटवून दिली. त्यामुळें किल्यांतील कांहीं घरेंहि जळाला. **आवाजी प्रभू** आपल्या लोकांस उत्तजन देत मोठ्या वीरश्रीनें लढूं लागला. ता प्राणाची पर्वा न करितां बांदलाचें लोक कापीत चालला. आपलें बरेंच लोक मृत्यु मुखीं पडलेले पहातांच, बांदल स्वतः **आवाजीप्रभुवर** चित्यासारखा झडप घालून आला. बांदल जरी वृद्ध होता, तरी तो लढाईंत पूर्ण मुरलेला होता. तर **आवाजीप्रभु** भर ज्वानीत असून, आपल्या अंगांत खेळत असलेल्या स्वदेशप्रीतीला कसोटीला लावण्याची सोन्यासारखी संधी आलेली पाहून, मोठ्या वीरश्रीनें लढत होता. या झटापटींत **आबाजीस** जरी चार वार लागले होते, तरी त्याचे त्यांस देहभानहि नव्हतेच. तो आपले पट्याचें खेळ खेळतच होता. त्याची व **बांदलाची** हात घाई चालू झाली. दोघेहि मोठ्या शौर्यानें व आवेशानें लढत होते. लढतां लढतां **आवाजीनें** कसा कांहीं सफाईचा वार केला, कीं तो **बांदलाच्या** मर्मस्थानीं बसला. त्यामुळें **बांदल** मूर्छीत होऊन पडला. आपला धनी पडला, हें पाहून त्यांचें लोक भयभीत होऊन सैरावैरा पळूं लागले. ह्यावेळीं **चरित्रनायक** दुसऱ्याबाजूस लढत होते. त्यांस आपला

धनी पडल्याची बातमी लागतांच, तो न डगमगतां शत्रूच्या लोकांचा खरपूस समाचार घेतघेत, व त्यांस यमसदनास पाठवीत, ज्यानें आपल्या धन्यास मृत्यु-मुखीं दिलें, त्यांस आपल्या तरवारीनें. मृत्युच्या दरबारी केव्हां पाठवीन, असें होऊन तो कर्दन काळाप्रमाणें **शिवाजी**च्या लोकांची कत्तल करूं लागला. तथापि शत्रूकडील लोक फार असून, त्यांनीं त्यांस घेरल्यामुळें **आवाजी**वर त्वरींत धांवून येतां आलें नाहीं. असो!

यावेळीं **बांदल देशमुख** आणि त्याचा **दिवाण बाजीप्रभु** या उभयतांनीं **शिवाजी** बरोबर जो सामना केला, अगर जे वर्तन केलें, तें त्यांनीं आपलें कर्तव्य कर्मच केलें. त्याबद्दल ते दोषास मुळींच पात्र नाहींत. आपलें ईष्ट कार्य सिद्धीस नेण्याकरितां ज्या प्रमाणें एखाद्याला नानाप्रकारांच्या युक्त्या योजाव्या लागतात, नानाविध प्रकारांचें प्रसंगोपात अवलंबन करावें लागतात. त्याप्रमाणें **शिवाजीस** अनेक प्रसंगीं युक्त्या योजाव्या लागत. राजापूर घेतांना **बाळजी आवजीस** आपल्या बरोबर घेतलें, व जावळी घेल्यावर **मुरार बाजी देशपांडे** यांस आपल्या पक्षांकडे वळवून घेतांना, त्यांस प्रयोग करावा लागला. त्याच युक्तीचा कांहींसा रोहिडा किल्ला घेतांना **चरित्रनायकाशीं** प्रयोग करावा लागला. प्रत्येक वेळीं, त्यांना त्यांच्या समशेरीचाच उपयोग झाला, आणि तिच्या कर्तबगारीमुळेंच त्यास प्रत्येक वेळीं यश आलें, असें मात्र झालें नाहीं. तसाच सामनेवाला भेटून जेव्हां दोघांच्या तरवारी एकमेकांवर आपटून **शिवाजी**च्या तरवारीला मागें परतण्याची पाळी येई, तेव्हां त्यांस सामाचा प्रयोग करावा लागे. त्याप्रमाणें तो ते करितहि असेल, व तसें करण्यांत त्यांस यशहि येत असे.

रोहिडा किल्यावर त्यांचा हल्ला झाला, तेव्हां **बांदल देशमुख** आणि त्याचें **दिवाण** यांनीं किल्ला लढविण्यांत आपलें शौर्य, त्यांच्या चांगलेंच निदर्शनास आणिलें. उभयतांचा बराच वेळ सामना होऊन बरोबरी झाली. बांदलची फौज किल्यांत थोडी व गैरसावध होती, शिवाजीच्या मोठ्या फौजे पुढें, आपला फार वेळ टिकाव लागणार नाहीं. ही त्यांची पक्की खात्री होती. परंतु त्यांनीं त्यांच्या मोठ्या फौजेशीं दोन हात करण्यास मुळींच मागें घेतलें नाहीं. **चरित्रनायका**चा हल्ला इतक्या त्वेषाचा होता कीं, आत्मसमर्पणासाठीं त्यांचें मध्यें जणूं काय अहमहमिका लागली होती. आपलें बरेंच लोक खर्ची पडलें. शत्रूनें

महत्वाच्या जागा काबीज केल्या, हा केवळ संख्याबळापुढें त्याचा निरुपाय झाला, तरी तो स्वतः एक रेसभरहि मागें पाऊल घेईना. प्राण गेला तरी बेहेत्तर. पण शत्रूला पाठ दाखवावयाची नाहीं. असा त्याचा निर्धार होता. यावेळीं त्यानें दाखविलेलें शौर्य इतिहासामध्यें संस्मरणीय आहे. या हल्यात बांदला-बरोबर लढणारे बहुतेक लोक मावळेच होते. **चरित्रनायकाच्या** पराक्रमाची जाणीव **शिवाजीस** पर्यायानें पूर्ण झालेली होतीच; परंतु ह्यावेळीं त्याचें शौर्य प्रत्यक्ष निदर्शनास आले. अर्थात अशी **वीर-रत्नें** हट्टास पेटून उगीच हातचा घालविण्यांत अर्थ नाहीं, त्यांचा संग्रह करण्यातच खरा अर्थ आहे. मग तो करण्यास सत्कृदर्शनीं थोडिशीं पडखावी लागली, किंवा कमीपणा पत्करावा लागला. तरी त्याची बिशाद शिवाजीस वाटत नसे; ह्या मुख्य धेयाकडे लक्ष देऊन, त्यांनीं त्या शूर पुरुषांशीं हल्ला चालू असतांना सामाचें बोलणें लाविलें. ती हकिकत पुढील भागांत देण्यांत येईल.

# भाग ५ वा.

## शिवाजी बाजीस अंकित करितो.

शिवाजीनें चरित्रनायकावर सामाचा प्रयोग केला. हें मागील भागांत दिलेंच आहे. कदाचित सत्कृदर्शनीं हें शिवाजीचें कृत्य कोणासहि कमकुवत पणाचें वाटेल हें खरें! परंतु शिवाजीचा मुख्य हेतु अशीं वीर-रत्नें हट्टास पेटून मृत्युमुखीं पडतील, तीं न पडावीं, त्यांचा संग्रह करावा, असा होता. आणि याच हेतूनें त्यानें चरित्रनायका बरोबर सामाचें बोलणें लाविलें. हें बोलणें करण्याचें काम त्यानें आपल्या विश्वासांतील आबाजी विश्वनाथ दिघे याजकडे सोंपविलें होतें. आबाजी ह्या स्वारीत जसा मुख्य लढणारा तसाच मुख्य हेरहि होता.

बांदल पडल्यानंतर चरित्रनायका बरोबर लढण्यांत शिवाजी थोडा पड खाऊं लागला, तेव्हां त्यांस आपणा बरोबर लढण्याचें चरित्रनायकानें अवाहान केलें, तरी सुद्धां शिवाजी लढेना तथापि चरित्रनायक कांहीं कमी पडेना. तेव्हां आबाजी चरित्रनायका समोर झाला. हें पाहातांच त्यांस विशेष त्वेष चढला. त्याचें बाहूस स्फूरण चढलें व आतां हा आपल्याबरोबर सामना करणार, हें जाणून तो मोठ्या उत्सुकतेनें त्याबरोबर सामना करण्यास पुढें सरसावला. आपण आपल्या धन्याच्या मृत्युचा सूड घेण्याकरितां व किल्ल्याच्या संरक्षणाकरितां शत्रूबरोबर दोन हात करूं, अशी त्यास भावना झाली. पण ती व्यर्थ गेली. त्यावेळीं तो देहभान पार विसरून गेला होता. हें आबाजीनें जाणून तो मोठ्यानें ओरडून बोलला कीं, “ आपण शूर व पराक्रमी आहात, हें मी जाणून आहें. हें युद्ध आहे. त्यांत परमेश्वर यश अपयश कोणांस देईल, याचें अनुमान करितां येणार नाहीं, तशांत आपण स्वज्ञातीय व आप्त असल्याकारणानें, आपणांबरोबर दोन हात करणें

मला बरें वाटत नाहीं. तुमचा धनी पडला. तुमचें बरेच लोक मृत्यु पावले. महाराजांचें सैन्य अफाट आहे, व अनेकवीर त्यांच्या संग्रहीं आहेत. तेव्हां तुम्ही व्यर्थ श्रम करून काय उपयोग ? आपली तरवार मागें घ्या, व मजबरोबर दोन शब्द बोला." हें **आबाजीचें** भाषण ऐकून चरित्रनायक ज्या जोमानें लढण्यास पुढें सरसावला होता. तो जोम क्षणीक कमी झाला. आतां आपणांस धनी नाहीं व इतक्या तुटपुंज्या तयारीनें उठावणी करणें हें मर्दुमकीचें असलें तरी वेडेपणाचें आहे. **शिवाजी** किल्ला तर हस्तगत करून घेणार, मग आपल्या हट्टामुळें आपलें सैन्य बळी देण्यांत अर्थ कोणता ! हा विचार करून **चरित्रनाकांनीं** आपली तरवार खाली ठेविली. व दोघेहि वीर एकमेकांस भेटले. त्यांचें कुशलतेचें भाषण झाल्यावर **आबाजीनें चरित्रनायकांस** सांगितलें कीं, " तुमचे अब्रुस यत्किंचित्हि कमीपणा न येतां तुमचें मर्जीप्रमाणें व योग्यतेनुसार **महाराजा**-कडून तुमचें चीज करवीन " अशा प्रकारें भाषण करून **आबाजी विश्वनाथानें चरित्रनायकांस** आपल्या तर्फेला वळवून घेतलें आणि रोहिडा किल्ला शिवाजीच्या ताब्यांत गेला.

वर दिल्याप्रमाणें **चरित्रनायकांनें** आपली तरवार खालीं ठेवून, ते **आबाजीस** भेटले, अर्थात त्यांच्या कुशलतेच्या गोष्टी झाल्यानंतर **शिवाजीनें** त्यांची प्रत्यक्ष गांठ घेतली. **चरित्रनायकाच्या** या पहिल्या भेटीच्या वेळीं, शिवाजीनें त्याच्या शौर्याची योग्य प्रशंसना करून उत्तम पोषाख त्यांस दिला. यावेळपर्यंत **चरित्रनायक** अदिलशाहाच्या सरदाराचें दिवाण असून **शिवाजीचे** शत्रू होते. तें आतां मित्र झाले, व त्यांस **शिवाजीनें** मोठ्या सन्मानानें आपल्या बरोबर घेतले. **शिवाजी** परत आल्यानंतर **चरित्रनायकांस** आपल्या सैन्यांत **सरदारी** देऊन व त्यांचीं पूर्वीचीं वतनें त्याजकडे चालू ठेवून, आपली गुणग्राहकता आणि कोणाहि मनुष्याच्या आंगच्या खऱ्या गुणाची पारख करण्याची आपली शक्ती व्यक्त करून स्नेहसंबंधानें त्यांस कायमचें आपलेसें करून टाकिलें. इतकेंच नव्हे, तर त्यांचें बंधू **फुलाजी** यांसहि **शिवाजीनें** आपल्या पदरीं ठेविलें. रोहिडा किल्यावरोबर त्यास या शूर पुरुषांचाहि लाभ झाला. **चरित्रनायक** यावेळ पर्यंत जे बांदलाचे दिवाण होते, ते आतां **शिवाजीच्या सैन्यांतील धारकरी, पायदळाचे एक सरदार बनले.** कोणी घोड्यावर बसून युद्ध-

करण्यांत, कोणी तोफा डागण्यांत तर कोणी दांडपट्टा खेळण्यांत, तर कोणी भाला फेंकण्यांत जसें तरबेज असतात, त्याच प्रमाणें **चरित्रनायक** हे **धारकरी** ह्मणजे हातांत तरवार किंवा पट्टे चढवून समोरासमोर लढण्यांत मोठे पटाईत होते. ह्मणून त्यांस **शिवाजीनें** त्यांच्या योग्यतेप्रमाणें धारकरी मावळे पायदळ लोकांचीं सरदारी दिली.

**चरित्रनायकांची** व **शिवाजीची** ही पहिली भेट झाली, पण ती अगदीं कायमची झाली. मागें दिल्याप्रमाणें, राजापूराबरोबर **बाळाजी आवजी**, चाकणाबरोबर **फिरंगाजी नरसाळा**, जावळी बरोबर **मुरार बाजी** हीं **थोर** आणि **शूर-वीर-रत्नें** त्यांस मिळालीं. तसेंच रोहिडा किल्याबरोबर **बाजीप्रभु** हें एक **वीर-रत्न** शिवाजीला मिळालें. हीं अशीं दुर्मिळ **नर-रत्नें** नेहमींच मिळत नसतात. तीं महत् प्रयासानें व सुदैवानेंच मिळतात. अशी महाराजांचीं बालंबाल खात्री असल्यामुळें, ती मिळविण्याचा योग आला असतां, तो ते सहसा फुकट जाऊं देत नसत. इतर **रत्नापेक्षां** ते अशा निवडक नर-रत्नांचा संग्रह मोठ्या उत्कंठानें करीत असत. त्यांच्या पूर्वींच्या **नर-रत्न-भांडारांत बाजीप्रभु** या **वीर-रत्नाची** आणखी भर पडली.

वर दिल्याप्रमाणें **चरित्रनायक** महाराजांचें अंकित झाले, इतकेंच नव्हे, तर त्यांचा पूर्वापार संबंध जडला. तो असा कीं, **चरित्रनायकाचें** वडील **कृष्णाजी देशपांडे** हे **शहाजी राजे** यांचें दरबारी होते. तर **चरित्रनायक शिवाजी राजे** यांच्या दरबारी राहिले, व पुढें भोसले व देशपांडे, यांचा संबंध परंपरा चालूच राहिला. असो! **चरित्रनायकास** मोठ्या आदरानें **शिवाजीनें** ठेविले. त्याचप्रमाणें त्यानें बाणेदारपणानें जें करावयाचें ते स्वराज्याच्या उत्कर्षाकरितां आमरणें कर्तव्यकर्म केलें. असें अंतःकरण रिझविणारें **वीर** कोठेंहि झाले तरी विरळाच.

वरील हकिकतीवरून पाहतां, शिवाजीनें ह्या दोन स्वाऱ्या करून काय मिळविलें बरें! तर दोन **नर-रत्नें** पैदा केलीं. हाच त्यांचा हेतू होता काय? असेलहि, ह्याशिवाय ह्या दोन स्वाऱ्यामुळें सर्व घांटमाथा **शिवाजीच्या** ताब्यांत आला, आणि अशा रीतीनें विजापूर करांच्या सरहद्दीला त्यानें आपल्या राज्याची

सरहद्द जोडली. हा केवढा लाभ झाला! परंतु त्याहि पेक्षां दोन रत्नें पैदा झाल्यामुळें, घांटमाथ्याचा बंदोबस्त करणारें वाकबगार मिळाले, त्यांच्यापुढें ह्या प्रांतात कोणीहि पुंडावा करूं शकणार नाहीं. व पुढील इष्ट कार्य आपणांस सुसंघटीत करितां येईल, व तें चिरंतन होईल. याच दूर दृष्टीनें **शिवाजीनें बाजीस** अंकित केलें.

यावेळीं कल्याण पासून पन्हाळगडा पर्यंतचा प्रांत व बहुतेक कोकणपट्टी **शिवाजी**च्या ताब्यांत आली. त्यामुळें विजापूरकरांना शह लागून सिद्दीवर स्वारी करण्यास त्यांस फार सुलभ झालें. असो! **चरित्रनायकास** शिवाजी आपल्या बरोबर घेऊन आला. या संबंधीं एक पत्र म. सा. व. १ लें अंक १ ला. प. २ रें प्रसिद्ध झालें आहे. ते खुद्द चरित्रनायकाच्या मुलानें लिहिलेलें असून विशेष महत्वाचें आहे. म्हणून येथें देतों—"कैलासवासी स्वामी राज्य * * * बाजी, देशमुख कृष्णाजी नाईक बांदल * * * ऊन राजश्री दादजी कोंडदेऊ यासी युद्ध प्रसंग करून गेर रुजु जाला त्यावरी राजश्री दादाजीपंत ( येथें " स्वामीनी " असावेंसें वाटते ) कृष्णाजी बांदल देशमुख धरून चौरंग § केले. त्याचे वतन अमानत केलें. त्यास आपले बाप **बाजीप्रभु** व दीपाई बांदल देशमुखीण व देशकअमा × × × × पत्र घेऊन राजश्री + + + स्वामीपासी हुजूर हाजीर जाले. त्यावरी राजश्री स्वामीस आपले बाप **बाजीप्रभु** याणी इनामती गांव व इनाम सेतें येविसी अर्ज केला. त्यास राजश्री स्वामीनी अभेये दिल्हे कीं, मसलत सुरु जाली यावरी तुमचें तुह्मांस देऊं **ह्मणून बराबर घेऊन गेले. कित्येक स्वामी कार्ये केले.** त्यास **पनालाहून विशाल गडास येतां गजापुरी युद्ध जालें तेथें साहेब कामावरी आपले बाप बाजीप्रभु पडिले** या करितां वतनाचा प्रसंग होऊन आला नाहीं. आपण घ्यावें तरी आपला नेणतपणा याकरितां राहिलें. त्यावरी करून घ्यावें तों राजश्री स्वामीनीं कुलवंतदारांचीं वतनें अमानत + करून मोईनी + करून दिधली. त्यावरी तुलापुर प्र॥ पुणें येथें अवरंगजेब पादशहा याचा मुकाम जाला, तेथें निजामशाही व

§ हातपाय तोडले. + जप्त. + ठराविक नेमणूक.

अदिलशाही व कुतुबशाही यैसे कुलवंतदार जमा जाले × × × " हें पत्र **चरित्रनायका**चें पुत्र **बावाजीप्रभु** यांचे असावे व ते १६८९ नंतरचे लिहिलेलें असावें.

वरील पत्रांत " त्यास राजश्री स्वामींनीं अभेये दिल्हे कीं, मसलत सुरु जालीयवरी तुमचें तुह्मांस देउं ह्मणून बराबर घेऊन गेले. कित्येक स्वामीकार्यें केले. त्यास पनालाहून विशाळगडास येतां गजापुरीं युद्ध झालें तेथें साहेब कामावरी आपले. **बाप बाजीप्रभु** पडले. " यावरील पत्राच्या उल्लेखावरून **चरित्रनायका**च्या इतिहास प्रसिद्ध कामागिरीवर उत्कृष्ट प्रकाश पडतो.

# भाग ६ वा.

## पन्हाळ्यास वेढा.

शिवाजीनें विजापूरकरांच्या दोन सरदारांची वासलात लावून, त्यांच्या ताब्यांतील मुलूख आपल्या राज्यांत सामील केला, तरी विजापूरकर स्वस्थ कसे बसले, हा प्रश्न साहाजिकच उद्भवतो ! या वेळीं शिवाजी हा आपल्या ताब्यांतील एका सरदाराचा मुलगा आहे, अगर तो पुण्यांतील एका जहागिरीचा मालक आहे, ह्मणून विजापूरकर स्वस्थ बसले नाहीत. तर ह्या वेळीं दरबारांतील मंडळींचा कमकुवतपणा, कदाचित् असू शकेलहि. एकदां संकटें येऊं लागलीं, ह्मणजे तीं अनेक येतात. शिवाजी हाच यावेळीं त्यांस शत्रू नसून खुद्द दरबारांतील लोक आपले स्वार्थ साधण्यांत गुंतले होते, तर औरंगजेब सर्व अदिलशाही खंडणी न पोंचल्याच्या निमित्यानें गिळंकृत करण्याकरितां धांवून येत होता, अशा परिस्थितींत शिवाजीचें पारिपत्य कसें होणार ! ह्याच सुमारास महंमद अदिलशहा सुमारें वर्षभर आजारानें अत्यावस्थ होता. त्यावेळीं विजापूर प्रांतीं फारच अंदाधुंदी झाली. त्याचा बंदोबस्त करण्याकरितां आदिलशहानें कोंकण प्रांताच्या बंदोबस्तास असलेला मुल्लाअहंमद यांस कोंकणांतून विजापुरास नेलें. तो जातांच कोंकणचा सर्व मुलूख मोकळा पडला. ही संधी शिवाजीस उत्तम साधली. त्यानें विजापूरकरांचें कोंकण प्रांतांतील किल्ले घेण्याचा जोराचा प्रयत्न केला. इतक्यांत महंमद आदिलशहा विजापुरास ता. १५ नोव्हेंबर १६५६ त मरण पावला. त्याचा मुलगा अली आदिलशहा गादीवर बसला तो अज्ञान. जुने मुत्सद्दी व राज्याचें हितचिंतक अगोदरच नष्ट झाले होते. शिवाजीचा बंदोबस्त पूर्वीप्रमाणें शहाजीस पकडून करावा, तर ह्या वेळीं शहाजी फौजबंद असून सावध आहे. व जर तो उलटला तर सर्व कर्नाटक प्रांत हातचा जाईल इतकेंच नव्हे, तर आपल्या राज्यासहि धोका येईल. बरें शिवा-

जीच्या पारिपत्यास लागावें, तर तो मोंगलास जाऊन मिळेल, व आपणांवर भयंकर आपत्ति उद्भवेल. ह्या अनेक भीतीस्तव विजापूरकरांनीं **शिवाजी**च्या बंदोवस्ताची दिरंगाई केली. इतक्यांत औरंगजेबानें मागील खंडणी वसूल करण्याकरितां आपला सरदार मीरजुमला यांस विजापुरास पाठविलें. तो विजापुरास वेढा देऊन बसला. इतक्यांत दिल्लीस शहाजहान बादशहा फारच आजारी आहे, असें कळतांच औरंगजेब दक्षिणेंतून उत्तरेस निघून गेला. जातांना त्यानें मीरजुमलास परत बोलाविलें. तेव्हां तो विजापुरावरील वेढा उठवून परत गेला. मोंगलांच्या अरिष्टांतून मोकळे झाल्यानंतर विजापूरचें दरबारानें **शिवाजी**च्या पारिपत्याचा विचार चालू केला. या चार पांच वर्षाच्या अवधींत शिवाजीनें बहुतेक घांट माथा व कोंकणप्रांत आपल्या ताब्यांत आणिला. तेव्हां विजापूर दरबारास फारच दहशत पडली. त्यांचीं बालंबाल खात्री झाली कीं, **शिवा**जी लौकरच आपल्यावर चालून येईल, व आदिलशाही पार जमीन दोस्त करील. कारण यावेळीं त्याचा सर्व प्रयत्न आदिलशाहीचे लचके तोडण्याचाच होता. व जवानमर्द मराठे वीर आपल्या शुद्ध व सतेज रक्तानें आपला पराक्रम गाजवीत होते. त्याजबरोबर सामना करण्याकरितां अफझुलखान या सरदारास शिवाजीवर पाठविला. त्याचा वध * **शिवाजी**नें ता. १७ नोव्हेंबर १६५९ त केला.

अफजुलखानाचा वध झाल्यानंतर, त्याच्या सैन्याची वाताहात झाली. त्यावेळीं त्याचा मुलगा फाजलखान मोडक्यातोडक्या अवशिष्ट राहिलेल्या सैन्याबरोबर अगदीं दैनावस्थेंत, विजापुरास जाऊन दाखल झाला. आपल्या बापाचा वध ज्यानें केला त्याचा सूड घेण्याकरितां त्यानें दरबाराची प्रार्थना केली. ह्यावेळीं **शिवाजी**चें पारिपत्य करणें हेंच विजापूरकराचें ध्येय होतें. अर्थात ह्या करितां जो तयार होईल, त्यांस दरबारांतून परवानगी मिळणें अशक्य नव्हतें. फाजलखानास परवानगी मिळाली. नवीन फौज तयार होऊन आणि नवीन शूर सरदारांची निवडणूक करून, या नवीन फौजेस शिवाजीवर नवीन मोहीम करण्याकरितां निघण्यास चार पांच महिन्यांचा अवधी लागला. या अवधींत शिवाजीनें पन्हाळा मार्गशिर्ष वद्य ९ ला घेऊन पावनगड, रांगणा, वसंतगड वगैरे

* ह्याची हकिकत मावळा सरदार विश्वासराव नानाजी दिघे देशपांडे यांचें चरित्रांत दिली आहे. ती अवश्य वाचावी.

सह्याद्रिवरील बहुतेक सर्व किल्ले व त्याखालील मुलूख सन १६६० च्या एप्रील पर्यंत हस्तगत करून घेतला. यावेळीं **चरित्रनायक** व त्यांचे बंधु फुलाजी **शिवाजी** बरोबर होते.

यावरील प्रांताची हद्द म्हटली म्हणजे, कोल्हापूर प्रांत बत्तीस शिराळ्यापर्यंत शिवाजीच्या ताब्यांत आला. कोल्हापूर प्रांतांतील खेळणा आणि रांगणा, हे दोन किल्ले छापे घालून व थोडीशी लढाई करून त्यांस घ्यावे लागले. हें काम फक्त चारपांच महिन्यांतच झालें. ह्यावेळीं कोल्हापूर प्रांतांतील पन्हाळा किल्यावर शिवाजीनें आपलें मुख्य ठाणें ठेविलें होतें. " खेळणा " किल्ला घेतल्यावर त्याची विशालता पाहून त्याचें नांव " विशाळगड " असें ठेविलें. ह्या किल्याचें यावेळपर्यंत साडे सहाशें वर्षे चालत आलेलें " खेळणा " हें नांव मोडून " विशाळगड " हें नांव प्रचारांत आलें. शिवाजीचें ह्या किल्यावर यावेळीं ठाणें असल्यामुळें, तेथें फौजेचा वगैरे उत्तम बंदोबस्त करून ठेविला होता. आणि पावनगड, रांगणा, भुदरगड, सामानगड वगैरे आसपासच्या सर्व किल्यावर साधारण बंदोबस्त करून ठेविला. त्याचप्रमाणें पन्हाळ्यापासून थेट विजापुरापर्यंतहि **शिवाजी** एकदां याच वेळीं स्वारी करून आला. ही स्वारी माघ शु ॥ १४ रोजीं केली.

**शिवाजी**च्या ह्या स्वारीनें विजापूरकरांची फारच त्रेधा उडाली. ह्यावेळीं विजापूरकरांचा सिद्दिजोहार म्हणून एक सरदार होता. तो जवळ जवळ अफजुलखानाच्या स्वभावाचा होता, त्यांस मुद्दाम फाजलखानाच्या मदतीस देऊन **शिवाजी**वर पाठविलें. ते दोघे सरदार शिवाजीचा पाठलाग करीत, कोल्हापूर प्रांतीं पन्हाळ्याकडे आपल्या ताज्या दमाची प्रचंड फौज घेऊन आले. यावेळीं **शिवाजी** पन्हाळगड किल्यांत आपल्या निवडक लोकांसह राजकारणात गुंतला होता. त्या राजकारणांत जी कित्येक मंडळी होती, त्यांत नुतन सरदार पदास चढलेलें तरवार बहाद्दर आमचे **चरित्रनायक** आपल्या धारकरी लोकांसह होते. अशा ऐनप्रसंगीं वेढा घातल्यामुळें, त्या वेढ्यांत हे सर्व आडकले. हा वेढा सन १६६० च्या मे महिन्यांत पडला.

सिद्दीजोहार व फाजखान याजबरोबर अफाट सैन्य होते, हें वर दिलेंच आहे. त्यांनीं किल्यास मजबूत वेढा दिला. त्यामुळें बाहेरील रसद आतां जाण्याचें बंद

झालें. शत्रूनें किल्यास वेढा घातल्यामुळें महाराज आंत कोंडले गेले, ही बातमी समजतांच जिकडे तिकडे कल्होळ उडाला. शिद्दीजोहार किती दुष्ट स्वभाचा होता, हें बहुतेकांस माहितच होते. शिवाजी त्यांच्या पुऱ्या कबज्यांत सांपडला, असें कित्येकांस वाटलें. फाजलास तर अत्यानंद होत होता. त्यानें त्याच वेळीं प्रतिज्ञा केली कीं, ज्यानें माझ्या पित्याचा वध केला, त्यांस मीं आतां जिवंत सोडणार नाहीं. सिद्दीची फौज केवळ वेढाच घालून स्वस्थ बसली नव्हती. तिनें किल्यांत जाण्याचें सर्व मार्ग बंद करून किल्ला पाडण्यास मोर्चे चढविले. तथापि शिवाजीचे बाहेरील लोक कांहीं स्वस्थ बसले नव्हते. त्यांनी बाहेरून सिद्दिच्या फौजेवर अचानक हल्ले करण्याची व त्यांस बाहेरून रसद मिळविण्याचें बंद केले. त्यामुळें किल्यांतील लोकांस बराच विसावा मिळत असे. हा वेढा सुमारें चार महिने पडला होता, त्यामुळें किल्यांतील लोकांस जेरीस येण्याचा प्रसंग येऊं लागला. बाहेर पडण्याचा इलाज चालेना, युद्ध करून अशा मोठ्या सैन्याचा वेढा उठविण्यास लागावें, तर विनाकारण प्राणहानि फार होईल. याकरितां कांहीं युक्तिप्रयुक्तीनेच बाहेर पडलें पाहिजे. शत्रूच्या हातावर तुरी कशा द्यावी हें शिवबास चांगलेंच अवगत होतें. आपण बाहेर पडल्या खेरीज शत्रूचें पारिपत्य होणार नाहीं, ही त्याची खात्री होती. व हीच मसलत त्यांनीं आपल्या लोकांत ठरविली. किल्यांतील सर्व लोक जरी स्वस्थ होते, तरी बाहेरच्या लोकांनीं सिद्दिच्या सैन्यास पुरें पछाडिलें होतें. अंधेऱ्यारात्रीं तर त्यांस केव्हांच स्वस्थता दिली नाहीं. असा त्यांचा कोंडमारा झाल्यामुळें, ह्या चार महिन्याच्या वेढ्यानें शत्रूंचें लोक अगदीं जेरीस आले होते. किल्यावर चढून जाणें तर त्यांस शक्यहि नव्हतें. असा त्यास दोहिकडून मार खावा लागत असे. तेव्हां त्यांनीं किल्यावर चढून जाण्याचें बंद केलें, व वेढ्याची मजबूती करून त्यांस बसावें लागलें. शत्रूच्या सैन्याच्या स्वस्थतेचा फायदा शिवाजीनें घेऊन किल्यांतील लोकांची वैरणाची वगैरे भरती करून आपण खासा स्वारी कोणत्या तरी रीतीनें पन्हाळ्यांतून बाहेर पडण्याचा निश्चय केला. या गोष्टीस महिना त्यांस पंधरा दिवस काढावें लागले.

शिवाजीनें त्या वेढ्यांतून कोणत्या तरी युक्तीनें अगर पराक्रमानें निसटून जाण्याची तयारी केली, आणि तो बेत एका अंधेऱ्यारात्रीं त्यांनीं सिद्धीस

नेण्याचें ठरविलें. त्या प्रमाणें पन्हाळा किल्याच्या मागील तटाचा बंदोबस्त करून, वेढा घातलेले लोक गाफील असतांना आपल्या निवडक लोकांसह विजापूरकरांच्या फौजेच्या वेढ्यांतून तो **आषाढ वद्य १** रोजीं रात्रीं पार निसटून गेला. त्यावेळीं बरोबर किती लोक होते, हें मात्र नक्की सांगणें अशक्य आहे. त्याचप्रमाणें कोण कोण सरदार मंडळी होती, हेंहि नक्की सांगतां येत नाहीं. परंतु **चरित्रनायक** मात्र बरोबर होते. ते किल्याच्या मागील तटावरून उतरले, व वाटेंत ठेवलल्या सुमारें पांच सहा हजार पायदळ सैन्यांत येऊन मिळाले.

शिद्दिजोहार मराठ्यांचा कावा पूर्ण जाणून होता. तो कधींच झोंप घेत नसे. **शिवाजी** आपल्या लोकांसह पन्हाळ्यांतून उतरला, त्याची हालचाल त्याच्या कानांवर पडली, त्याची चौकशी करून त्यानें घोरत पडलेल्या फाजलखानास जागें केलें, व आपल्या सैन्याची तयारी करून तो मराठ्यांना पकडण्याकरितां त्यांच्या मागें धांवला. त्यावेळीं शिवाजी विशाळगडाकडे जात आहे, असें त्यांस दिसलें व शिवाजीसहि आपला शत्रू आपल्या पाठीवर येत आहे, असें त्यानें पाहिलें. ह्मणून ते शक्य तितक्या त्वरेनें आपलें ठिकाण गांठण्याचा प्रयत्न करीत होते. शिवाजी आपल्या लोकांसह विशाळगडाकडे गेला. ह्या संबंधीं प्रत्यक्ष पुरावा पुढील भागांत देण्यांत येईल.

---

# भाग ७ वा.

## विशाळगड कां रांगणा ?

विशाळगड या किल्ल्याचें पूर्वीचें नांव "खेळणा" असें होतें. हें मागील भागांत दर्शविलेंच आहे. कित्येक बखरकारांनीं व अधुनिक इतिहासकारांहि **शिवाजी** पन्हाळ्यांतून निघून **रांगण्यावर** गेला, असें दिलें आहे. तें सर्वस्वी चुकीचें आहे, हें खालील माहितींवरून सिद्ध होतें. व रांगण्याच्या खिंडींत जो युद्धप्रसंग झाला असें ह्मणतात, तो तेथें नसून विशाळगडाच्या खिंडींत झाला; या बद्दल प्रत्यक्ष प्रमाणें आहेत. तीं—पन्हाळ्या पासून वायव्य दिशेला ३५ मैलांवर **गजापूरच्या** डोंगरावर "विशाळगड" किल्ला आहे. त्याची लांबी सुमारें ३२०० फूट व रुंदी सुमारें १०४० फूट आहे. खोरीं सुमारें ३००० फूट खोल आहेत. याचें क्षेत्रफळ सुमारें २३५ चौरस मैल आहे. किल्याच्या चारीं बाजूला डोंगराच्या रांगा असून त्यांच्यामध्यें भयंकर खोल अशीं खोरीं आहेत. त्याला पूर्वेकडून आणि पश्चिमेकडून अशा दोनच अगदीं अरुंद, एक घोडेस्वार जेमतेम जाईल अशा वाटा आहेत. पूर्वेकडील वाट बंदच आहे. चारी बाजूस डोंगराच्या रांगा व मध्यें सुमारें तीन मैलांच्या घेराचा डोंगर, यामुळें मुलांच्या पाळण्यावर ज्याप्रमाणें "खेळणें" उलटें बांधलें असतें, त्याप्रमाणें त्या किल्याला आकार आला असल्यामुळें, त्याला "खेळणा" हें नांव पडलें असावें, असा तर्क आहे. कारण त्याचा आकारच तसा दिसतो. ह्मणूनच शत्रूंस लढण्यास हा किल्ला फार विकट, त्याच्या विकटपणानें अनेक प्रसंगीं शत्रुसैन्यास खेळविलें आहे. ह्मणूनहि त्यांस "खेळणा" हें नांव पडलें असेल. पण अमुकच कारणामुळें त्यास "खेळणा" नांव पडलें असेल, हें निश्चित ठरवितां येत नाहीं. हा किल्ला कोल्हापूरच्या भोजराजांनीं इ. स. १००० च्या सुमारास बांधून, तेथें तो वास्तव्य करून असे. असे कित्येक शिलालेख व

तांब्रपटावरून दिसतें. या भोजराजानें असेंच आणखीं १५ किल्ले बांधिले. पन्हाळा किल्लाहि त्यापैकींच असावा. " खेळणा " हें नांव इ. स. १००० पासून १६६० पर्यंत चालत होतें. भोजराजाच्या वेळीं शिलहार राजांचा अंमल शिखरास पोंहचला होता. सिंहणदेव ( शिंगणदेव ) यांनीं सन १२१५ त भोजराजाच्या वंशजाचा पराभव केला. पुढें हा किल्ला मुसलमानांच्या हाती जाईपर्यंत, यादवाकडेच होता. सन १४६९ त महमद गवानानें खेळण्यावर स्वारी केली. त्यावेळी तेथील अधिकारी शंकरराय होता. तो मोठा शूर, व मतलबी होता. त्यानें गवनास दाद दिली नाहीं. गवान पांच महिने किल्यास वेढा घालून होता. बरसातीमुळें त्यांस वेढा उठविणें भाग पडलें. बरसातीनंतर त्यानें पुनः खेळण्यावर स्वारी केली, आणि युक्तिप्रयुक्तिनें हजारों रुपये खर्च करून तो किल्ला घेतला. असो ! बहामणी राज्याच्या कारकिर्दीत हा किल्ला प्रसिद्ध होता.

अफजुलखानाच्या वधानंतर **शिवाजीनें** कोल्हापूर प्रांतावर स्वारी करून, हे सर्व किल्ले चार पांच महिन्यांत घेतले. सभोंवती डोंगरांच्या रांगा, त्यांच्या मध्यें भयंकर खोरीं, मध्यें तीन मैल घेराचें टेंकडें, सभोंवतालचें तुटलेले कडे खालपर्यंत दिसतात. शिवाय त्याच्या आजूबाजूस भयंकर निबिड अरण्य आहे. त्याला **गजापूर**चें अरण्य म्हणतात. या सर्व गोष्टीमुळें खेळणा किल्याला नैसर्गिक विशालता आली आहे. ती पाहून **शिवाजीनें** छापा घालून खेळणा घेतल्यावर त्याला " विशाळगड " हें नवीन नांव दिलें. हें नांव कोणत्याहि प्रेक्षकाला तो किल्ला, त्याची विशालता पाहून योग्यच वाटेल, व " विशाळगड " हेंच नांव योग्य आहे, असेंच वाटेल. एका शाहिरानें पोवाड्यांत खालील प्रमाणें वर्णन केलें आहे—

गड विशाळ । शत्रूचाकाळ । दिसतो व्याळ ।
भयंकर मोटा । दोन असती तयाला वाटा ।

हेंच यथायोग्यच आहे.

पन्हाळ्यापासून वायव्य दिशेस विशाळगड ३५ मैल आणि रांगणा नैर्ऋत्य दिशेस ४५ मैल दूर आहे. विशाळगड किल्यावर जाण्याला जो पश्चिमेकडचा एकच रस्ता आहे. त्याच्या अलिकडे **गजापूर** या नांवाची खिंड आहे. कोल्हापूर, पन्हाळा, मलकापूर वगैरे कोणत्याहि ठिकाणाहून विशाळगडास जाव-

याचें असल्यास रस्ता याच खिंडींतून जातो, कारण गडावर जाण्यास दुसरा मार्गच नाहीं. ही खिंड अशा तऱ्हेची आहे कीं, तिच्या एका बाजूला उंच डोंगर आहे. मध्यें खिंड आहे. एका बाजूला खोरें असल्यामुळें, ती वाट अजिबात बंद झाली आहे. तेव्हां पलिकडे जर गडावर जावयाचें असेल तर, खिंडींतून तरी गेलें पाहिजे, किंवा दुसऱ्या बाजूचा उंच डोंगर चढून आणि पुन्हा खालीं उतरून तरी गेलें पाहिजे. ही खिंड या तोंडापासून त्या तोंडापर्यंत इतकी अरुंद आहे कीं, शेजारीं शेजारीं अशीं फक्त तीनच मनुष्यें जेमतेम उभीं राहूं शकतात. दोन हत्यारबंद मनुष्यें आणि एक घोडेस्वार व त्याचा मनुष्य एवढींच एकावेळीं फार आयास न पडतां जाऊं शकतील, परंतु त्यांना हत्यार वगैरे चालवितां येणार नाहींत, व पट्टयाचें हातहि करितां येणार नाहींत. सहज आपल्या चालीनें जर आपण चाललों तर ही खिंड ओलांडण्यास तीन मिनिटें लागतात, इतकी ती लांब आहे. हिला घोडखिंड म्हणतात. खिंड ओलांडून पलिकडे गेलें म्हणजे, मात्र हजार दोन हजार मनुष्यें उभीं रहातील असें मैदान आहे. त्याच्या पुढें आणखी एक लहानसें मैदान आहे. या मैदानाला " हात घाईचें मैदान " असें ह्मणतात. या मैदानावरून विशाळगड किल्याचा दरवाजा दिसतो. त्या दरवाज्याच्या शेजारीं एक लहान खिडकी आहे. तेथून तोफ चालविली असतां तिचा गोळा नेमका खिंडी पलिकडील हातघाईच्या मैदानांत येऊन पडतो. खिंडीपासून गडाच्या पहिल्या दरवाज्यास पोंचण्यास सुमारें २५ मिनिटें लागतात. एकंदर या घोडे खिंडीपासून गड चढून जाण्यास सुमारें एक तास लागतो. इतकें ही गडाखालची खिंड व गड यांच्यामध्यें अंतर आहे.

या वरील हकिकतीवरून **शिवाजी** पन्हाळा किल्यांतून निघून रांगणा किल्याकडे न जातां विशाळगडावर गेलो, हेंच सिद्ध होतें. **शिवाजीचा** पाठलाग करीत, सिद्दी जोहाराजी फौज आली व परत गेली, त्या खिंडीस " सिद्दीखिंड " असें अद्याप लोक म्हणतात. व खिंडींच्या पलिकडील मैदानावर हात घाईची लढाई झाली. म्हणून त्यांस " हात घाईचें मैदान " म्हणतात. कित्येक इंग्लिश इतिहासकार या खिंडांतील लढाईस " थर्मापिली "ची लढाई म्हणतात. ( ग्रीस देशांतील स्पार्टा प्रांत जिंकण्याकरितां इराणच्या राजानें अवाढव्य फौजेनिशीं

स्वारी केली असतां स्पार्टात शिरण्यास थर्मापिली नांवाची लहानशी खिंड आहे, त्या खिंडींत दोनशें स्पार्टन लोकांनीं प्रचंड इराणी फौजेशीं टक्कर देऊन आपले प्राण खर्ची घातले. ) त्या खिंडाची ह्या खिंडी बरोबर तुलना करितात.

यांस आणखी ऐतिहासिक प्रमाणें आहेत. त्यापैकीं एक येथें देतों तेः— "कित्येक स्वामीकार्यें केली त्यास **पनालाहुन विशाळगडास येतां गजापुरीं युद्ध झालें** तेथें **साहेब कामावरी आपले बाप बाजी प्रभु** पडले" हा वरील मजकूर पांचव्या भागांत दिलेल्या पत्रांत आहे. त्यावरून पहातां शिवाजी विशाळगडास गेला हेंच सिद्ध होतें. या एकंदर माहितीवरून **चरित्रनायका**चा मृत्यु **गजापुरच्या** खिंडींत झाला, व ही खिंड विशाळगडाच्या खालीं आहे. " शिवदिग्विजय " बखरींत " गजापूर " चा उल्लेख आहे, व याच चरित्रांतील पांचव्या भागांतील पत्रांत " पनाळाहून विशाळगडास येतां गजापुरीं युद्ध झालें. " असें असून, याची प्रत्यक्ष साक्ष देणारीं हीं स्थळें व खिंड विशाळगडा खालीं आहेत.

या वरील हकिकतीवरून हें युद्ध गजाखिंडींत झालें, हें निश्चित होतें. त्याचप्रमाणें सदरहू चरित्राच्या आठव्या भागांत जें पत्र दिलेलें आहे. तें इ. स. मासिकांत प्रसिद्ध झालेलें आहे. त्यांत " राजे निघोन विशाळगडास दाखल झाले " असें आहे व दुसरें पत्र सदरहू भागांत दिलेलें आहे. त्यांतहि "रात्रीस मोर्चा फाजल खानाचा मारून विशाळगडचे मार्गे चालत आले." असें स्पष्ट उल्लेख ऐतिहासिक पत्रांतच असल्यामुळें, यापेक्षां ज्यास्त पुराव्याची कोणासहि अवशक्यता नाहीं. या एकंदर पुराव्यावरून पहातां कित्येक ठिकाणीं **शिवाजी** रांगण्यावर गेला, असें दिलेलें आहे, तें चुकीचें ठरतें. व **विशाळगड कीं रांगणा**? हा वादच यापुढें शिल्लक राहत नाहीं.

# भाग ८ वा.

# पराक्रम व शेवट.

शिवाजीमहाराज मोर्चा मारून व विजापूरकरांच्या सरदाराचा वेढा फोडून बाहेर निसटून गेल्यावरोवर शत्रूची फौज आपला पाठलाग करीत खास येणार, हें त्यांस माहीत होतें. तेव्हां आपल्या संरक्षणार्थ व आश्रयाकरितां आपल्या ताब्यांतील, जी ज्यास्त जवळची व बंदोबस्ताची जागा असेल, तेथें जाऊन पोंचणें, हेंच त्यांस त्या प्रसंगीं श्रेयस्कर होतें. त्या प्रमाणें ते पन्हाळ्यांतून मोर्चा मारून किंवा शत्रूस हुलकावणी दाखवून जे निघाले ते विशाळगडाकडे गेले. त्यांच्या पाठोपाठ शत्रूची फौज पाठलाग करीत निघाली. सूर्योदयाचे सुमारास **शिवाजी** आपल्या लोकांसह विशाळगड किल्यापासून तीन कोसांवर आले. रात्रीचा दीड प्रहर आणि सकाळचा एक प्रहर, मिळून सुमारें, अडीच प्रहरांत ते ३० मैल चालून गेले. ते आपल्या बरोबरच्या मंडळीसह विशाळगडाकडें येण्यास निघाले. ते सूर्योदय झाल्यावर प्रहर दिवसाच्या सुमारास विशाळगडा खालील गजापूरच्या रानांतील खिंडीजवळ आले. खिंडींतून पार पडून कसे जाऊन पोंचतों, अशी काळजी **शिवाजीस** पडण्याइतकी सिद्दिची फौज मागून पाठलाग करीत झपाट्यानें येत होती. पुढें **महाराज** व त्यांचे लोक, आणि मागें ते विजापुरी सरदार व त्यांचे घोडेस्वार, अशा रीतीनें ती एक शर्यतच लागली होती. प्रत्येकजण आपली शर्थ करीत होता. **महाराज** व त्यांच्यावरोवर असलेले लोक आपणांमधील व आपल्या शत्रूंमधील अंतर वाढविण्याकरतां पराकाष्ठा करीत होते, तर विजापुरी सैन्य तें अंतर कमी करण्याकरितां आपल्या जिवाकडे पहात नव्हते. होतां होतां दोन सैन्यांतील अंतर कमी होत चाललें. दर क्षणास विजापूरी सैन्य शिवाजीच्या जवळ येत चाललें. त्यानें बरचे अंतर तोडलें. तें आतां अगदींच जवळ येऊन ठेपलें. खिंडीपासून गडाच्या पहिल्या दरवाजास पोंचण्यास सुमारें २५ मिनिटें लागतात.

एकंदर या घोड खिंडीपासून गड चढून जाण्यास सुमारें एक तास लागतो. इतकें ही गडाखालची खिंड व गड यांच्यामध्यें अंतर आहे. खिंडीच्या पलिकडे येऊन पोंचल्यावर, आणि मागून, फौज झपाट्यानें येत आहे, हें पाहिल्यावर **शिवाजीनें चरित्रनायका**शीं याबद्दल कांहीं खलबत केलें.

शत्रूच्या अफाट सैन्यापुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं, हें उभयतांहि समजून चुकले होते. गनीमी काव्यानें खिंडींत सिद्दिला रोंखून ठेविलें, तर शिवाजी गडावर सुरक्षित पोंचेल ही **चरित्रनायका**ची खात्री होती. त्यांच्या वरील खलबताचा हेतु हाच होता कीं, सिद्दिजोहारास आपण किल्यावर जाईपर्यंत खिंडींत रोंखून कसा धरावा. यावेळीं या **वीर-रत्नानें** शिवाजीस सांगितलें कीं, " महाराज आपण येथून निघून जावें, मी माझ्या थोडक्या सैन्यानिशीं येथें राहतों ! शत्रूला खिंड ओलांडून देत नाहीं."

या वेळीं सिद्दिजोहाराची फौज खिंडींजवळ येऊन पोंचावयाची होती, आणि महाराजांस किल्यांत जाऊन पोंचण्यास सुमारें तासदीडतास अवधी खिंड ओलांडून गड चढून जाण्यास पाहिजे होता. ह्मणजे सुमारें प्रहर अर्धाप्रहर बादशाही फौजेला खिंडींत आडवून धरावयाचें आणि तिच्याशीं दोन हात करावयाचे; ही कामगिरी **चरित्रनायकास** करावयाची होती. जागा जरी अडचणीची होती, तरी ती **चरित्रनायका**च्या सैन्यास सोईस्कर अशी होती. यांत संशय नाहीं. तरी देखील बादशाही प्रचंड फौजेला दीड दोन तास तरी आडवून धरणें, हे काम कांहीं सामान्य धैर्यवान पुरुषाचें खास नव्हतें ! त्याला निधड्या छातीचींच माणसें लागतात. ह्यावेळीं मुख्य कार्य **शिवाजीमहाराज** गडावर कसे पोंचतील हें होतें. शत्रूंशीं यावेळीं सामना करून जय मिळविण्याचें नव्हतें; कारण या प्रसंगीं काय होणार !! हें **चरित्रनायका**स अवगत होतेंच, परंतु **महाराजांनीं** त्यास " कसे करावें " असें विचारितांच त्या **वीरानें** चोख उत्तर केलें कीं, **महाराजांनीं** येथून निघून जावें ! मी येथें राहतो !!

" महाराज, शत्रूकडील सैन्य अफाट व आपल्याजवळ तर अतिशयच थोडे लोक आहेत. शत्रूच्या खवळलेल्या सेनासमुद्रापुढें आज या **मराठे वीरांचा** फार वेळ टिकाव लागेल असें वाटत नाहीं. आज ही खिंड शत्रूच्या ताब्यांत

जाणारच. तेव्हां महाराजांनीं येथें राहूं नये. महाराजांना उपदेश करण्याचा माझा अधिकार नाहीं. येथें राहून जर महाराजांवर वाईट प्रसंग आला, तर आज मराठ्यांना कोणीहि वाली उरणार नाहीं. व महाराष्ट्राचा पाठीराखा नाहींसा होईल. माझ्या भाग्यानें इतकें दिवस खाल्लेल्या अन्नाचें चीज करून दाखविण्याचा प्रसंग आला आहे. महाराजांच्या सेवेंत आज हा देह खिंडात पडावा, अशी माझी इच्छा आहे. व महाराज या गोष्टीला संमति देतील अशी मला आशा आहे."

**चरित्रनायकाचें** तें अवेशयुक्त व स्वामिनिष्ठा पूरित भाषण ऐकल्यावर इतका वेळ चित्राप्रमाणें तटस्थ असलेल्या मराठे गड्यांनीं महाराजांचा जयजयकार करून **चरित्रनायकाच्या** भाषणास अनुमोदन दिलें. आपल्या हाताखालील लोकांची ती अढळ प्रीती व अलोट स्वामीभक्ति पाहून **शिवाजीमहाराजांचा** कंठ दाटून आला. त्यांच्या नेत्रांवाटे प्रेमाश्रू वाहूं लागले. त्यांचे ओंठ थरथर कांपूं लागले. त्यांच्या हृदयांत दुःख व आनंद या दोन विकारांचें एकसमयावच्छेदें करून काहूर उसळलेलें आहे. असें त्यांच्या मुखचर्येवरून स्पष्ट दिसूं लागलें. आपल्या लोकांचें आपल्या विषयींचें प्रेम व पूज्यभाव पाहून त्यांना अतिशय आनंद झाला खरा; पण ते आज त्या खिंडीचें रक्षण आपणांस करूं देत नाहींत, निदान त्यांची तशी इच्छा तरी नाहीं, हें पाहून त्यांना दुःखहि झालें. आनंद व दुःख ह्या मनोवृत्ति त्यांच्या हृदयांत एकसारख्या उचंबळत असल्यामुळें त्यांनीं क्षणभर त्यांच्या विचारशक्तीवर पगडा बसविला, व ते गोंधळल्यासारखें झालें. इतक्यांत **चरित्रनायकानीं** महाराजांस लवकर तेथून निघून गडावर जाण्याची पुनः एकदां विनंती केली. ती विनंती ऐकतांच महाराज भानावर आले. त्यांच्या विचारशक्तीचा त्यांच्या मानोवृत्तीवर अंमल बसला. व या खिंडींत आपल्या टोळीसमवेत शत्रूंशीं झुंजून रणांगणावर आपला देह ठेविण्यांत परिणामीं हित होणार नाहीं. असा विचार करून त्यांनीं **चरित्रनायकास** पुनः एकदां आपल्याजवळ बोलावून, त्यांस आपला हेतु कळविला, व त्यांच्या कानांत कांहींसें कुजबुजून सांगितलें. त्यावेळीं **चरित्रनायकानें** सांगितलें कीं, शत्रूंस खिंड चढूं देत नाहीं. फक्त महाराजांनीं गडावर चढल्याबरोबर सूचना दर्शक तोफेचे आवाज करावें. तोंपर्यंत शत्रूबरोबर युद्ध करून,



महाराष्ट्र श्री सवाई धर्मापिलो ( गजा खिंड )

त्याची फौज येऊं देत नाहीं. साहेब कामीं पडलों तरी मुलांलेंकरांस अन्न देणार **महाराज** समर्थ आहेत. हें त्या वीराचें धैर्याचें बोलणें ऐकून **महाराज** गहिंवरून ह्मणाले "बाजी तुह्मां सर्वांस सोडून मी येथून कसा जावूं !! तुह्मीं माझ्या करितां मरावें आणि मी मात्र जीव घेऊन पळावें ! हें मलाच बरें दिसत नाहीं " तेव्हां **चरित्रनायकांनें** पुनः मोठ्या आवेशानें उत्तर दिलें कीं, " महाराज हें काय ! आमच्या सर्वांचे प्राण महाराजांच्या जिवावर ! तथापि बोलत बसण्याची वेळ ही नव्हे ! एकेक क्षण युगाप्रमाणें जात आहे, शत्रूसैन्य जवळ येत आहे, हें आलेंच पहा" !! ह्या **चरित्रनायका**च्या उत्तरामुळे **महाराज** निरुत्तर होऊन नाइलाजास्तव, **चरित्रनायका**कडे पहात पहात, ठरल्याप्रमाणें निम्मे लोक, आपल्याबरोबर घेऊन खिंड ओलांडून गड चढूं लागले. जाते वेळीं सांगितलें कीं, मी गडावर पोंचतांच इषाऱ्याच्या तोफा देतों. व तुमच्या मदतीस सैन्य पाठवितों !!

**महाराज** निघून जात असलेलें पाहून **चरित्रनायका**स अत्यंत हर्ष झाला, व ते लागलेच राहिलेले मावळे लोक बरोबर घेऊन खिंडीजवळ येऊन खिंडीचें तोंड धरून, लढाईच्या तयारीनें उभे राहिले. या प्रसंगीं त्यांचा भाऊ **फुलाजी** त्यांच्या साह्यार्थ होता. सिद्दिची फौज खिंडीजवळ दाखल झाली. तिला महाराज गड चढतांना दिसले. आतां त्यांस आपण गांठू व एकसहा कत्तल करूं; या आवेशानें, त्वरेनें ती येऊं लागली. तों खिंड त्यांस आडवी आली. ते " दीन दीन " अशी रणगर्जना करीत एका मागून एक शिरले. खिंडींत गर्दी झाली. दुसऱ्या तोंडाशी कत्तल सुरू झाली. खिंडीचें तोंड किती लहान आहे, हें मागील भागांत दिलेंच आहे. खिंडीत आपणांस अटकाव होईल, ही कल्पना विजापुरी फौजेस नव्हती.

या वेळीं **चरित्रनायका**नीं आपल्या सैन्याचे दोन भाग करून खिंडीच्या दोन्ही बाजूस ठेविले होते. शत्रूसैन्य खिंडीत शिरतांच **चरित्रनायकानें** आपल्या सैन्यास आवेश आणण्याकरितां, मोठी गर्जना करून म्हटलें कीं, "माझ्या काळिजानों आज आपण कोणत्या कार्याकरितां येथें उभे आहोंत ! त्याची जाणीव तुम्हांस आहेच, तुमची स्वामीभक्ती कसोटीस लावण्याची हीच वेळ आहे. आपल्या मावळ्यांचा आजपर्यंतचा पराक्रम कायम ठेविला पाहिजे. तद्वत

मावळे लोक ज्या धन्याची भाकरी खातात, त्याची चाकरी आपल्या प्राणा पलिकडे कशी बजावितात, हें दाखविण्याची हीच संधी परमेश्वरानें तुम्हांस आणून दिली आहे. आपला प्रभु आपणांस केंव्हांहि विसरणार नाहीं. उलट पक्षीं आपण येथें स्वामी कार्याकरितां पडलों तर आपणांस मोक्ष प्राप्ती मिळेल. "यावश्चंद्र दिवाकरौ," आपली कीर्ति अजरामर राहील. आपल्या बायकांपोरांची काळजी आपल्या प्रभुला आहे. ते त्यांना कधींच अंतर देणार नाहींत. तरी उठा, कंबर बांधा, आपल्या पराक्रमानें शत्रूचे डोळे दिपवून टाका. अरे! आपणांपुढें यवनांच्या पराक्रमाचा हिशेब तो काय? हे पहा! शत्रू आले, तुमच्या सर्वांच्या पुढें हा **बाजी** छाती ठोकून खिंडीच्या मध्यभागीं जाऊन उभा राहतो." इतकें बोलून चित्ता जसा मेंढराच्या कळपांत उडी टाकतो, त्याप्रमाणें **वीर-रत्नानें** खिंडींत उडी टाकली.

**चरित्रनायकांच्या** ह्या कृतिमुळें व वरील भाषणानें मावळ्यांच्या अंगांत वीरश्रीनें संचार केला. त्यांचें रक्त तप्त झालें. बाहूंस स्फुरण चढलें. त्यांच्या अंगरख्याचें बंद तटातट तुटूं लागले. अशा त्वेषानें व मोठ्या धैर्यानें मावळे खिंडींत जाऊन उभे राहिले. यावेळीं **शिवाजी** विशाळगडाकडे पळत आहे, हें शत्रूच्या सैन्यानें पाहून, त्यांस स्फूरण चढले, व त्यांस केव्हां चीत करूं असें त्यांना झालें.

खरोखरच त्या वेळेस विशाळगडाकडे **महाराज** पळत नसून मराठ्यांची स्वातंत्र्य देवीच जात होती, असें म्हटलें पाहिजे. मराठ्यांची राजलक्ष्मी यवनांच्या जनानखान्यांत खेंचली जाते, कां विशाळगडाचा आश्रय करून कालांतरानें सर्व महाराष्ट्रभर अनिरुद्ध संचार करिते, हाच त्या वेळेस मुख्य प्रश्न होता; परंतु तिच्यासाठीं स्वतःचा प्राण वेंचण्यास सिद्ध असलेल्या **चरित्रनायका**-सारखा तिचा पाठीराखा असल्यावर ती जाणार कां व कशी? तिला नेण्यास कोण समर्थ होता! मावळ्यास उत्तेजन देणारा त्यांचा धनी कमकुवत होता काय? मावळे लोक म्हणजे धन्याचा हुकूम प्राणा पलिकडे मानणारे! आपली शस्त्रें सज्ज करून शत्रूवर केव्हां चालवूं असें त्यांस झालें होतें. इतक्यांत फाजल आपल्या लोकांची मोठी टोळी घेऊन खिंडींत मोठ्या त्वेषानें शिरला. त्यांस मावळ्यांच्या समशेरीनें व भाल्यानें अटकाव केला. **चरित्रनायक** असा-



वीर रत्न बाजी प्रभुंची शर्तीची झुंज.

मान्य योद्धा! तो यवनांच्या अशा हल्यास थोडकीच दाद देणार! त्यानें आपल्या तीक्षण समशेरीनें शेंकडों यवनांस कंठस्नान घातलें. खिंडींत अचानक हल्ला आल्यामुळें फाजलचे लोक घाबरून मागच्यामागें पळूं लागले. अशा रीतीनें हा पहिला हल्ला परतला. त्या वेळीं सिद्दीनें फाजलची फारच निर्भत्सना केली, आणि मोठ्या आवेशानें आपण पुढें होऊन दुसरा हल्ला चढावला, आणि एकदाचें लढाईस तोंड लागलें. उभय पक्षांमध्यें धुमश्चक्री सुरू झाली. "दीन दीन" "हरहर महादेव" या रणगर्जनांनीं दाहीदिशा दणाणून गेल्या. सर्वत्र मारामारी, कांपाकांपी व छाटाछाटी सुरू झाली. यवनांच्या समशेरी व मराठ्यांचे भाले, एकमेकांवर आपटून त्यांतून ठिणग्या निघूं लागल्या. हजारों लोकांचीं शिरकमलें हवेंत चेंडूप्रमाणें उडूं लागलीं! स्वामीभक्तीच्या वारुणीनें पुरा झिंगलेला **बाजी प्रभु** यवनांस प्रत्यक्ष कर्दन काळासारखा दिसूं लागला. त्यानें आपल्या शूर व जवानमर्द मावळ्यांनिशीं शत्रूवर असा निकराचा भाग केला कीं त्यांच्या माऱ्यापुढें शत्रूची अगदीं दाणादाण झाली. इतक्यांत विजापुरकरांचें पायदळ तेथें येऊन पोहोंचलें. पायदळाची कुमक मिळतांच पराजित झालेल्या घोडेस्वारांना पुनः दम आला. व त्यांनीं खिंडींतील मावळ्यांना जागच्याजागीं गारद करून टाकण्याचा दृढनिश्चय केला. शत्रूकडील सैन्याला अशी आयत्यावेळीं मदत मिळालेली पाहूनहि तो धीर शूर **बाजीप्रभु** रतिभरहि डगमगला नाहीं, किंवा ढळला नाहीं. उलट त्याचें धैर्य व शौर्य द्विगुणित झालें. त्याच्या अंगांत दैवी वीरश्रीचा संचार होऊन तो प्रत्यक्ष 'दिनप्रभू' सारखा तळपूं लागला. पायदळाची कुमक मिळाल्यावर विजापुरकरांच्या त्या अफाट सैन्यानें मावळ्यांवर दोन हल्ले केले. पण दोन्ही हल्ले त्या **वीरानें** निधड्या छातीनें हिंमत धरून मोठ्या शौर्यानें मागें हटविले. हल्ले परत हटवितांना दोन प्रहर झाली, व भगवान् सूर्यनारायण आकाशामध्यें आरूढ होऊन, आपल्या तेजःपुंज नेत्रांनीं मराठ्यांच्या अद्वितीय पराक्रमाचें सकौतुक अवलोकन करूं लागला होता.

यावेळीं मावळ्यांच्या माऱ्यापुढें शत्रूंची सारखी दाणादाण होत होती. या हल्यांत **चरित्रनायका**स दोनतीन वार लागले, तरी त्याचें लक्ष तिकडे नव्हतेच. त्याचे बरेच लोक पडले. यवनांच्या प्रेतानीं मात्र खिंड भरून गेली. इतक्या निकरानें हल्ला यवन करीत, तरी तो मागें परतविण्यांत येई. खिंडीत शिरकाव होईना, व

मावळे एक रेसभरहि मागें सरेनात. **शिवाजी** तर डोळ्यासमोरून निसटून जात आहे. हें पाहून विजापूरकरांच्या सरदारास अतिशय संताप चढला. त्यांनीं आपल्या लोकांस त्वेषानें खिंडींत जाण्यास भाग पाडलें. पुढल्यास मागें सरण्यास वाव मिळेना. खिंडींत एकच गर्दी होऊन, रेटारेटी सुरू झाली.

ह्या शेवटच्या हल्यांत यवनांचा धुव्वा उडवून दिल्यावर **चरित्रनायकानें** विशाळगडाकडे दृष्टी फेंकली. व त्याचा चेहरा एकदम चिंताग्रस्त झाला. क्षणार्धापूर्वी वीरश्रीच्या अपूर्व तेजानें चकाकणाऱ्या **बाजीच्या** चेहऱ्यांत हा फरक एकाएकीं कशानें पडला बरें! शत्रूच्या सेनेची दाणादाण केल्याबद्दल त्याचा चेहरा सानंद अभिमानानें उल्हासित दिसण्या ऐवजीं तो असा म्लान काय म्हणून झाला असावा! त्याचे प्रियकर मावळे कच खाऊं लागले काय? ते शत्रूवर तुटून पडण्यास मागें पुढें पाहूं लागले काय? छेः तशांतील मुळींच प्रकार नव्हता. समरभूमीवर शत्रूची भीति बाळगणें किंवा मरणाची पर्वा करणें, हें सतराव्या शतकांतील मराठ्यांचें ब्रीदच नव्हतें. त्याचा चेहरा चिंताग्रस्त होण्याचें कारण वेगळेंच होतें. **महाराज** विशाळगडावर सुखरूप पोहोचल्या बद्दलची सांकेतिक खूण त्याच्या कानीं पडली नाहीं. म्हणूनच त्याचा चेहरा इतका फिक्का पडलेला दिसत होत. तो विशाळगडाकडे एकसारखा टक लावून बसला. दर क्षणास त्याची चिंता वाढूं लागली. त्याला कांहीं सुचेना. तो विचारांत गढून गेला. इतक्यांत फाजल ताज्या दमाची टोळी घेऊन, त्याच्यावर चाल करून आला. त्या बरोबर तो चित्यासारखा खवळून त्याच्या अंगावर तुटून पडला. या पूर्वी जरी त्याचे बरेच लोक रणांगणीं पडले होते, तरी राहिलेल्या लोकांनिशीं तो मोठ्या आवेशानें लढूं लागला. दोन्ही पक्षांकडील लोकांनीं लढण्याची अगदीं शिकस्त केली. यवनानीं मराठ्यांचा खरपूस समाचार घेतला. तर **चरित्रनायक** यवनांचा सप्पा उडवीत व मधून मधून विशाळगडाकडे दृष्टि फेंकीत थेट शत्रू सैन्यांत जाऊन भिडला. त्याच्या भाल्याच्या तीक्ष्ण टोंकानें व पट्याच्या सफाईदार फेंकीनें शत्रूकडील हाजारों लोकांस त्या दिवशीं यमसदनास पाठविलें. अशा रीतीनें कृतांताप्रमाणें **बाजी** शत्रूचा फन्ना उडवीत असतां त्यांस जबर वार लागला. त्यामुळें त्याच्या हातांतील तरवार खालीं पडली. आणि तो जमिनीवर घायाळ होऊन पडला. आपला सरदार पडला असें मावळ्यांनीं पाहिल्यावर त्यांचा धीर खचला. व ते कच खावूं

लागले. हें त्याचें कृत्य पाहून **चरित्रनायका**च्या अंगाचा तिळपापड होऊन त्यानें आपल्या लोकांची तशा स्थितींत निर्भत्सना केली. **चरित्रनायका**चे ते निंदाव्यंजक शब्द मावळ्यांच्या हृदयांत शल्याप्रमाणें टोंचले, व ते अतिशय निकरानें लढूं लागले. यवनांची व मावळ्यांची अशी खडाजंगी चालली असतांना **बाजी**चें सर्व लक्ष गडाकडे लागलें होते, व तो एक विवक्षित आवाज ऐकण्याचा प्रयत्न करीत होता. असा तो आसन्नमरण वीर भूमातेच्या मांडिवर पडला असतां, त्याला विशाळगडावर कांहींहि दिसलें नाहीं, व त्याला पाहिजे होता तो आवाजहि ऐकू आला नाहीं. प्रतिक्षणीं त्याचा जीव जास्त जास्त व्याकूळ होत चालला. त्याचें डोळे पाण्यानें डबडबले. त्यानें दीर्घ उसासे टाकले. तो आतां शेवटचे डोळे मिटणार, तोंच त्याला तो विवक्षित आवाज ऐकूं आल्याचा भास झाला. ह्मणून डोळे उघडून पाहतों; तों गडावर ज्वाला दृष्टिस पडल्या, व तोफेचें आवाज ऐकूं आले. महाराज गडावर सुखरूप पोहोंचल्याच्या सूचक अशा त्या ज्वाला पाहिल्यावर व तोफेचे अवाज ऐकिल्यावर त्या **वीर-रत्नास** अत्यंत समाधान वाटलें व मी " आपलें कर्तव्य कर्म बजाविलें " असे उद्गार काढून तो त्या हातघाईच्या लढाईंत मैदानावर **आपल्या शौर्याची मात करून व मागें अचल कीर्ति ठेऊन शके १५८२ आषाढ वद्य २ (ता. १४ जुलै सन १६६०) रोजीं गजापूरचे खिंडींत धारातीर्थी पतन पावला.**

**चरित्रनायक** गतप्राण झालेला पाहतांच मावळ्यानीं त्याचें प्रेत, शत्रूच्या हातीं लागू न देतां, मोठ्या शिताफीनें किल्यावर महाराजांकडे पोंचतें केलें. **चरित्रनाय**काचे तें मृत शरीर पाहिल्याबरोबर शिवबांच्या मनाची स्थिती काय झाली असेल बरें ! याचें वर्णन करणें अगदीं अशक्यच आहे. त्याची वाचकांनींच कल्पना करावी. अशा रीतीनें तो गजाखिंडीचा **रणशूर वीर रणीकामीं** आला. त्यानें आपला प्राण खर्ची घालून, **शिवाजीमहाराजांचा महाराष्ट्रभूच्या सौभाग्यतिलकाचा**—बचाव केला. **गजापूरीच्या** खिंडींत **चरित्रनायका**नें केलेल्या या अद्वितीय पराक्रमाला माप नाहीं; व जगाच्या इतिहासांत तोड नाहीं. महाराष्ट्राच्या इतिहासांत त्यानें आपलें नांव **अजरामर करून** ठेविलें. तें " यावश्चंद्र दिवाकरौ " पुसलें जाणार नाहीं, किंवा धुतलें

जाणार नाहीं. बाजी ! शिवाजी महाराजांसाठीं स्वतःच्या जीवितावर तिलां-जली सोडून तूं खरोखर अखिल महाराष्ट्रावर उपकारांचें ओझें लादून ठेविलें आहेस. शत्रूच्या असंख्य सेनेला मावळ्यांच्या अल्पशा टोळीनिशीं तोंड देऊन तूंच मराठ्यांचें वीर्य तेज प्रगट केलेंस " तेजस्विनः सुखमसू नपि संत्यजन्ति । सत्यव्रतव्यसनिनो न पुनः प्रतिज्ञाम् ।" या वचनाची सार्थकता तूंच करून दाखविलीस. जगाला खऱ्या राजनिष्ठेचा धडा तूंच शिकविलास. आपल्या हाडा-मांसानें तूंच मराठी राज्याची टोलेजंग इमारत दृढ व भरभक्कम केलीस. तूंच महाराष्ट्र धर्म जागविलास. तूंच अक्षय व स्वर्गीय सुखाचा ठेवा कमविलास.

असो ! चरित्रनायकाचा अंत झाला, त्यावेळीं मावळी फौज जी शिल्लक राहिली, ती किल्ल्याकडे गेली. आणि विजापुरकरांचीं फौज खिंडींतून पार होऊन झालघाईच्या मैदानावर आली. त्या मैदानावर सातशें मावळे लोक पडले. त्यांत चरित्रनायकाचा बंधू फुलाजी त्या गजाखिंडींत पतन पावला. शत्रूच्या फौजेनें सुमारें चार घटिका ह्या मैदानावरून विशाळगडाकडे पहात व विचार करण्यांत घालवून

स्वधर्मा हतसिंहेव महतीगिरिकंदरा
भारती भरत श्रेष्ठ पतिते जान्हवीसुते

याप्रमाणें कदाचित आपणांवर पुनः असा भयंकर हल्ला येईल. असा विचार करून ते पन्हाळ्याकडे निघून गेले.

वरील हकिकती संबंधानें "इतिहाससंग्र"हांत "यशवंत" यानें एक शिवकालीन रोजनिशींतील उतारा प्रसिद्ध केला आहे तोः-"शके १५८२ विकारीनाम संवत्सरे सन १०६० सन इहिदे खमसेन व अलफ, आबजुला खानाचे लोक फकीर होऊन गेले होते, त्याणीं पादशहापासून आणीक फौज मोठी घेऊन, राजे पन्हाळा असतां येऊन वेढा घातला. राजेवरून येऊन मोर्चे मारून किल्यावर जात तेव्हां राजश्रींनीं *पंचवीस हजार मावळे बरोबर बाजीप्रभु घेऊन त्याचे तोंडावर खिंडींत-उभा राहिला लढाई होनच आहे तों राजे निघोन विशाळगडास दाखल झाले तोफा सोडल्या बाजीप्रभु लढाई करीत असतां जखमा लागोन ठार जाहला राज्याची फत्ते जाली विजापूरची फौज माघारीं गेली. "

× ही अतीशयोक्ती दिसते. पांच हजार असावी !

२५२२



वरील उताऱ्यांत पंचवीस हजार मावळे बरोबर घेऊन शिवाजी महाराज निघाले असें दिलें आहे; त्यापेक्षां प्रभुरत्नमालेंत पृ. ५२ वर प्रसिद्ध झालेलें पत्र विशेष सयुक्तिक दिसतें. म्हणून वाचकांच्या माहितीकरितां येथ देतों तेः—

" × × पन्हाळियास शिवाजीमहाराज असतां फाजलखान विजापुराहून बापाचा सूड घ्यावयास फौज घेऊन आला त्यांस शिवाजीमहाराज पन्हाळियावर निभाव न होय ऐसे जाणोन चारहजार मावळे ये समागमें घेऊन रात्रीस मोर्चा फाजलखान याचा मारून विशाळगडचे मार्गे चालत आले चारकोस गड उरला तों प्रातःकाळ जाला फौज रातोरात चंद्रज्योति लावून माग काढीत आली ते समयीं बाजीप्रभु कुळकर्णी हिर्डस मावळकर धारकरी महाराजांस ह्मणाले कीं तुह्मी निम्मेलोक घेऊन जाणें गडावर जाऊन पावतांच तोफेचें आवाज करणें × × खिंड उलटून पुढें येऊं देत नाहीं साहेब निघून जाणें साहेब कार्यावर मरतो × × यांच्या मुलांलेकरास अन्न द्यावे, ऐसें ह्मणोन बाजीप्रभूनें राजेस्वामीस वाटेस लाविले आपण सर्व लष्कर खिंडींत छपवून पन्नास साठ लोक निवडक घेऊन खिंडीच्या रस्त्यावरील पांढऱ्यापाण्याजवळ उभे राहिले तों फाजलखान याची दहा बारा हजार फौज आली दोनप्रहर पर्यंत लढाई जाली × × × प्रभुवीर मेहेरबानी बहुत जाली बाजीप्रभुचे पुत्र बाबाजी प्रभूस जमेनविशी सेनापती वतनी धंदा सांगितला व + + + "

या वरील दोन्ही पत्रांवरून **शिवाजीमहाराज** रांगण्यावर न जातां विशाळगडावर गेले हें उघड होतें. त्याच प्रमाणें कित्येक ठिकाणीं शिवाजीनें सिद्दि जोहाराबरोबर संगनमत केलें, तें त्यांचे म्हणणें अगदींच फोल ठरतें. व मोर्चे मारून गेले, हेंच सिद्ध होतें. धैर्याचा मेरू जो बाजीप्रभु याचा पराक्रम जगाच्या इतिहासांत चिरंतन राहिला. या हल्ल्यांत पतन पावलेले वीर तर चिरंजीव झालेच. तत्रापि एवढा आत्मयज्ञ करणारे जे वीर धारातीर्थी पतन पावले नाहींत त्यांवर ईश्वराचा कोप झाला असेल काय ? असो ! कित्येक इतिहासकार या वीर–रत्नाची " लियोनिडास " या शूराशीं तुलना करितात, तर कित्येक " इंग्लंडची बाजू राखणारा व त्या करितां प्राण देणारा "नेलसन" यानें आपली योग्य कामगिरी बजाविली व मरतांना असेंच उद्गार काढले होते; म्हणून त्याची उपमा देतात " असो ! कोणाचीहि उपमा या किंवा देऊं नका. बाजीप्रभूनें स्वराष्ट्र व स्वधर्म राखिला ही गोष्ट त्रिवार सत्य असून त्याचें नांव महाराष्ट्राच्या इतिहासांत सन्मानपूर्वक अजरामर झालें आहे, यांत शंका नाहीं.

---

# भाग ९ वा.

# पुरवणी पुरावा.

ह्या लहानशा चरित्र ग्रंथांत **चरित्रनायकाच्या** घराण्यासंबंधीं जुनी माहिती पहिल्या व दुसऱ्या भागांत दिली आहे. त्यानंतर तिसऱ्या भागांत **चरित्रनायकाचा** पूर्व संबंध बांदल देशमुखाबरोबर कोणत्या प्रकारचा होता, याचें थोडक्यांत ऐतिहासिक पुराव्यासह वर्णन करून, चौथ्या भागांत शिवाजीमहाराजानें, बांदलदेशमुखावर स्वारी केली, त्यावेळीं **चरित्रनायकानें** आपला पराक्रम प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांस कसा दाखविला, याचें वर्णन केलें आहे. ह्यावेळचा **चरित्रनायकाचा** अद्वितीय पराक्रम पहातां, असा वीर आपल्या संग्रहीं असावा, अशी भावना होऊन त्यास अंकित करण्याकरितां, शिवाजीनें कसा प्रयत्न केला व तो कोणाच्या मध्यस्तीनें यशस्वी झाला, याचें वर्णन पांचव्या भागांत दिलें आहे. त्यानंतर शिवाजीनें विजापूरकरांचें अनेक किल्ले व मुलूख घेतल्यावर, त्याचा विजापूरकरांच्या सरदारांनीं पाठलाग करून शिवाजी आपल्या लोकांसह पन्हाळा किल्ल्यांत असतां किल्ल्यास वेढा घालून, चार महिनें त्यास तेथें आडकवून टाकलें. तो वेढा शिवाजीनें मोर्चा मारून फोडून त्यांतून आपल्या लोकांसह तो कसा निघून गेला हें दिलें आहे. कित्येक इतिहासकार शिवाजीनें विजापूरकरांचा सरदार सिद्दिजोहार याजबरोबर संगनमत करून तो पळून गेला. असें प्रतिपादन केलें आहे. हे त्यांचे तर्क जोंपर्यंत ऐतिहासिक पुराव्यानें सिद्ध केले गेले नाहींत, तोंपर्यंत कसे फोल आहेत, हें ह्या संबंधानें सहाव्या भागांत जी माहिती दिली आहे, ती वरून सहज समजण्यासारखें आहे. शिवाजी पन्हाळ्यांतून मोर्चा मारून विशाळगडावर गेला, कीं, रांगण्यावर गेला. हा जो कित्येकांस संशय होता, त्याचा सातव्याभागांत दिलेल्या माहितीवरून व ऐतिहासिक पत्रावरून निरास होऊन शिवाजी रांगण्यावर गेला, असें यापुढें तरी कोणास बोलण्यास वाव

मिळणार नाहीं असें वाटतें. व शेवटच्या आठव्या भागांत चरित्रनायकांनीं, आपली देशसेवा, करून महाराष्ट्राच्या सौभाग्य तिलकाचा बचाव कसा केला; आपल्या जन्माचें सार्थक करून, सर्व जगास खऱ्या देशाभिमान्याचा धडा कसा शिकविला. आपल्या हाडामासानें व रक्तानें मराठी राज्याची टोलेजंग इमारत दृढ व भरभक्कम करून आपलें नांव इतिहासांत सुवर्णमय कसें करून ठेविलें; ही माहिती असून **वीर-रत्नाची** निधन तिथि कोणती हें निश्चित ठरविलें आहे.

असो, ! वरील विवेचन **चरित्रनायका**संबंधीं झालें. त्यांचें वंशजासंबंधानें माहिती देणारे कांहीं अस्सल कागदपत्र या खालीं देत आहे. **चरित्रनायकाच्या** पश्चात त्याच्या मिळकतीच्या वगैरे वांटण्या झाल्या, त्याचें * वांटणीपत्र रा. चित्रे यांनीं प्रसिद्ध केलें आहे तें-- "या वीर प्रभूच्या वंशांतील एका गृहस्थांकडून वांटणीपत्र मिळालें. ते अस्सल असून बाजीच्या मुलांच्या व पुतण्यांच्या वाटपाचा कागद आहे. हे हिरडीस मावळचे देशपांडे, गांवकुळकर्णी व देशकुळकर्णी आहेत. यांजकडे ५२ गांवचें कुळकर्ण असून देशपांडेपणाचे हक्क आहेत. वरील गांव सर्व विचित्रगड तालुक्यांत असून हिरडीस मावळांत सह्याद्रीच्या घांट माथ्यापर्यंतचे आहेत. ते यांचें वंशजाकडे चालत आहेत. वांटणीपत्राचा कागद शके १६२९ सर्व जितनाम संवत्सरे चैत्र तृतिया भौमवासरे स्थल मुक्काम प्रसिद्धगड ( रांगणा ) अशा मितीचे आहे. त्यावरून मिळणारी माहिती इतिहास संशोधक मंडळा करितां जाहीर करीत आहे:—

१ सरदार वीरप्रभु बाजी यांचे आजे " पिलाजी "

२ बाजीचे वडिलांचें नांव " कृष्ण " गोत्र भार्गव अडनांव प्रधान.

३ बाजीस चार बंधू. त्यांत बाजी चौथे.

१ पहिले बंधू बालोजी.

१ दुसरे बंधू आनाजी यांस कृष्णराव बांदल देशमुख यांनीं मारलें.

१ तिसरे फुलाजी.

१ चौथे बाजी.

———

४

* ज्ञानप्रकाश ता. २८-८-१८.

४ बाजीस दोन बायका व आठ मुलगे.
प्रथम स्त्री " सोनाई "
द्वितीय स्त्री " गौतमाई "

५ पहिल्या स्त्रीस पुत्र तीन:—
१ महादाजी २ मोराजी ३ रामजी.
दुसरीस पुत्र ५
१ येसाजी २ बावाजी ३ विसाजी ( नक्कल ) ४ हरि (नक्कल) ५ अंताजी

६ महादेव बाजी यांस २ पुत्र.
बाजी व भैराळ

७ येसाजीस पुत्र एक पिलाजी

८ बावाजी बाजी दुसरे बायकोचा पुत्र नं. २
यांस पुत्र २ खंडोबा व भिकाजी.

**बावाजी बाजी** यांस शिवाजीनें त्यांच्या वडिलांची सरदारी, जमेनिशी वतनी करून दिली, त्या खेरीज कुलकिल्याचें विशाळगड किल्ला खेरीज करून कारखानिशीचा धंदा वतनी करून दिला. हा फार शूर व पराक्रमी होता. सन १६७८ त विजापूर कराचा सरदार युसूफखान, शिवाजीवर चालून आला, त्यावेळीं सावनूर येथें जी प्रसिद्ध लढाई झाली, त्यालढाईत हंबीरराव मोहित्याबरोबर **बावजीप्रभु** होता. हंबीरराव मोहिते किती पराक्रमी होता याचें विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. ह्या हंबीररावाचें नांव संताजी मोहिते, ह्यानें स. १६७४ च्या फेब्रुवारींत " जेसरी " येथील लढाईत मोठा पराक्रम केला, म्हणून त्यांस शिवाजी महाराजांनीं " हंबीरराव " हा किताब व " सेनापतींचीं वस्त्रें " दिलीं. त्यावेळापासून संताजी मोहित्याचे नांव हंबीरराव मोहिते असें इतिहास प्रसिद्ध झालें. हा स. १६८७ त मृत्यु पावला. ह्या शूर सेनापतिबरोबर **बावजीप्रभूची** नेमणूक शिवाजी महारांजानीं केली होती ती निरर्थक नव्हती.

हंबीरराव मोहिते मृत्यु पावल्यानंतर **बावाजीप्रभु** आपल्या जहागिरीची व्यवस्था पहात स्वस्थ बसला, त्यावेळीं महाराष्ट्रावर अथवा मराठ्यांच्या स्वराज्यावर आघात करण्याकरितां औरंगजेब आपल्या सर्व साधनानिशीं महाराष्ट्रांत

येऊन बसला होता. त्याच्या प्रतिकारार्थ संभाजीमहाराजानें वास्तविक पहातां बावजीप्रभूची नेमणूक करावयास पाहिजे होती ती न केल्यामुळेंच त्यांस त्याच्या जहागिरीवर स्वस्थ बसणें भाग पडले असावें. पुढें राजाराम महाराजानें जिंजीस प्रवास करितांना बावजीस आपणाबरोबर बोलाविलें. परंतु हें बोलावणें रीतसर नसल्यामुळें, बावजी गेला नाहीं. त्यानें स्वतः आपला सापत्न भाऊ **महादाजी बाजी** यांस पाठविलें. जिंजीच्या हल्यांत **महादाजी बाजी** स. १६९२ त मरण पावला. तेव्हां त्याचा मुलगा **बाजी महादेव** यांस **राजाराममहाराज** जिंजीहून परत आल्यानंतर त्याच्या बापाचा पराक्रम तद्वत त्यांच्या घरण्यानें केवळ **स्वराज्याकारितां** आपलें देह रणांगणीं अर्पण केलें. हें जाणून त्यांस राजगडकिल्याची कारखानिसी व त्याचा चुलता **अंताजी बाजी** हा सेना*सहस्त्री होता. त्यांस सेनापंच×सहस्त्री करून कर्नाटकांत पाठविलें. व खुद्द **बावाजी बाजीस** जमेनिसी पूर्वी होती, ती चालू करून **संताजी घोरपडे** सेनापती याजकडे नेमिलें. ह्यासंबंधीं म. सा. व. १ लें अं. १ ला पत्र नं. ३ हें विशेष महत्वाचें असल्यामुळें तें येथें देतों:—

सन १६९७.

**श्रीराम.**

स्वस्तीश्री राज्याभिषेक शके १९ अंगिरानाम संवत्सरे अधिक भाद्रपद बहुल चतुर्दसी भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस राजाराम छत्रपति याणीं राजश्री बावाजी बाजीप्रभु यांसी आज्ञा केली ऐसीजे तुह्मांस पूर्वी स्वामी त्या प्रांते

श्री ॥ राजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नीळकंठ
मुख्य प्रधान.

श्री लक्ष्मि न्रहरी
प्रीतेः मुद्रानिराजि
जन्मनाः ॥ राजाराम
प्रातिनिधेः प्रल्हादस्यः
विराजते.

असतां सेनापतिची जमेनिवीसी होती. स्वामी कर्नाटक प्रांते आलियावरी तुमचें

* एक हजार सैन्याचा अधिकारी. × पांचहजार सैन्याचा अधिकारी.

राहणें त्या प्रांतेच जाले जमेनिसी सेनापतिची काशीरामप्रभु यांस सांगितली. तुह्मीं उद्योगविवर्जित घरींच राहिलेत तुह्मीं स्वामीकार्याचे. तुह्मांस कार्यभाग सांगावा या निमित्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य याणीं आग्रह केला; परंतु स्वामीनें कृपाळू होऊन कार्यभाग सांगितल्या विरहित सेवा कर्तव्य नाहीं. हा निर्वाद करून स्वामीचे सेवेसी आपले बंधु महादाजी बाजी यांस पाठविले. ते हुजूर येऊन वर्तमान तपासिले तुमचे विदित केलें. त्यावरि त्यांस व्यथा होऊन देवाज्ञा पावले. तुमचे चालविणें हें स्वामीस अगत्य, **तुमचे पिते बाजीप्रभु याणी कैलासवासी स्वामीपासी येकनिष्ठपणें सेवाकरून स्वामी-कार्यावरी खर्च जाले.** तुह्मींहि स्वामीची सेवा येकनिष्ठपणें करीत आलेत व पुढेहि कराल हें जाणून स्वामी तुह्मांवरी कृपाळू होऊन राजेश्री संताजी घोरपडे सेनापति यांची जमेनिसी सांगोन सनद सेनापतिचे नांवे सादर केली आहे आणि हें पत्र तुम्हांस लिहिले असें. तरी तुह्मीं मशारनिल्हेकडे जाऊन स्वामीनें सांगितलें प्रमाणें कार्यभाग चौकसपणें येकनिष्ठनें करीत जाणें व तुमचे बंधु अंताजी बाजी कर्नाटक प्रांते होते. त्यांस स्वामीनें सेनासहस्त्रीचा सांगितला होता. सांप्रत स्वामी याजवरं कृपाळू होऊन सेनापंच सहस्त्रीचा कार्यभाग सांगोन त्या प्रांते पाठविले आहेत. या पंचसहस्त्रीचा *सजवज करून देऊन कार्यभाग घेत जावा येविसी राजश्री रामचंद्र पंडित अमात्य व राजश्री संताजी घोरपडे सेनापति यांस आज्ञापत्रें दिली आहेत. ते मामला अनुकूल करून देऊन सेवा घेतील. महादाजी बाजी स्वामीसनीध आले होते, त्यांस देवाज्ञा जाली करितां त्याचें पुत्र बाजी महादेव यांस किले राजगड येथील कारखानिसी सांगोन सनद पाठविली आहे. या प्रमाणें चालेल. तुह्मीं आपलें समाधान राखून स्वामीसेवा येकनिष्टपणें करीत जाणें स्वामी तुमचे चालवितील जाणिजे निर्देश समक्ष.

सुरू सुद बार

मर्या
देयंविरा
जते.

* सिद्धता.

या देशपांडे घराण्यांतील प्रत्येक पुरुष पराक्रमी होते. हें मागें दिलेल्या माहितीवरून उघड होतें. चरित्रनायकानें केलेल्या पराक्रमाचें पुन: दिग्दर्शन करण्याची जरूरच नाहीं. त्याचा मुलगा **बाबाजीप्रभु** हा किती पराक्रमी होता याचा केवळ उहापोह करण्यांत जागा आडविण्यापेक्षां वरील पत्राचाच उल्लेख केला ह्मणजे पुरें आहे. तो जितका शूर व पराक्रमी होता, तितकाच मानी होता. त्यांस आपलेपणाची विशेष किंमत वाटे. हा गृहस्थ किती मानी होता, यासंबंधीं वरील पत्रांत " तुम्हीं उद्योगविवर्जित घरींच राहिलेत. तुम्हीं स्वामीकार्याचे तुह्मांस कार्यभाग सांगावा यानिमित्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य याणी आग्रह केला; परंतु स्वामीनें कृपाळू होऊन कार्यभाग सांगितल्या विरहित सेवा कर्तव्य नाहीं. हा निर्वाद करून स्वामीचे सेवेसी आपले बंधु **महादाजी बाजी** यांस पाठविलें " " तुमचे पिते **बाजीप्रभु** याणी कैलासवासी स्वामीपासी येकनिष्टपणें सेवा करून **स्वामीकार्यावरी खर्च जाले.** तुह्मीहि स्वामिची सेवा येकनिष्टपणें करीत आलेत व पुढेंहि कराल " या वाक्यावरून त्यांच्या पराक्रमाचीच नव्हे तर त्याच्या सर्व चरित्राची जाणीव होईल. असे पराक्रमी वीर कोठेंहि झालें तरी विरळाच. असो ! त्यानें दिलेल्या सडेतोड उत्तरामुळें छत्रपति राजाराममहाराजांस केवळ कागदीं गौरव करून स्वस्थ बसतां येईना. त्यांनीं **बाबाजीची** नेमणूक सेनापति संताजी घोरपडे याजकडे करून सालीना होन २००० चें वेतनाची सनद दिली तीः—

### श्री.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १९ अंगिरानाम संवत्सरे अधिक भाद्रपद बहुळ ( वद्य ) येकादसी मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणी समस्त सेनाधुरंधर राजमान्य राजेश्री संताजी घोरपडे सेनापति यांस आज्ञा केली येसीजे, सेनापतिस जमेनिस काशीरामप्रभु होते ते दूर करून हली राजश्री **बाबाजी बाजीप्रभु** यांस पूर्वी राजश्री हंबीरराऊ मोहिते यांचे वेळेस सेनापतिची जमेनिसी होती. मध्यें त्याजवरी उमेदवार होते. कार्याचे मर्दान दरबारीचे कदीम विश्वासू येकनिष्ठ सेवक यास्तव यांजवरी स्वामी कृपाळू होऊन यांस सेनापतीचा जमेनिसीचा कार्यभाग सांगितला असे. याचे हाते जमेनि-

सांची सेवा दंडक प्रमाणें घेत जाणें यास वेतन सालीना होन प॥ २००० खास जातीस होन १६०० प॥ चाकर २४ एकूण होन. ४००

१९० भोई १२

| | | |
|---|---|---|
| २५ | ( फाटलें ) | १ |
| १६५ | भोई | ११ |
| १९० | दर १५ | १२ |
| ३६ | दिवटे | २ |
| २१ | अफदागिरा | १ |
| ३६ | ( फाटलें ) | २ |
| ३६ | महालदार | २ |
| ३६ | अडकरी | २ |
| २४ | ( फाटलें ) | २ |
| २१ | ( ,, ) | १ |
| ४०० | | २४ |

येकूण सालीना होन प॥ दोनहजार रास केले असत तीं ॥ सनद पे ॥ पासून खासा जातीस व चाकर हजीर लिहवतील त्या दिवसापासून वजावाटा दरबार दंडक प्रमाणें वजा करून उरेल वेतन पाववीत जाणे. पूर्वील सेवेचे फाजोल असेल ते हाली बाकी वजा करणें. बारगीर घोडी पूर्ववत दंडक प्र॥ चालवणें. ऐवज पानगुणारी माजीप्रमाणें यास जमान रंगाजी भास्कर प्रभु जमेनिसी सरलस्कर यांस हुजूर घेतले असे. बहुत लिहिणें तरी तुह्मां सुज्ञ असा.

मर्या
देयंविरा
जते.

**बाबाजी बाजीचा** भाऊ **अंताजी बाजी** हा जिंजीस असतांना आपलें वडिलार्जित वतन परत मिळविण्याकरितां छत्रपति राजाराम महाराज यांस विनंती केली, त्याप्रमाणें महाराजांनीं त्यांचे वडिलार्जित वतन, त्यांच्या कुटुंबांतील सर्वांच्या नांवें दिल्याची सनद उपलब्ध आली ती येणें प्रमाणें:—

श्री.

स्वास्ति श्री राज्याभिषेक शके १९ अंगिरानाम संवत्सरे अधिक भाद्रपद बहुल चर्तुदशी भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपति यांनी समस्त कार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांस आज्ञा केली ऐसिजे. मा॥ **येसाजी बाजी व बाबाजी बाजी व अंताजी बाजी व बाजी माहादेऊ व विठ्ठल फुलाजी व कृष्णाजी फुलाजी व चिमणाजी भिकाजीप्रभु** देशकुळकर्णी त॥ हिरडस मावळ सुभाप्रांत मा॥र यांतून **अंताजी बाजी** यांनी चंजीचे मुक्कामीं स्वामींस विनंति केली कीं, तर्फ मजकूरचे देशकुळकर्णी सालाबाद पिढि दरपिढि भोगवटा चालत आहे. येशास देशकुळकर्णाचे वतनास हक व इनामती व कुलबाब व कुलकानु मौजे गोवडी व नांदगाऊ ऐसे तीन गांव व किरकोळ ×× गावगंना इनामत सेते ऐसे निजामशहाचे कारकिर्दीत चालत होती. त्यावरी देश कैलासवासी स्वामीस कबज जाली यावरी तमाम वतनदार लोकाच्या इनामती अनामत केल्या. त्यावरोबरी आपले गांव सेते अनामत जाहली. आपले पिते **बाजीप्रभु** यांणी **कैलासवासी स्वामीपासी येकनिष्ठपणें सेवा करून स्वामीकार्यावरी खर्च जाहाले.** आपणहि अवघीयानी सेवा येकनिष्टपणें स्वामीसेवा केली आहे. स्वामी धर्मप्रभु * * वृत्तिवंताचे इनाम व हकाचे जिर्णोधार करून दिले + + + आपणहि पुरातन वृत्तिवंत आणि स्वामीचे सेवेसी एकनिष्ठ आहो तरी कृपाळू होऊन आमचे इनाम गांव व सेते × × × पाहिजेत ह्मणून विनंती केली यावरून देश कुळकर्णी हिरडस मावळ हे स्वामीचे पायाशीं एक निष्टेनें वर्तणुक करीतात व **बाजीप्रभु कैलासवासी स्वामीचे वेळेस स्वामी कार्यावरी खर्च झाले** व प्रस्तुत ईही स्वामीचे सेवेसीं तत्पर देखोन याजवरी कृपाळु होऊन याचे इनामतीमध्यें दिवाण दस्तें टके २००० दोन हजाराचा इनाम तर्फ मजकुरी देविला असे. बी त॥

| | |
|---|---|
| गांव कुलबाव कुलकानु | गांवगना सेते इनाम दिवाण |
| खेरीज इनामदार व हकदार | दस्ते कुलबाव कुलकानु |
| मोईन टके १००० एक हजाराचा | मोईन टक्के एक १००० हजाराची |
| गांव एक कमाल दस्त | कमाल दस्ते देणें. |

येैसी दोनी हजारांची इनामती यांस द्यावयाची निर्वाह करून हे पत्र तुह्मांस, सादर केले असे तरी पूर्वील इनाम गांव व सेते नेमून देऊन यांस व याचे पुत्रा पौत्रादि वंश परंपरेने अवछीन इनाम चालवावयाविशी प्रांत मजकुरचे देशाधिकारी यांचे नांवे सनद आपली करून देणें आणि इनाम चालेल ऐसें करणें जाणिजे बहुत लिहिणें तरी तुह्मी सुज्ञ असा.

मर्या
देयं विरा
जते.

या नंतर राज्याभिषेक शके २४ त **बाबाजी बाजीप्रभूनें** आपले वडिलार्जीत मावळांतील टिपणीसीचें वतनाची सनद छत्रपति राजाराम महाराजाकडून करून घेतली ती निजामशाहीत मलिकंबराचे वेळीं ज्याप्रमाणें हक्क चालत होते, त्याप्रमाणें चालविण्याचा हुकूम महाराजांनीं सचिवास केला, तें आज्ञापत्र—

**श्री.**

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २४ ईश्वरनाम संवत्सरे माघ शु ॥ चतुर्दसी

श्री
राजाराम नरपति
हर्ष निदान मोरेश्वर
सुत नीळकंठ मुख्य
प्रधान.

मंदवासर क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणी समस्त राजकार्यें धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री शंकराजी पंडित सचिव मदारुल माहाम यासी आज्ञा केली ऐसिजे राजश्री **बाबाजी बाजी** व **मोरोबाजी** व **रामाजी बाजी** व **अंतजी दाजी** व **विठल फुलाजी** व **कृष्णाजी फुलाजी** देशकुळकर्णी

तपे हिरडस मावळ प्रांत मावळे यांतून **बावाजी बाजी** हुजूर येऊन विनंती केली कीं, तपे मजकूरचें टिपनीसीचें वतन पूर्वापर आपले वडिल वडिलापासून चालत आले आहे. कैलासवासी स्वामीस मावळप्रांत कावीज जाल्यापासून भोगवटा तुटला आहे येसीयास स्वामीनें बहुता वतन दाराचे जीर्णोधार केले आहेत आपण स्वामीची सेवा एकनिष्ठेनें केली आहे तरी स्वामीनें कृपाळू होऊन आपले वतन आपणास चालवायाची आज्ञा केली पाहिजे म्हणोन विदित केले येसियास **बावाजी बाजी** स्वामीच्या पायासी एक निष्टेनें सेवा करीत आहेत. यांचें चालविणें स्वामीस अगत्य याकरितां तपे हिरडस मावळ येथील टिपनीसीचे वतन यांचें यांस चालवायाची आज्ञा करून सनद निराळी देशाधिकारी याचे नांवे सादर केली आहे तेणें प्रमाणें टिपनीसीचे वतन यांचे चालविणें या वतनास हक लाजीमा व इनामति पूर्वी **मलिकअंबर** याचे कारकिर्दीत चालीले असेल त्याप्रमाणें विलाकुसूर यांस व यांचे पुत्रपौत्रादिवंश परंपरेनें चालविणे जाणिजे बहुत काय लिहीणे सुज्ञ असो.

मर्या
देयं विरा
जते.

वरील अज्ञा पत्राप्रमाणेंच देशाधिकारी यांस श्रीराजाराम छत्रपतिनें आज्ञापत्र सादर केलें तेः—

श्री.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २४ ईश्वरनाम संवत्सरे माघ शु॥ चतुर्दसी मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणीं राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी सुभाप्रांत मावले यांसी आज्ञा केली येसिजे **बावाजी बाजी** व **मोरोजी बाजी** व **रामाजी बाजी** व **अंताजी बाजी** व **विठल फुलाजी** व **कृष्णाजी फुलाजी** देशकुळकर्णी तपे हिरडीस मावळ जांत मज-

श्री ॥ राजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नीळकंठ
मुख्य प्रधान.

कूर याजपैकीं, बावाजी बाजीप्रभु याणी हुजूर स्वामी सनिध येऊन विनंती केली कीं, तपे मजकूरचे टिपनीसीचे वतन आपले पूर्वापार चालत आले आहे त्यावरी हा देश राजश्री कैलासवासी स्वामीस हस्तगत जाहला त्या दिवसा पासून आपले टिपनीसीचे वतन अनामत केले येसीयास स्वामी-धर्मप्रभु वतनदाराचे मायेबाप आहेत कुळवतन-दाराची वतनें त्याची त्यांस दिल्ही तरी आपलें हीं टिपनीसीचे वतन आपणांस दिल्हे पाहिजे ह्मणोन विदित केले त्यावरून मनास आणता याणी स्वामीच्या राज्यांत बहुत दिवस कष्ट मेहनत केली आहे व वतनदार यांचे चालविणें स्वामीस अगत्य यास्तव यावरी स्वामी कृपाळू होऊन तपे मजकूरचे टिपनीसी पूर्वी चालिल्या प्रमाणें हली यास अजराम-ऱ्हामत करून दिल्हे असे तरी त॥ मजकूर याचे कारकिर्दीस चालिले असेल त्या प्रमाणें चालविणें वतनाची सेवा यांचे हाते घेत जाणें हे वतन यास व यांच्या पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें चालविणें प्रतिवर्षी नुतन पत्राची अपेक्षा न करणें या पत्राची प्रति लेहून घेऊन मुख्यपत्र याजपाशीं परतोन देणें निशेद समश

मर्या देयं
विराजते.

बार सुद सुरु सुद बार

सु॥ समान तिसैन

वर दिलेल्या सनदा व आज्ञापत्रें श्रीराजाराम छत्रपति यांच्या असून, त्या जिंजीहून परत आल्या नंतरच्या असल्यामुळें विशेष महत्वाच्या आहेत, व त्या तात्विक दृष्टीनें दिल्या नसून पूर्वापार कामगिरीचा व तत्कालिन स्थितीचा विचार करूनच दिलेल्या आहेत, हें जरी खरें आहे तरी या सुप्रसिद्ध वीरांनीं जी वतनें

मागितली ती आम्ही स्वराज्य संरक्षणार्थ लढतो म्हणून किंवा आमचे वडील स्वराज्या करितां धारातिर्थी पतन पावले, म्हणून नूतन वतनाची मागणी केली नाहीं, तर आमचें जें वतन पूर्वापार म्हणजे निजामशाहीत मलिकंबराच्या वेळापासून चालत होतें तें, जें शिवाजीनें जप्त केलें आहे, त्याची मागणी केली. हें लक्षांत ठेण्यासारखें आहे. ह्यावरून त्यांनीं काय सिद्ध केलें ! तर आपल्या पूर्वजांनीं निजामशाहीत पराक्रम करून त्यांस उपकृत केले. त्याचा मोबदला म्हणून मलिकंबरानें निजमशाहीतर्फे दिलेलीं वतनें, मिळविण्याचा त्यांस विशेष अभिमान होता. हेंच सिद्ध होतें. हा पहिला मुद्दा. दुसरा मुद्दा असा कीं, प्रत्येक पत्रांत "**तुमचें त्रालविषें हें स्वामीस अमात्य तुमचें पिते बाजीप्रभु याणी कैलासवासी स्वामी पाशी थेक निष्ठपणें सेवा करून स्वामीकार्याविरी खर्च जाले.**" हें वाक्य प्रत्येक पत्रांत आहे. ह्यावरून **बाजी प्रभुच्या** पराक्रमाची जाणीव तर सर्वांस झाली असली तरी तो केवळ लढाई करितांना मृत्यु पावला, हा मुख्य मुद्दा नसून त्याणीं शिवाजीचा प्राण वांचाविला, इतकेंच नव्हे तर स्वधर्म व स्वराज्य याचें संरक्षण करण्याकरितां आपला बळी दिला, म्हणूनच स्वराज्य पूर्णत्वास आलें. अस्तु ! !

**शिवाजीनें, बाजी**च्या मुलाचा योग्य सन्मान करून बापाचा सरंजाम देऊन वाढविलें. तो **बाबाजी** स्वपराक्रमाचा व आपल्या पूर्वजांचा अभिमानी असल्यामुळें, नूतन वैभवास चढलेल्यांची कदर करणारा नव्हता, ह्मणून श्रीछत्रपति राजाराम महाराजांनीं ह्मटलें कीं, " तुह्मी उद्योगविवर्जित घरींच राहिलेत. तुह्मी स्वामी कार्याचें. तुह्मांस कार्यभाग सांगावा या निमित्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य याणीं आग्रह केला. परंतु स्वामीनें कृपाळू होऊन कार्यभाग सांगितल्या विरहित सेवा कर्तव्य नाहीं. हा निर्वाद करून स्वामींचे सेवेसी आपले बंधु महादाजी बाजी यांस पाठविले. " या वाक्यावरून हा वीर किती तेजस्वी होता ह्याची कल्पना वाचकांनींच करावी. असो ! छत्रपतिनें बावाजींची नेमणूक संताजी घोरपडे याजकडे केली. पुढें संताजीचा खून झाल्यानंतर आपण त्याची नेमणूक केली नाहीं, तर तो पुनःस्वस्थ बसेल हें जाणून त्याची नेमणूक जयसिंगराव जाधव याजकडे करून त्यांस नेमणूक करून खर्चाकरितां तीन गांव दिले. त्यासंबंधीं एक सनद उपलब्ध झाली तीः—

श्री.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २४ ईश्वरनाम संवत्सरे माघ शु॥ चतुरदसी मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री शंकराजी पंडित सचीव मदारुल माहामयासी आज्ञाकेली ऐसिजे **राजश्री बाबाजी बाजी** जमेनिस दि॥ राजश्री जयसिंग जाधवराऊ सेनापति यांसी हक मुकासे येणें प्रमाणें तपे हिरडीस मावळ पैकीं नेमून दिलें आहेत बी त॥.

| मौजे नांद | मौजे वेणोपुरी | मौजे वाटार |
|---|---|---|
| १ | १ | १ |

ऐसे तीन गांव याचे दुमाले करून या गांवीचा जो आकार होईल तो यांचें नांवें खर्च लिहीत जाणें बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा

मर्या
देयंविरा
जते.

पुढें मोंगलांनीं दक्षिणेंत जो प्रळय मांडिला होता, त्यावेळीं या देशपांड्याहि मराठी राज्याच्या संरक्षणार्थ पंतसचीवास साह्य करून जो पराक्रम केला त्याची जाणीव जाणून शंकराजी नारायण सचीवानीं छत्रपति महाराजांस पत्र लिहिलें. याप्रमाणें त्यांस त्यांच्या पुरातन वतनाची सनद देण्यांत आली ती.

**श्रीमलारी प्रसन्न**

तालिक

श्रीसकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री प्रल्हाद पंडित स्वामी गोसावी, यांस पोष्य शंकराजी नारायण कृतानेक नमस्कार वि॥ येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखाज्ञा केली पाहिजे विशेष **राजेश्री बाबाजी बाजी** व **रामाजी बाजी** व **कृष्णाजी फुलाजी** देशकुळकर्णी

तर्फ हिरडस मावळ यार्णी राजेश्री स्वामीच्या पायाशीं एकनिष्ठकरून संपूर्ण राज्य ताम्रानें आक्रमिलें ते प्रसंगीं कष्ट मेहनत केली एक निष्ठेनें राहिले पाहिजे याकरितां यांचे हिरडस मावळचे देशकुळकर्ण वतन आहे तें यांचे दुमाले केलें व देशकुळकर्णाचे नि॥ पुरातन इनाम गांव व सेते व हक चालिला आहे तोहि दुमाले करून पत्रें करून दिधली आहेत. हल्ली त्रीवर्ग राजेश्री स्वामींचे सेवेसी आले आहेत तरी स्वामींचे राजेश्रीस श्रुत करून यांचें इनाम गांव व सेते व तर्फे संमध हक येणें प्रमाणें चालिला आहे.

| इनाम गांव | इनाम सेते | रक्कम यांस खंडी |
|---|---|---|
| १ मौजे महुडे खुर्द | ४० आलंदे | ३ पन्हर |
| १ मौजे गोवडी | १५ संगमनेर | २ वेणपुरी |
| १ मौजे नांदगांव | ३६ सिंद | —— |
| — | १५ नांद | ५ |
| ३ | —— | |
| | १०६ | |

येणें प्रमाणें पुरातन हक चालला आहे याची राजपत्रें दिधली पाहिजेत येविषयीं राजश्री स्वामीस लिहिले आहे कळलेले असावे हे लोक स्वामीचें पदरीचे आहेत स्वामीहि जाणत आहेत सदरहू सनदा करून देवविल्या पाहिजेत बहुत काय लिहिणें कृपालोभ असो देणें वि॥

असो, स. १६९९ त शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीपेक्षांहि जास्त प्रखरतेनें व तेजस्वीपणानें तळपूं लागलेला रवी, स्वधर्म व स्वजन यांचें संरक्षण करण्याकरितां अतर्क्य व अनन्वित हाल सोसून, कडव्या व धर्मवेड्या औरंगजेबाच्या क्रोधाग्नित आनंदानें आपल्या प्राणांची आहुति देणारा गोब्राह्मण प्रतिपालक श्रीशिवाजी महाराजांचा वीरपुत्र संभाजी महाराज याच्यावधानें मराठी राज्याची घडी जरी विस्कळीत झाली तरी हा पक्ष कधींहि नेस्त नाबूत झालाच नाहीं; इतकेंच नव्हे तर " कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें " याप्रमाणें त्यांचें पाऊल पुढेंच पडत होतें. व पुर्वी कधींहि प्रादुर्भूत झाला नव्हता, इतका आवेश, करारीपणा व औरंगजेबाची हड्डी नरम करण्याचा जोम प्रत्येक स्वातंत्र्यभक्त मराठ्यांच्या ठायीं पूर्णपणें विकासित झाला होता. मराठ्यांची मूर्त स्वातंत्र्य श्री

जे राजाराम महाराज त्यांची जिंजीच्या सहावर्षांच्या वेढ्यांतून सुटका होऊन सातारा मुक्कामीं, त्यांची छत्रपति म्हणून पुनः प्राण प्रतिष्ठा झाली. संताजी, बावजी, धनाजी वगैऱ्यांचें तीक्ष्ण माऱ्यापुढें औरंगजेब अगदीं जेरीस आला होता. त्याच वेळीं तालनेर मुक्कामां हुसेन अलीखानाचा पुरा मोड करून मराठे सरदार उत्तरेकडील आपले मुलखांत लूट करून चौथाई व सरदेशमुखी हे हक्क बसवीत आहे, हें त्यांस समजतां अर्धवट ठेंचल्या सर्पाप्रमाणें खळवळून जाऊन मराठ्यांना नामशेष तरी करीन अगर मृत्युमुखीं तरी पडन अशी त्यानें घोर प्रतिज्ञा केली. तो अगोदरच मराठ्यांचा कट्टा दुस्मान, त्याच्या जवळ अपार संपत्ती व अगणित सेना. त्यापेक्षां विशेष महत्वाचें म्हटलें म्हणजे पूर्वी प्रमाणें आपल्या हाता खालील खानदानीच्या व चुकार तुकड्या सरदारांच्या अंगावर न सोपवितां प्रत्यक्ष आपल्या शिरावर घेण्याचा त्यानें केलेला पक्का निर्धार, यामुळें मराठे वीरांना मोठी धास्ती पडली होती. त्याच वेळीं संताजी घोरपड्यासारख्यानें अचानक हल्ले करून मोगली सैन्यास सळो का पळो करून टाकणाऱ्या जवान मर्दाचा अकस्मात झालेला खून, ह्यामुळें मराठ्यांस चिंता पडणें सहाजिकच होते; परंतु त्याच्याच बरोबर कसलेला बाबाजी धाजी धनाजी जाधवाच्या मदतीस मिळाल्यामुळें ही चिंता लौकरच नष्ट झाली. कारण कोणत्याहि व्यक्तीनें किंवा व्यक्ति समुदायानें स्वतंत्रता संपादन करण्याचा एकदां कायम निश्चय केला कीं, तो हाणून पाडणें कोणत्याहि प्रचंड शक्तीला किंवा बलाढ्य बादशहाला शक्य नसतें. मनुष्यानें किंवा राष्ट्रानें स्वंत्र असावयाचें कां पारतंत्र्यांत कुजत पडावयाचें, हें स्वतःच्या मनाच्या निर्धारावर असतें. आपण नादान दुबळे अगर कमकुवत असल्या विषयाचीच भावना मावळून तिच्या जागीं स्वतःच्या शौर्याची, सामर्थ्याची व कार्य दक्षतेची आत्मप्रतीति अधिष्ठित झाली कीं, लोक आज नाहीं, उद्यां स्वतंत्र झालें असें दृढ अनुमान करितां येतें.

सतराव्या शतकांत मराठ्यांना मोंगली फौजेची विशाद वाटेनाशी झाली. त्यांस आत्मप्रत्यय व आत्मविश्वास उत्पन्न झाला. म्हणूनच त्यांनीं औरंगजेबाच्या प्रतिज्ञेस हरताळ लाविला. त्याच्या सेना समुद्राला चौफेर तंग देऊन 'तोबा तोबा' करीत त्याला दिल्लीच्या बाजुला पिटाळून लावण्याची त्यांनीं तयारी केली. केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणें औरंगजेबानें मराठ्यांना रानोमाळ हुसकावून लावण्याच्य

इराद्यानें ब्रह्मपुरी सोडून स्वतः निघाला. त्यानें चौफेर आपलें सैन्य पाठवून किल्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्याप्रमाणें त्याचा पराक्रमी सरदार शाहिस्तेखान हा पन्हाळाकिल्यास मोर्चा लावून वसला. त्यावर **बावाजी वाजीनें** निकराचा हल्ला केला. त्या दोघांमध्यें पन्हाळ्यानजीक मुदरगड येथें मोठ्या निकराची लढाई स. १६९९ त झाली. त्या लढाइंत **बावाजी बाजीस** अकस्मात वार लागून तो रणभूमीवर शांत झाला. यांवेळीं हे वीर माझ्या मातृभूमीचा एक कर्तव्यनिष्ठ नागरीक या नात्यानें मी कांहीतरी कार्य केलें म्हणून मोठ्या आनंदानें मरत असत. **बावाजी बाजी**चा असा अंत झाला, हें ऐकून श्रीराजाराम **छत्रपति** महाराजांनी त्याचा मुलगा **खंडेराव** यांस बोलावून आणून बापाच्या मृत्युबद्दल खेद प्रदर्शित करून, त्याचे समाधान केलें व वडिलांचे सर्व अधिकार त्यांस दिले.

**अंताजीबाजी** सेनासहस्त्री होता, त्यांस सेनापंचहस्त्री करुन श्रीराजाराम महाराजांनीं कर्नाटकांत पाठविला होता, पुढें तो वतनाच्या सरंजामा करितां हुजूर होता. श्रीराजाराम छत्रपति महाराज मृत्यु पावल्यावर दुसरे श्री शिव छत्रपति महाराजांनी **अंताजी बाजीस** सेनासप्तसहस्त्री म्हणजे सात हजार सैन्याचे अधिपती करून **बावाजी बाजी**च्या नतर जयसिंग जाधवराव यांज-कडे पाठविले. त्या संबंधीं एक पत्र उपलब्ध झाले तें;—

स. १७०३

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २९ चित्रभानु संवत्सरे कार्तिक बहुल द्वादशी गुरुवासर क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति यांनीं समस्त सेनाधुरंधर विश्वासनिधि राजमान्य जयसिंग × जाधवरावराऊ सेनापति जतन मुलुक यांस आज्ञा केली. ऐसिजे राजश्री **अंताजी बाजी** सेनासप्तसहस्त्री तुह्माकडे दिल्हे आहेत सांप्रत वतनाच्या सरंजामानिमित्य हुजूर राहिले होते. आज्ञा देऊन पाठविले आहेत तरी तुह्मीं यांचा मामला समजोन देऊन यांचे हातें स्वामी-

× जयसिंगराव हा धनाजी जाधवरावास किताब होता.

कार्य घेत जाणे याकडील सरंजाम करून देऊन हुजूर लिहिणें स्वामी सनदा सादर करतील बहुत लिहिणें तरी तुह्मीं सुज्ञ असा.

मर्या
देयं विरा
जते.

अंताजी बाजी यांस दुसरे शिवाजी महाराज यांनी सात हजार सैन्याचे अधिपति करून धनाजी जाधवराव याजकडे नेमणूक केली. त्याच सुमारास खंडोबल्लाळ चिटणीस यांनीं शामजी हरिस पत्र लिहून कळविलें कीं, देशपांडे यांचे देश कुळकर्ण व गांवगन्ना शेते वगैरे इनामी होतीं तीं, मोंगलांच्या धामधुमींत बंद पडलीं. तीं महाराजानें पुन्हा चालू केलीं. त्यावेळीं शामजी हरि हा मावळाचा नामजादा कारकून होता. हें चिटणीसी पत्र विशेष महत्वाचें असल्यामुळें खालीं देतों तें:—

राज श्रीयाविराजित राजश्री शामजी हरि स्वामी गोसावी यांसः—

पोष्य खंडोबल्लाळ नमस्कार उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करणें विशेष हिरडसमावळ येथील देशकुळकर्णी यांचें गांव व गांवगना इनाम सेते आहेत. ते देशमुखाचे यांचे गर्गशार्मुळें चालत नव्हती त्याचा निवाडा राजश्री स्वामी सनिध राजश्री पंताजी व सेत याचे वियमाने जाला इनामतीच्या सनदा देशकुळकर्णी यांस करून दिल्ह्या आहेत त्याप्रमाणें याचे दुमाला करून चालविणें देशमुखाचे यांचे समाधान करून ऐकिलेते चाळते ते करणें दिवाणाचे शेरणीचा टका वे॥ तोवरी राजश्री **कृष्णाजी फुलाजी** व **रामजी बाजी** व **खंडोबाबाजी** यांचे हाते धंदा घेणें दुसरी याची दखलगिरी होऊं न देणें शेरणीच्या टक्याची बाकी आम्हीं हुजूर भरली आहे याकरितां तुम्हांस लिहिले असे, तुम्हीं सर्व प्रकारें यांची साह्यता करून धंदा सुरळीत चाले असें करणें हुजूरच्या टक्याची निर्वाह होणें ऐशी गोष्ट करणें बहुत काय लिहिणें कृपा असावी. जे हे विनंती.

सन १७१० सालीं, या देशपांड्यास वेणीपूरीच्या सेरणांची सनद मिळाली तीः—

स. १७१०

**श्री.**

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री हरि पिलाजी गोसावी यांसः—

सेवक बावुराव आमात्य नमस्कार सु॥ इहिदे अशर मया अलफ र॥ **मोराजी बाजी** व **कृष्णाजी फुलाजी** व **रामाजी बाजी** व **खंडो बावाजी** देशकुळकर्णी त॥ हिरडस मावळ याचे इनाम मौजे वेणोपुरी त॥म॥र येथें कास खंडी २ दोन खंडी रकमी आहे येविसी राजपत्र आलाहिदा मौजे मजकूरास सादर आहे तेणे प्रमाणें यांचा इनाम चाळविणे नवजिकार न करणे जाणिजे छ रममजान प॥ हुजूर.

लेखना
निधि.

मागील एका पत्रांत **खंडो बावाजी** यांस सात हजाराचा सेनापति करून जयसिंगराव जाधवाकडे नेमणूक केली होती हें दिलेंच आहे.

खंडो बावाजी हा किती शूर व मुत्सद्दी होता याचें वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हे; परंतु धनाजी जाधवानें त्याच्या संबंधीं श्रीछत्रपति शाहू महाराजांस अनेक वेळा कळविलें होतें. त्यावरून छत्रपति महाराजांनीं त्यांस पत्र लिहिलें तेंः—

स. १७१३

**श्री.**

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३९ नंदनाम संवत्सरे आषाढ बहुल द्वादसी मंदवासरे क्षत्रिय कुलावंतस **श्री राजा शाहूछत्रपति** याणीं राजमान्य राजेश्री **खंडो बावाजी** जमेनिविसी द॥ सेनापति यासी आज्ञा केली ऐसिजे तुम्हीं स्वामीच्या पायाशीं निष्ठा धरून स्वामी सेवा शुधतः कर्णे करून करीत आहा

दुसरा अर्थ किमपि जाणत नाहीं हें वृत्त राजेश्री नरसिंगराव जाधवराऊ सेनापति याणी हुजूर लिहिले यावरून स्वामी तुह्मांवरी बहुत संतोषी जाहले तरी तुम्हीं स्वामीचे पुरातन कदिमी सेवक आहा तुम्हांपासून येकनिष्ठतेस अंतराव होऊं पहातो कीं काय पुढेहि स्वामीच्या पायाशीं निष्ठा धरून स्वामीकार्य करीत जाणें ह्मणजे स्वामी तुमचे उर्जित करून चालवितील येविसी आपले समाधान असो देणें बहुत काय लिहिणें.

मर्या.
देयं विरा
जते.

वरील पत्रावरून पहातां खंडो बाबाजी आपल्या वडिलाप्रमाणें किती मानी होता हें स्पष्ट होतें. हंबिरराव मोहिते मरण पावल्यानंतर बाबाजी बाजी आपल्या घरीं स्वस्थ बसला, त्याचप्रमाणें धनाजी जाधवराव मृत्यु पावल्यावर खंडोबाजी आपल्या घरीं जाऊन बसला. हें छत्रपतिस कळतांच त्याणीं त्याची नेमणूक चालू केली व पुढें सेनापति खंडेराव दाभाडे याजकडे केली. त्याबद्दलचें आज्ञापत्र छत्रपति महाराजानीं सेनापतीस सन १७१८ त लिहिलें तें:—

स. १७१८.

श्री.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४४ हेमलंबी नाम संवत्सरे आश्विन शु॥ दशमी गुरुवासेर क्षेत्रिय कुलावंतस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी समस्त सेना धुरंधर विश्वास निधि राजमान्य राजश्री खंडेराव दाभाडे सेनापति यांस आज्ञा केली ऐसिजे राजश्री खंडो बाबाजीप्रभु यांची पूर्वीपासून सेनापतिची जमेनिसी होती त्यांस अलिकडे दुसऱ्याकडे दिली होती. त्याउपरी हे हुजूर उमेदवार होते हे एकनिष्ट सेवक लिहिणार खांरदाज स्वामीकार्याचे मर्दान जाणून स्वामी यावरी कृपाळू होऊन त्यांची वतनी जमेनिसी जाणून यांस सांगोन पाठविले असत त्यांचे होत जमेनिसीचे प्रयोजन घेत जाणे यांस वेतन सालीना

देखील चाकर, होन पातशाही ५००० पांच हजारास केले असत ॥ पैवस्तापासून वजावाटा व दंडकप्रमाणें वजा करून वेतन सिरस्ताप्रमाणें देणें चाकर मोईन प्र॥ ठेवून हजिरी लिहवतील त्या दिवसापासून चाकरीचा हक देत जाणे यासी बैसावयास पागेचे घोडे देत जाणे कागद बाब लिहिणार व शागीसिरे व ऐवच खर्च ×× तादप्रमाणें देत जाणे यासी जमान **यशवंतराव महादेऊ** पोतनीस हुजूर घेतले असत बहुत काय लिहिणें तरी सुज्ञ असा.

मर्या देयं
विराजते.

**एसाजी बाजी** याचा मुलगा **कृष्णाजी रघुनाथ** याजबरोबर जंजीऱ्याचे स्वारींत होता. त्यासंबंधीं प्रो. द. वा. पोतदारानां स्वधर्म ता. १७ नोव्हेंबर १९२१ यांत लेख लिहीले आहेत, त्यांत नं. ४ चा लेख आहे तो:—

श्री वेदमूर्ती राजमान्य राजश्री राजश्री क्षेत्रवासी ब्राम्हण स्वामींचे सेवेसी सेवक विद्यार्थी समस्त कायस्त कुळ प्रभु

कृष्णाजी हरि पालकर.

बाळाजी संभाजी देशकुळकर्णी त॥ तरुगवाडी तान्हाजी आत्माजी नीमे कुळकर्णी त॥ पणवेल

या खाली मूळ प्रतीत आणखी बऱ्याच सह्या आहेत.

साष्टांग दंडवत विनंती उपरी ऐसाजी बाजी देशकुळकणी त॥ हिरडस मावळ याचा पुत्र* पिलाजीरायासी शामळाची राजपुरीस धरून सा वर्षे गेला त्याचे समंधी कोणी सोडवावया येतील म्हणौनु मार्ग पाहिला परंतु आला नाही ऐसे दखोन यासी

* पुत्र दिला आहे ते चुकीचें आहे. नातू पाहिजे, शेवटी वंशावळ दिली आहे ती पहावी.

बलत्कार करून अविध केला आणि मागतीं त्यासी अर्डासेरो देऊनु तीन वरसें ठेविलें त्यासी जे समयीं अनुकूल पडिले ते वेळेस निघून आला. या प्रांतासी आलियावरी यासी अनुताप बहुतच आला कीं, आपल्या स्वयातीस शरण जाऊन कुळामध्यें यावें ऐसीयासीं तुह्मीं हा शास्त्रार्थ मनासीं आणून जो शास्त्रयुक्त विध जैसा असेल तैसा निर्वाह मनासी आणून यासी प्रायश्चित दिल्हे पाहिजे ये गोष्टीस आह्मी समस्त मान्य असो प्रायेच्छीत विध संपादून येक आपले आज्ञापत्र पाठविलें पाहिजे त्या पत्रावरून वर्तणूक करून दुरुस्त जाले पाहिजे. हे पत्र स्त्रावण शुध सत्पमी भोमवासरे युवानाम संवत्सर हे विनंती.

× × ×

प्रो. पोतदारानीं एकंदर पांच लेख अशाच प्रकारें लिहिले असून पुढें त्याचें थोडक्यांत विवेचन केलें आहे ते—" लेखांक ४ ह्याला इतरापेक्षां एक विशेष महत्व असें आहे कीं, त्यांत सुप्रसिद्ध " वीरशिरोमणी बाजीप्रभु देशकुळकर्णी ता॥ हिरडीस मावळ याचा पुत्र पिलाजी यासी शामळानीं धरून नऊ वर्षे ठेऊन बाटविला. " तो पळून आला तेव्हां त्याच्या पुनर्ज्ञाति प्रवेशनाबद्दल " समस्त कायस्त कुलप्रभु " यांनीं ब्रह्मवृंदास प्रार्थना केली आहे कीं, " यासी प्रायच्छीत दिल्हे पाहिजे ये गोष्टीस आह्मीं समस्त मान्य असो " कागदावर शक नाहीं तथापि ले० ४ मध्यें शामलाचे स्वारीचा जो उल्लेख केला आहे तो, त्याच प्रमाणें ले. ३ वर दादजी नरस प्रभूची असलेली सही व लेख ३ व ले. ४ ह्या विनंति एकाच मितीच्या आहेत ही गोष्ट, या तीन बाबी लक्षांत घेतल्यास या लेखांचे अंतीं दिलेला युवा संवत्सर त्याचा वार न जुळला तरी खास शके १६१७ *हाच ठरतो. शामळाच्या* धामधुमीची वेळ तीच दादाजी नरस प्रभुहि तेव्हांच हयात होता.

वरील लेख प्रो. पोतदारानीं कोणत्याहि हेतूनें प्रसिद्ध केला असला, तरी तो ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचा आहे. लढाईत जय कोणास प्राप्त होईल हें कोणासहि सांगतां येणार नाहीं. त्याप्रमाणें **दादजी रघुनाथ** याचा पराजय झाला व त्याचे लोक शामळानें कैद केले व कैद्यास बळजबरीनें बाटविलें हा प्रश्न येथें नव्हे. तर, ह्या घराण्यांत पुष्कळ पुरुष लढवय्ये आणि पराक्रमी होते हेंच येथें दर्शविण्याचा आमचा मुख्य हेतु आहे.

असो ! वरील हकिकत ह्मणजे चरित्रनायकाचें अगर त्याच्या घराण्याचें महत्व वाढविण्याकरितां गाथा तयार केली नसून, ती केवळ अस्सल ऐतिहासिक माहितीच आहे. ती जशी उपलब्ध झाली तशी ती आम्हीं तिजसंबंधानें विशेष चर्चा न करितांच आमच्या वाचकांस सादर केली. स्थूल मानानें विचार करितां ह्या इतिहास प्रसिद्ध घराण्याची आणखीहि पुष्कळ माहिती उपलब्ध व्हावयास पाहिजे होती, कारण चरित्रनायकाचें घराणें पूर्वी व नंतर तरवारीच्या जोरावर प्रतिष्ठितपणें वावरत होतें, हें ह्या चरित्रांत दिलेल्या माहितीवरूनच सिद्ध होतें. बेरीदशाही, निजामशाही आदिलशाही, ह्या शाह्या सोडल्या तरी मलिकंबर व शहाजी, ह्यांच्या अमदानींतहि बरेंच प्रतिष्ठित असून शिवाजी, संभाजी, राजाराम, दुसरा शिवाजी व शाहू यांच्या ह्मणजे, ऐन मराठेशाहींत ह्या घराण्यांनीं कारकुनी न करितां तरवारीचा सामना केला. त्यांनीं आपला देह जावो, अथवा राहो ! अशा निर्धारानें रणांगणांत उड्या मारल्या व समरभूमीवर आपले देह समर्पण केले. ह्मणजे सारखें सात आठ पिढ्या हें घराणें तरवारीचे खेळ खेळत होतें. अशा घराण्याची दिली ह्यापेक्षां अधीक माहिती देतां येऊं नये हें राष्ट्राच्या इतिहासाचें दुर्दैव नव्हे तर काय ह्मणावें ! ! ऐतिहासिक साधनें उपलब्ध न झाल्यामुळेंच " कायस्थ प्रभु जातींतील लोकांनीं **बाजीप्रभू**-वर उत्तरकालीं जातीचें महत्व वाढविण्याकरितां गाथा तयार केली असणें अशक्य नाहीं, असा संशयी पक्षानें संशय व्यक्त केला आहे. " **बाजीप्रभु** लष्करी अधिकारी नसून लष्कराबरोबर असणारा कारकूनहि असणें शक्य आहे." असली प्रमादपूर्ण भाषा बाहेर पडण्याचें कारण तरी ऐतिहासिक साधनांचा अभाव हेंच आहे. आमच्या सत्य संशोधन करण्याचा आव घालणाऱ्यांची ही बडबड जर अज्ञान वायूच्या झटक्याचाच परिणाम असेल, तर ती उपरोक्त अस्सल मात्रेच्या वाळशांनीं खास नाहीशी होईल, पण जर ती द्वेषपूर्ण ज्ञान-वायूच्या झटक्याचा परिणाम असेल तर शहाण्यानें ती शमविण्याचा प्रयत्न करण्याचें सोडून ' परंतु मूर्खांचें हृदय धरवेना क्षणभरी ' असें ह्मणून स्वस्थ बसणेंच चांगलें !

सन १९१९ सालांत धडपड करून सदरहू चरित्रांत दिलेल्या ऐतिहासिक साधनांची अस्सलवरून नकला करून घेतल्या ह्मणून आज हें ऐतिहासिक साधनांच्या

आधारानें अल्प चरित्र लिहिलें गेलें. तीच साधनें आतां मिळणें दुर्मिळ. वास्तवीक पहातां ह्या घराण्यांतील प्रत्येक वीरांच्या पराक्रमाचीं सर्वांग सुंदर अशीं चरित्रें लिहिलीं गेलीं पाहिजेत. हा सुदीन केव्हां येईल तो येवो ? तथापि कोणत्याहि वीरासंबंधी ह्या घराण्यांतील इसमाकडे अगर इतर कोणाजवळ ऐतिहासिक पत्रें, याद्या, वांटणीपत्रें, आज्ञापत्रें वगैरे असल्यास त्यांनीं तीं उदार अंतःकरणानें आमचेंकडे पाठविल्यास, त्यांचा आनंदानें स्वीकार करूं व ह्याच चरित्राच्या पुढील आवृत्तित त्यांचा समावेश करूं असें असें त्यांस आश्वासन देऊन हें चरित्र येथेंच संपवितों.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २७२२

REFBK-0002722

# वंशवृक्ष.

- रामप्रभु उर्फ विंद्यप्रभु
  - गणेशप्रभु
    - केशवजी
      - विंझाजी ( ह्याचाहि वंश विळेकर घराण्यांत प्रसिद्ध आहे )
      - वैजनाथ ( सिंदकर )
        - पिलाजी ( बांदलाच्या बरोबर झालेल्या लढाईत मेला. )
          - बाळाजी
            - मल्हार
              - आत्माजी ( वंश चालू )
          - कृष्णाजी
            - बाल्होजी
              - सूर्याजी
              - अनाजी ( वंश चालू )
            - अनाजी* ( बांदलाच्या बरोबर झालेल्या लढाईत मेला )
            - फुलाजी
              - भिकाजी
                - चिमणाजी ( वंश चालू )
                - मुरारजी
              - विठ्ठल ( वंश चालू )
              - कृष्णाजी
            - बाजी ( चरित्रनायक ) स्त्रीया २ पुत्र ८
              - सोनाबाई १ ली स्त्री
                - महादाजी
                  - [illegible]ाजी
                  - भैराळ
                - मोराजी
                  - त्र्यंबक
                  - शामराव
                - रामाजी
                  - रखमाजी
              - गौतमाई २ री स्त्री
                - एसाजी
                  - पिलाजी
                - बाबाजी
                  - खंडेराव
                  - भिकाजी
                - हरजी*
                - विसाजी*
                - अनाजी
                  - गोविंद
    - गोपाळजी ( विळेकर प्रधान घराणें ) ( ह्या घराण्याचा वंशवृक्ष फारच मोठा आहे )

# परिशिष्ट.

## वीर-रत्नाची निधन तीथ कोणती ?

वीर-रत्नाच्या निधन तिथीबद्दल सुमारें तीन वर्षांपूर्वी वर्तमानपत्रांत बराच वाद-विवाद झाला; तथापि नक्की तीथ अशी कोणीच दिली नव्हती. आह्मीं सदरहू चरित्रांत शक्य त्याप्रमाणें त्यांच्या कार्याच्या मित्या व तारिखा दिल्याच आहेत. त्या खेरीज सुप्रसिद्ध इतिहास संशोधक रा. वाकसकर यानीं मे १९२१ च्या वि. विस्तारात या संबंधीं बराच उहापोह केलेला आहे. व तो आमच्या मतास साम्य असल्यामुळें वाचकांच्या माहितीं करितां मुद्दाम येथें देतोः—

## बाजी प्रभूची पुण्य तिथी.

१ सुमारें दोन वर्षांवर **वीर-रत्न बाजीप्रभु देशपांडे** यांच्या निधन तिथिबद्दल वर्तमानपत्रांतून बराच वाद माजून राहिला होता. एका पक्षानें ता २९ मे १६६० हीच निधन तिथि समजून त्या तारिखेस उत्सव केला. बाजीप्रभूच्या पुण्यतिथि वा उत्सव या दृष्टिनें कोणाचीच तक्रार नव्हती. किंबहुना असल्या राष्ट्रीय पुरुषांचें उत्सव जितक्या अधिक प्रमाणांत होतील तितके ते जनतेस पाहिजे आहेत. वाद जो होता, तो मितिबद्दल होता, व तेव्हां कोणतीच मिति नक्की ठरली नव्हती.

२ या तिथिबद्दल बखरकार खात्रीलायक असें कांहींच सांगत नव्हता. सभासदानें तर महत्वाची हकिकत दिलीच नाहीं. त्यानें स. १६६० व १६६१ या दोन सालांत शिवाजीच्या हालचालीचा नामनिर्देशहि केलेला नाहीं. शिव-दिग्विजयकार विशाळगडाच्या खिंडींतील ही लढाई झाली तेव्हां "उष्ण काळाचें दिवस होते असें ह्मणतो" चिटणीसकृत सात प्रकरणात्मक चरित्रांत "पावसाळा दिवस जवळ आला ह्मणून नामोहोरम होऊन तसेंच कुच करून पन्हाळ्यास फाजल आले" असें लिहिलें आहे. एक्याण्णव कलमी बखरींत मास-तिथिचा उल्लेख नाहीं. तात्पर्य तिथि ठरविण्यास बखरींचा काहींच उपयोग नाहीं.

३ सन १६५९ च्या ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्यें केव्हांतरी शिवाजीनें अफजुलखानाचा वध केला; नंतर सिद्दिजोहार व फाजलखान यांनीं स. १६६० च्या मे महिन्यांत पन्हाळ्यास वेढा घातला. हा वेढा चार महिने होता. इत्यादि हकिकत डफनें दिली आहे. तो ह्मणतो सप्टेंबर १६६० त बाजीप्रभूनें विशाळ गडाच्या खिंडीत पराक्रम केला. ता. २५ आगष्ट १६६० च्या सुमारास केव्हांतरी शिवाजी पांच सहा हजार मावळ्यांसह पन्हाळयावरून निसटला असें प्रो. सरकार ह्मणतात.

४ काहीं अपवाद वजा केले तर जेधे शकावली बरीच विश्वासनीय दिसते. डफची वरील हकीकत जेधे शकावलीशीं पुष्कळशी जुळते. तिच्यांतील महत्वाची हकीकत अशी आहे. शके १५८१ च्या मार्गशिर्ष शु. ७ रोजीं अफजलखानाचा वध झाला, शके १५८२ च्या चैत्रांत सिद्दिनें पन्हाळ्यास वेढा घातला, आणि " आषाढ व॥ १ पनाळी यावरून राजश्री स्वामी उतरोन खेळणीयासा गेले ते समई सिदी जोहार यांची फौज पाठीवरी आली. युद्धाची दाटी बहुत जाली तेव्हां बांदलाच्या लोकांनीं युद्धाची शर्त केली. लोक खस्त जालें; बाजीप्रभु देशकुळकर्णी ठार जाला. "

५ शिवाजी पन्हाळ्यावरून आषाढ व॥ १ च्या रात्रीं निघाला, हें जर जेधे शकावली प्रमाणें खरें असेल तर बाजीप्रभु आषाढ व॥ २ दिवशीं घोड खिंडींत लढाईत मारिला गेला हें सहज सिद्ध होतें. आषाढ महिना असल्यानें पावसाळ्याचें दिवस होते. तेव्हां वद्य १ च्या रात्रीं आकाश मेघाच्छादित झालें असल्यानें चांदणें लोपून सर्वत्र अंधार पडला असेल हेंही संभवनीय आहे. व पावसाळ्याचें आरंभीं उष्मा अतिशय होत असल्यानें ' उष्णकाळाचे दिवस होतें, हें बखरींतील लिहिणेंहि वावगें नाहीं. याप्रमाणें या सर्व वाचनांची एकवाक्यता केली ह्मणजे अन्यविरुद्ध पुराव्याच्या अभावीं असें ठरतें कीं, शके १५८२ आषाढ व॥ २ च्या दिवशीं बाजीप्रभूची मृत्युतिथि पडते. हीच बाजीप्रभूची पुण्यतिथि समजून त्या दिवशींच सर्वत्रांनीं उत्सव करणें इष्ट आहे

६ जेधे× शकावलींत ' शके १५८२ आषाढ व॥ १ पनाळी यावरून राजश्री स्वामी उतरोन खेळण्यास गेले ते समयीं......बाजीप्रभु देशकुळकर्णी ठार झाला ' असा उल्लेख आहे. यांतील शब्दार्थावरून पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळांत रा. बेंद्रे यांनीं बाजीप्रभूची मृत्यु तिथि आषाढ व॥ १ च ठरविली आहे. त्यांचें असें ह्मणणें आहे कीं, पन्हाळ्यावरून स्वामीचें ह्मणजे शिवाजीचें निघणें खेळण्यास पोंचणें व बाजीप्रभूचें लढाईत पडणें या तीनहि क्रिया आषाढ व॥ १ च झाल्या असल्या पाहिजेत; परंतु " खरे " जंत्रीवरून हें म्हणणे खरें ठरत नाहीं. कारण तिच्यांत गुरुवारीं आषाढ शु॥ १५ सुमारें २५ १/४ घटका असून नंतर वद्य प्रतिपदा लागते. अर्थात शुक्रवारीं आषाढ व॥ १ सुमारें १९ १/८ घटकाच ह्मणजे सुमारें दुपारीं एक दोन वाजे—पर्यंतच राहते. व नंतर व॥ २ लागते ती शनवारी सुमारें १३ घटी-पर्यंत राहते. बखरी व शकावली यांचा मेळ घालतां आषाढ व॥ १ च्या रात्रीं

शिवाजी महाराजांची स्वारी पन्हाळ्यावरून पळाली शुक्रवारची रात्र होच आषाढ व॥ १ चा रात्र होय हें जर खरें आहे. तर **बाजीप्रभु** आषाढ व॥ २ लाच विशाळगडावर पडला या बद्दल सुतराम् शंका राहत नाहीं; त्यादिवशीं इंग्रजी तारीख १४ जुलई सन १६६० होती.

---

× सद्दावा पॅरिग्राफ वि. विस्तारांतील लेखांत नाहीं. तो ह्या चरित्राची हस्त लिखीत प्रत वाचल्यावर लिहिलेला आहे.

मागणीची त्वरा करा ! पुढें मिळणार नाहींत !

# उपयुक्त ऐतिहासिक साधनांचीं पुस्तकें.

———:०:———

पुस्तक १ लें.

**चिटणवीस घराण्याची माहिती व सनदा पत्रें वगैरे**

किं. ४ आणे. ट. ह. नि.

पुस्तक २ रें.

**चिटणवीस घराण्याची माहिती व सनदा पत्रें वगैरे.**

किं. ८ आणे. ट. ह. नि.

पुस्तक ३ रें.

**चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंच्या ग्रामण्याची माहिती व आज्ञापत्रें**

किं. १२ आणे ट. ह. नि.

पुस्तक ४ थें.

## मावळा सरदार.

# विश्वासराव नानाजी दिघे, देशपांडे.

यांचे चरित्र.

शिवकालीन स्वराज्याकरितां जे कित्येक वीर, शौर्यानें व मुत्सद्दगिरीनें उदयास येऊन ज्यानीं आपलीं नांवें **वीर-रत्न** मालेंत चिरंतन गोवून ठेविलीं त्यापैकीं एका **वीर-रत्नाचें** हें पहिलेंच स्वतंत्र चरित्र, ऐतिहासिक लेखांचें आधारें व योग्य स्थळीं ऐतिहासिक पत्रांचाहि समावेश केल्यामुळें, विशेष महत्वाचें ठरलें असून, अनेक विद्वानांचे उत्कृष्ट अभिप्राय आलेले आहेत.

" हें चरित्र शिक्षण खात्यानें प्राथमिक व दुय्यम शाळा व ट्रेनिंग स्कूल करितां बक्षिसासाठीं व लायब्ररीयासाठीं मंजूर केलें आहे. " किं. ८ आणे. ट. ह. नि.

पुस्तक ६ वें

लौकरच प्रसिद्ध होईल.

**बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी.**

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण-कवळीची चाळ, कुंभारवाडा, दादर मुंबई नं. १४

टीप—वरील तीन पुस्तकांच्या प्रति थोड्याच शिल्लक आहेत.

फक्त नांवें नोंदवा. श्री. फक्त नांवें नोंदवा.

रणशूर

# मुरार बाजी देशपांडे

यांचें चरित्र

लौकरच प्रसिद्ध होईल.

बा. स. कुळकर्णी,

ग्रा. क्र. २८२२